म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय का. वा.
दा. क्र. ४०६८

# विवेकानंद

IRBK-0104067
IRBK-0104067

# वेकानंद



27 JUN 1975

# विवेकानंद

आणि

# इतर कथा

लेखक

विनायक विश्वनाथ पेंडसे

— प्रमुख विक्रेते —
अभिनव पुस्तक मंदिर, पुणे ३०

मूल्य दीड रुपया

प्रकाशक
वि. वि. पेंडसे
३/४ सदाशिव पेठ, पुणें २.

[illegible]
ठाकूर आणि विटणकर
चित्रपट क[illegible]
१३८ मेडोज स्ट्रीट
फोर्ट मुंबई १.

★

ठसे
श्री. मोहनराव कामत
बाँबे प्रोसेस स्टूडिओ
१३८ मेडोज स्ट्रीट
फोर्ट मुंबई १.

★

मुद्रक
शं. रा. दाते
'काळ' मुद्रणालय
२००/३ सदाशिव पेठ, पुणें २.

[सर्व आधिकार लेखकाचे आधीन]

# लेखकाचें हृद्गत

जून १९५० मध्यें 'दैनिक काळ'च्या संपादकीय विभागांत काम करण्याचा योग आला. काम करूं लागल्यापासून थोडक्याच दिवसांत 'काळ' चे कार्यकारी संपादक श्री. शंकरराव पाटणकर यांनीं साप्ताहिक अंकासाठीं कथा लिहिण्याबद्दल सांगितलें. तेव्हांपासून जानेवारी १९५१ पर्यंत ज्या कांहीं वेड्यावांकड्या कथा मी लिहिल्या आणि श्री. शंकरराव यांनीं कौतुकानें छापल्या त्यांतील कांहीं येथें संग्रहरूपानें एकत्रित प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

अशा कांहीं कथा आपण लिहाव्यात असा मनाचा संकल्प जरी जून १९५० पूर्वींच झालेला होता तरी श्री. शंकरराव यांची प्रेरणा आणि उत्तेजन नसतें तर तो प्रत्यक्षामध्यें उतरण्याची शक्यता अल्पसुद्धां नव्हती. श्री. शंकरराव यांनीं गेल्या २४ वर्षांच्या काळांत वेळोवेळीं अशाच प्रकारचें जें साहाय्य केलें त्याबद्दलचें त्यांचें ऋण खरोखरीच फिटण्यासारखें नाहीं.

घरच्याच कुटुंबियांचे आभार मानण्याची पद्धत आपल्याकडे नाहीं. आभार मानूं नयेत हें खरें पण अशा स्वरूपाच्या ऋणाचा उल्लेखही न करणें हें कृतघ्नपणाचें ठरेल. मी जी जी गोष्ट मनांत घेतली ती ती गोष्ट कै. ती. मातोश्री, दोघे वडील बंधू, आणि चार वडील भगिनी या सर्वांनीं उचलून धरली. या कथांच्या संग्रहाबाबतही तोच प्रकार घडला म्हणून हें पुस्तक स्वतःचे दायित्वावर प्रकाशित करतां आलें.

दैनिक 'काळ' चे संपादक आणि का मुद्रणालयाचे मालक श्री. मामाराव दाते यांचेही आभार मानावे तितके थोडेच आहेत. या प्रकाशनाचे बाबत त्यांची सहानुभूति आणि आपुलकी नसती तर हें प्रकाशन किती लांबलें असतें हें सांगणें कठिण आहे.

पुस्तकांत आलेल्या कथांच्या कथानकासंबंधीं एवढेंच सुचवावेंसें वाटतें कीं, या 'कथा' आहेत. हा कांहीं 'इतिहास' नव्हे. यांतला प्रत्येक शब्दन् शब्द इतिहाससंशोधकाच्या कसोटीला उतरेल असें नाहीं. तथापि हें निश्चयानें सांगता येईल कीं, घडलेल्या परिस्थितीचा विपर्यास कोठेंही होऊं दिला गेलेला नाहीं.

**वि. वि. पेंडसे**

# अनुक्रमणिका


| | पान |
|---|---|
| १) चंद्रशेखर आजाद | १ |
| २) मंदालेचा संग्राम | १८ |
| ३) मृणालिनी | ३० |
| ४) सोन्यासारखी पोरें | ४३ |
| ५) हंस आणि सारस | ४९ |
| ६) सगा | ६१ |
| ७) विवेकानंद | ८१ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ..........
...... शाखा

## ॥ क्रांतिकारकांचा सेनापति ॥

# चंद्रशेखर आजाद

त्या दिवशीं थंडी कडाक्याची पडली होती. दिवसच थंडीचे होते. थंडी इतकी पडली होती कीं हातापायांचीं बोटें गारठून वळेनातशीं होत होतीं. अशा थंडीच्या दिवसांत वीरशैव तिवारी अलाहाबाद स्टेशनवरून पहाटे ६ वाजतां कुडकुडत घरीं निघाला होता. अंगावर फारसे कपडे नव्हते. जाडेभरडें मळकें धोतर, व फाटकेंतुटकें कुडतें थंडीपासून त्याचें रक्षण करूं शकत नव्हतें. कुडकुडत कुडकुडत, थंडीनें दांत हुडहुडत आहेत अशा स्थितींत वीरशैव तिवारी घरीं निघाला.

स्टेशनच्याबाहेर इलेक्ट्रिकच्या पिवळ्या शोधज्योतींचा मंद प्रकाश पडला होता त्या प्रकाशांत मुख्य प्रवेशद्वाराच्या अगदी समोर एक मोठी पाटी लांकडी खांबावर अडकविण्यांत आली होती, तेथें चार पांच व्यक्ति कांहीं वाचीत होत्या. वीरशैव कुडकुडत पाटीकडे गेला. लांकडी पाटीवर मोठ्या रंगीत अक्षरांत छापलेलें भिती-पत्रक लावलेलें होतें.

२७ फेब्रुवारी १९३१

## "५००० रु. इनाम:५००० रु. इनाम"

हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मीचा सेनापति म्हणून ओळखला जाणारा चंद्रशेखर आजाद याला पकडून देणारास अथवा त्याची पुरेशी माहिती देणारास ५००० रु. बक्षिस देण्यांत येईल.

सदरहू तरुण १९२५ पासून फरारी असून त्यानें चोऱ्या, दरोडे व खून यांत भाग घेतलेला आहे. त्याला शक्य तों लवकर पकडावें अशी सरकारची इच्छा आहे.

उंची ५ फूट ६॥ इंच, गौर वर्ण, बलवान शरीर, रुंद चेहरा, भव्य कपाळ, रुंद छाती, बारीक पण चमकदार डोळे, कोरीव भिवया, सरळ नाक, वळविलेल्या टोंकदार मिशा, डाव्या कानाच्या पाळच्यामागें तीळ, डोक्याला टोपी घालीत नाहीं, वय सुमारें २७ वर्षे असें त्याचें वर्णन आहे.

वरील इसमाची माहिती अलाहाबाद शहराच्या कोतवालींत अथवा कोणत्याही पोलीस ठाण्यावर द्यावी.

या बाबतींत कसलीही मदत करणाऱ्या इसमास योग्य पारितोषिक मिळेल.

वीरशैवानें तें पत्रक शांतपणानें वाचलें व इतरांचे वरोबर तोही मनांत विचार करीत चालू लागला.

'या वेळचें पत्रक तर भलें मोठें काढलें आहे. छोटया जाहिरातींनीं काम भागेना म्हणून मोठालीं पत्रकें काढलेलीं दिसतात. पण पत्रकांनीं का चंद्रशेखर सांपडणार आहे! तो सिंह आहे! या चोरांनीं कितीही शेपटया आपटल्या तरी तो सांपडणें शक्य नाहीं. म्हणे ५००० रुपयांचें बक्षिस देतों. तुम्ही द्याल ५००० चें बक्षिस.

पण त्यानंतर आम्ही क्रांतिकारक तसल्या फितुराला काय बक्षिस देऊं माहिती आहे?... पण बक्षिस मोठें आहे हें खरें. ५००० रु. कांहीं लहान रक्कम नाहीं. ५००० रुपयांत कितीतरी गोष्टी करतां येतील. २–३ हजारांत एकादें लहानसें घर घेतां येईल. शिल्लक रुपये एका लहान कुटुंबाला ४–५ वर्षें तरी सहज पुरतील! खरेंच ५००० रुपये कांहीं लहान रक्कम नाहीं.'

विचारांच्या अशा तंद्रींत वीरशैव स्टेशनच्या आवाराच्या बाहेर पडला. थंडगार वारे वहात होते. दांत कुडकुडत होते. हात छातीला घट्ट लपेटून वीरशैव पुढें चालू लागला. विचारांची धांवती गाडी त्याच्याही पुढें जाऊं लागली. 'आतां कोठें जावयाचें? घरीं? घरीं जाऊन काय करावयाचें? आईच्या शिव्या खायच्या, हेमबालेच्या दु:खी आणि भुकेल्या चेहऱ्याकडे पहावयाचें, आणि धाकटा गोविंदा येऊन विचारील, 'दादा इतके दिवस कुठें होतास? आई तुझ्यासाठीं सारखी रडत होती' तेव्हां निगरगट्ट मनानें गुपचुप खोलींत जाऊन बसावयाचें! हरेराम! हरेराम! काय भयंकर अवस्था आहे! ..... ... इकडे ही अशी कडाक्याची थंडी! माझ्यासारख्या जवान माणसालाही सहन होत नाहीं. त्या तिघांची घरीं काय वाट झाली असेल! फाटक्या लुगड्यांत त्या दोघां मुलांना गुरगटून घेऊन आई कुडकुडत कशीबशी पडली असेल, तिला झोपही लागत नसेल.'

एवढ्यांत वीरशैवाचा समोरून येणाऱ्या कोणा इसमाला धक्का लागला. 'ए बेवकूफ'! अशी शिवी देऊन तो इसम पुढें चालू लागला. वीरशैवाचे विचार पुन्हां धांवू लागले. 'दे शिव्या! इकडून तिकडून शिव्या खाण्यासाठींच वीरशैवाचा जन्म दिसतो. देशाच्या स्वातंत्र्याचा विडा उचलला, क्रांतिकारक झालों, त्यामुळें घरीं पैसा देऊं शकत नाहीं म्हणून घरच्यांनीं शिव्या द्यावयाच्या! चंद्रशेखरच्या खास आज्ञेनें पोलीसची अंत:स्थ बातमी काढावी म्हणून पोलिसांशीं संबंध ठेवणें सुरू केलें, तर त्याचा परिणाम म्हणून ज्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करतों ते मित्र 'मी फितुर झालों' असें समजतात, त्यांनीं माझेकडे संशयानें पहावयाचें, त्यांनीं

शिव्या द्यावयाच्या! रस्त्यांतून जाणारे येणारे भावंडांना व आईला उपाशी मारणारा हा गाढव म्हणून बोट दाखवतात व ते शिव्या देतात! माझा जन्मच केवळ शिव्या खाण्यासाठीं असावा! ..... '

पण आम्हां क्रांतिकारकांच्या नेत्यांना आपल्या अनुयायांच्या घरची चौकशी करावी, अनुयायांना उपास पडले तरी घरच्यांना उपास पडणार नाहींत अशी कांहीं व्यवस्था करावी इतकी साधी गोष्ट कळू नये काय? ... .. पण खरें म्हणजे त्यांच्याही घरीं तशीच स्थिति आहे.. '

वीरशैवाचें डोकें विचारानें भणाणून गेलें. आधींच कडाक्याची थंडी, अंगांत धड कपडे नाहींत, पोटांत भूक लागलेली, डोळ्यां-समोर भावंडांच्या हालांचें चित्र, या सगळ्या गोष्टींनीं तो थकला; रस्त्यावर कडेला असलेल्या एका घराच्या ओटयावर तो क्षणभरासाठीं बसला.

इतका वेळ पावेतों पहाट संपून सकाळचे ७ वाजण्याची वेळ आली होती. एव्हांना चांगलेंच उजाडलें होतें. रस्त्याची ये-जाही वाढली होती. इतक्यांत एक इसम जाहिराती वांटीत आला व दोन तीन जाहिराती वीरशैवाच्या हातांत देऊन चालता झाला. वीरशैव जाहिरात पाहूं लागला तों त्याचे तोंडून एक शिवी बाहेर पडली. जाहिरातींत तोच मजकूर होता.

"५००० रुपये बक्षिस ! ५००० रुपये बक्षिस !
चंद्रशेखर आजाद याला पकडणाऱ्यास
'५००० रुपये बक्षिस.
हा तरुण ८ दिवसांपूर्वींच अलाहाबादेंत आलेला होता असें निश्चित समजतें. अजूनही तो अलाहाबादेंत असेल. पोलिसांनीं व लोकांनीं लक्ष ठेवावें."

वीरशैवानें शिवी हांसडून जाहिराती फाडल्या व तो मनांत म्हणाला, 'हे ५००० रु. माझ्याभोवतीं असे घोटाळत कां आहेत ?

वीरशैव झटकन उठला व घराकडे झटझट चालूं लागला. पण तो जसजसा घराच्या जवळ आला तसतशी त्याचीं पावलें जड पडूं लागलीं. घरापाशीं येतांच तो थबकला. आंतून घरमालकाचा आवाज ऐकू येत होता.

" सहा महिन्यांचें भाडें थकलें आहे. चार दिवसांत भाडें द्याल तर ठीक आहे, नाहींतर हात धरून घराबाहेर काढीन. ... ... ..."

"रायसाहेब जरा सबूर करा; मुलगा गांवाला गेला आहे, तो आला कीं भाडें देतें. मी बायको माणूस चार दिवसांत ... ..."

वीरशैवाच्यानें तें संभाषण ऐकवेना. 'घरीं जावयाचेंच तर कांहीं तरी पैसे घेऊन जावयाचें, त्याशिवाय घरांत पाऊल टाकायचें नाहीं, भाड्याचा कांहीं तरी तुकडा त्या मालकाच्या अंगावर फेंकला पाहिजे' असें त्यानें मनांत ठरवून पावलें माघारीं वळविलीं. 'आतां कोठें जावें? चला कार्यालयांत. तेथें जाऊन थोडावेळ वसूं या, कांहीं सुचेल त्यांतून!'

तो माघारी वळला व झरझर पावलें टाकीत शहराच्या मध्यभागीं असलेल्या बाजारपेठेंत आला. तेथें एका मोठ्या इमारतीवर 'सेंट्रल लॉज' नांवाची पाटी लावलेली होती त्या इमारतींत शिरला. वरच्या दिवाणखान्यांत अनेक मंडळी फराळाचे पदार्थ खात होती. वीरशैव त्या कोणाकडेही लक्ष न देतां दिवाणखाना ओलांडून गेला. पलीकडच्या खोलींत एक स्वयंपाकी पुऱ्या तळत होता. वीरशैवानें त्याला म्हटलें, "आज 'रसगुल्ल्यांचा' बेत आहे ना?" वीरशैवानें रसगुल्ला या शब्दांवर विशेष जोर दिला होता.

स्वयंपाक्यानें परवलीचा शब्द ओळखून म्हटलें "हो पलीकडच्या खोलींत बसा.

वीरशैव पलीकडल्या खोलींतील जिन्यानें खालीं उतला आणि खालच्या मजल्यावरच्या एका खोलींत जाऊन बसला. खोलींत एक सतरंजी होती. दोन चार तक्के तेथें पडले होते. खोलीला तीन दारें होती. त्यापैकीं दोन दारें मागच्या गल्लींतील रस्त्यावर उघडणारीं होतीं.

वीरशैव उद्वेगलेल्या मन:स्थितींत खोलीची कडी काढून आंत गेला, तेथेंच सतरंजीवर त्यानें देह टाकून दिला. त्याला चटकन झोंप लागली.

चंद्रशेखर आजादच्या प्रसिद्ध हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मीच्या केंद्रकार्यालयांत वीरशैव झोंपला होता.

★ ★ ★

**अर्धा पाऊण** तास झोप लागली असेल नसेल तोंच कोणीतरी त्याला गदगदां हालवून जागें केलें. वीरशैव जागा होऊन पहातो तों कोणी धोतर उपरण्यांतील व्यक्ति त्याला हलवीत होती. त्या व्यक्तीनें डोक्याला रुमाल गुंडाळला होता.

"कोण? चंद्रशेखर?" वीरशैवानें उठून आनंदाश्चर्यानें विचारलें. "अरे काय धाडस हें! तूं या दिवसांत इथें!"

"मग काय भीति आहे कां कोणाची? इथें म्हणजे माझ्या घरांत आहे. तें असो. आधीं उठ लौकर, चूळ भर. पुरी भाजी मागविली आहे तिचा समाचार घेऊं व मग गप्पागोष्टी करूं."

चंद्रशेखरच्या पाठोपाठ पुरीभाजीचे ताट आलें. चंद्रशेखर भुकेला होता. वीरशैव दोन दिवसांचा उपाशी होता. दोघांनींही पुरी–भाजीवर हात मारला. खातांखातां वीरशैवानें म्हटलें.

"चंद्रशेखर तुझें धाडस ठीक आहे, पण पोलीस तुझ्या अगदीं मागावर आहेत. जिकडेतिकडे तुला पकडून देण्याबद्दल ५००० रुपयांचें बक्षिस जाहीर करणारीं पत्रकें चिकटविलेलीं आहेत. तूं आठ दिवसांपूर्वी येऊन गेलास हें सुद्धां पोलिसांना माहीत आहे. तुझें सविस्तर वर्णन दिलेलें आहे. खरेंच, चंदर तूं असा धोका घेणें बरें नाहीं."

"ओ, वा! मोठाच उपदेशक झालास कीं! पण ध्यानांत ठेव, मला पकडावयास पोलिसाला नाहीं पोलिसच्या बापाला खालीं उतरावें लागेल. कानपूर स्टेशनची हकीकत तुला माहीत आहे ना! हमालाच्या डोक्यावर बॉम्ब्जनीं भरलेली ट्रंक देऊन सरळ पोलिसांच्या व इन्स्पेक्टरच्या डोळ्यांदेखत मी स्टेशन पलीकडे गेलों. कोणाची छाती झाली नाहीं वर मान करून पहावयाची."

"तें सर्व कबूल, पण आतां दिवस वेगळे आहेत."

"बरें बॉंब्जच्या ट्रंकेची हकीकत जुनी झाली. सध्यांच्या 'वेगळ्या' दिवसांतील नवी हकीगत सांगतो. गेल्या वर्षी कानपूरचाच डी. एस्. पी. मला पकडण्यासाठीं अट्टाहास करून होता. त्याच्याच मोटारवर सबंध ऑक्टोबर महिना मी मोटार ड्रायव्हर म्हणून होतों. फरारी चंद्रशेखर आजादला पकडण्यासाठीं साहेब बहादुर निघाले कीं मीच त्यांची मोटार हांकीत असे."

"हो खरी गोष्ट. सुखदेवराजनें मला नुकतीच ती हकीकत सांगितली. पण तरी सुद्धां ते दिवस आतां खरोखरीच राहिले नाहींत. आतां आपले मित्र जवळजवळ शिल्लक राहिलेले नाहींत. पहिल्या लाहोर कटाचे खटल्यांत भगतसिंह, राजगुरु इत्यादि चांगले चांगले क्रांतिकारक पकडले गेले. त्यानंतर दुसऱ्या लाहोर कटाच्या खटल्यांत यशपाल व भगवती चरण इत्यादि बाकीचे मित्र पकडले गेले. कोणी भुसावळला सांपडले, तर कोणी मिरतला सांपडले. आतां इनमीन ४–५ जण आपण जुन्यापैकीं आहोंत. अशा स्थितींत तूं पकडला गेलास तर साराच ग्रंथ आटोपला असें होईल."

"पण मी पकडला जात नाहीं हें निश्चित समज."

"त्याचा अर्थ तूं जिवंत पोलिसांच्या हातीं लागणार नाहींस हें मलासुद्धां कबूल; पण हा अर्थ कबूल केला तरी आपल्या कार्यावरील आपत्ति संपणार नाहीं."

"तें असूं दे. तुझ्याकडील वार्ता काय आहे?"

"तेंच तर इतका वेळ सांगत आहे. खास तुला पकडण्यासाठीं सरकारनें सी. आय. डी. डी. एस. पी. नाटबॉबर यांची नेमणूक नुक्तीच केली आहे. डीवाय. एस. पी. विश्वेश्वरसिंह ठाकूर यांनीं त्यांना मदत करावयाची आहे. ५००० रुपयेच काय पण आणखी लागेल तेवढा पैसा खर्च करण्याची त्यांची तयारी आहे, पण चंद्रशेखर माझें तुला या खेपेस निक्षून सांगणें आहे. पोलीसकडे जाऊन, त्यांचा बातमीदार म्हणून राहून तुला त्यांच्या बातम्या पुरवावयाच्या हें काम आपल्याला साफ नको."

वीरशैव उद्वेगलेल्या मनःस्थितींत खोलीची कडी काढून आंत गेला, तेथेंच सतरंजीवर त्यानें देह टाकून दिला. त्याला चटकन झोंप लागली.

चंद्रशेखर आजादच्या प्रसिद्ध हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मीच्या केंद्रकार्यालयांत वीरशैव झोंपला होता.

★ ★ ★

**अर्धा पाऊण** तास झोप लागली असेल नसेल तोंच कोणीतरी त्याला गदगदां हालवून जागें केलें. वीरशैव जागा होऊन पहातो तों कोणी धोतर उपरण्यांतील व्यक्ति त्याला हलवीत होती. त्या व्यक्तीनें डोक्याला रुमाल गुंडाळला होता.

"कोण? चंद्रशेखर?" वीरशैवानें उठून आनंदाश्चर्यानें विचारलें. "अरे काय धाडस हें! तूं या दिवसांत इथें!"

"मग काय भीति आहे कां कोणाची? इथें म्हणजे माझ्या घरांत आहे. तें असो. आधीं उठ लौकर, चूळ भर. पुरी भाजी मागविली आहे तिचा समाचार घेऊं व मग गप्पागोष्टी करूं."

चंद्रशेखरच्या पाठोपाठ पुरीभाजीचे ताट आलें. चंद्रशेखर भुकेला होता. वीरशैव दोन दिवसांचा उपाशी होता. दोघांनींही पुरी–भाजीवर हात मारला. खातांखातां वीरशैवानें म्हटलें

"चंद्रशेखर तुझें धाडस ठीक आहे, पण पोलीस तुझ्या अगदीं मागावर आहेत. जिकडेतिकडे तुला पकडून देण्याबद्दल ५००० रुपयांचें बक्षिस जाहीर करणारीं पत्रकें चिकटविलेलीं आहेत. तूं आठ दिवसांपूर्वीं येऊन गेलास हें सुद्धां पोलिसांना माहीत आहे. तुझें सविस्तर वर्णन दिलेलें आहे. खरेंच, चंदर तूं असा धोका घेणें बरें नाहीं."

"ओ, वा! मोठाच उपदेशक झालास कीं! पण ध्यानांत ठेव, मला पकडावयास पोलिसाला नाहीं पोलिसच्या बापाला खालीं उतरावें लागेल. कानपूर स्टेशनची हकीकत तुला माहीत आहे ना! हमालाच्या डोक्यावर बॉम्ब्जनीं भरलेली ट्रंक देऊन सरळ पोलिसांच्या व इन्स्पेक्टरच्या डोळ्यांदेखत मी स्टेशन पलीकडे गेलों. कोणाची छाती झाली नाहीं वर मान करून पहावयाची."

"तें सर्व कबूल, पण आतां दिवस वेगळे आहेत."

"बरें बाँबूजच्या ट्रंकेची हकीकत जुनी झाली. सध्यांच्या 'वेगळ्या' दिवसांतील नवी हकीगत सांगतो. गेल्या वर्षीं कानपूरचाच डी. एस्. पी. मला पकडण्यासाठीं अट्टाहास करून होता. त्याच्याच मोटारवर सबंध ऑक्टोबर महिना मी मोटार ड्रायव्हर म्हणून होतों. फरारी चंद्रशेखर आजादला पकडण्यासाठीं साहेब बहादुर निघाले कीं मीच त्यांची मोटार हांकीत असे."

"हो खरी गोष्ट. सुखदेवराजनें मला नुकतीच ती हकीकत सांगितली. पण तरी सुद्धां ते दिवस आतां खरोखरीच राहिले नाहींत. आतां आपले मित्र जवळजवळ शिल्लक राहिलेले नाहींत. पहिल्या लाहोर कटाचे खटल्यांत भगतसिंह, राजगुरु इत्यादि चांगले चांगले क्रांतिकारक पकडले गेले. त्यानंतर दुसऱ्या लाहोर कटाच्या खटल्यांत यशपाल व भगवती चरण इत्यादि बाकीचे मित्र पकडले गेले. कोणी भुसावळला सांपडले, तर कोणी मिरतला सांपडले. आतां इनमीन ४–५ जण आपण जुन्यापैकीं आहोंत. अशा स्थितींत तूं पकडला गेलास तर साराच ग्रंथ आटोपला असें होईल."

"पण मी पकडला जात नाहीं हें निश्चित समज."

"त्याचा अर्थ तूं जिवंत पोलिसांच्या हातीं लागणार नाहींस हें मलासुद्धां कबूल; पण हा अर्थ कबूल केला तरी आपल्या कार्यावरील आपत्ति संपणार नाहीं."

"तें असूं दे. तुझ्याकडील वार्ता काय आहे?"

"तेंच तर इतका वेळ सांगत आहे. खास तुला पकडण्यासाठीं सरकारनें सी. आय. डी. डी. एस. पी. नाटबॉबर यांची नेमणूक नुक्तीच केली आहे. डीवाय. एस. पी. विश्वेश्वरसिंह ठाकूर यांनीं त्यांना मदत करावयाची आहे. ५००० रुपयेच काय पण आणखी लागेल तेवढा पैसा खर्च करण्याची त्यांची तयारी आहे, पण चंद्रशेखर माझें तुला या खेपेस निक्षून सांगणें आहे. पोलीसकडे जाऊन, त्यांचा बातमीदार म्हणून राहून तुला त्यांच्या बातम्या पुरवावयाच्या हें काम आपल्याला साफ नको."

"तूं नेहमींच्या रंगांत येऊं लागलास!"

"नेहमींचा रंग वगैरे कांहीं नाहीं, या दुटप्पी भूमिकेचा मला फार त्रास होतो. तिकडून ते पोलीस छळतात, इकडे आपले लोक व आपलीं नवीं मुलें मला कोतवालींत वारंवार जातांना पाहून माझ्याबद्दल संशय बाळगतात. तुझीच आज्ञा म्हणून इतके दिवस काम केलें; आतां यापुढें शक्य नाहीं. ही अवज्ञा असेल तर त्याबद्दल लागेल ती शिक्षा कर. शिक्षेला मी तयार आहें."

"अरे हो! हो! बेताबेतानें घे."

"बेताबेतानेंच इतके दिवस घेतलें. पण आतां तुटायची वेळ आली आहे."

"उगाच बहकूं नकोस. एक महिना दोन महिने तरी कळ काढावीच लागेल. महिन्या दोन महिन्यानंतर आपलें कार्य कांहीं वर्षांपुरतें स्थगित ठेवण्याचा माझा विचार आहे. हल्लींचे दिवसांत कांहींही मोठें कार्य करावयाचें म्हटलें तर लोकच कोठें आहेत आपल्याजवळ? आहेत तीं कोंवळीं पोरं आहेत. राजकीय परिस्थितीकडे पहावें तो कायदेभंगाच्या चळवळीचा भर पूर्ण ओसरला आहे. सरकार व गांधीजी यांच्यांत समेट निश्चितपणें होणार व काँग्रेस कोणत्या ना कोणत्या सनदशीर मार्गाचा अवलंब करणार. अशा स्थितींत कांहीं सामुदायिक उठाव करतां येईल अशी शक्यता दिसत नाहीं. तेव्हां सर्वांनींच कांहीं दिवस विश्रांति घ्यावी. १९१९ नंतर १९२५ च्या काकोरीच्या हल्ल्यापर्यंत जशी कांहीं दिवस विश्रांति घेतली त्याप्रमाणें तीन चार वर्षें विश्रांति घेऊं. भगतसिंग, राजगुरु आदि फांसावर जातील, बाकीचे जन्मठेपीवर जातील, त्यांच्या जागीं नव्या तरुण क्रांतिकारकांची भरती करूं व ३५-३६ च्या सुमारास हा जंग पुन्हां सुरू करूं."

"भगतसिंग-राजगुरु यांच्यासाठीं तूं जवाहरलालांना भेटावयास जाणार होतास त्याचें काय झालें?"

"तेवढ्यासाठीं तर मी गेल्या २० दिनांकाला येथें आलों होतों, त्यापूर्वीच त्यांना भेटणार होतों, पण म्हटलें मोतिलालांचा मृत्यु झाला ६ फेब्रुवारीला; त्यांचा निदान बारावा दिवस तरी उलटूं

१३३५५ ५७३१५

द्यावा. जवाहरलालांचें मन जरा मोकळें झालें कीं जाऊन भेटावें, त्याप्रमाणें दि. २० ला रात्रीं त्यांना जाऊन भेटलों."

"मग काय बोलणें झालें?"

"बोलणें काय होणार तें ठरलेंच होतें. चंद्रशेखर आजाद म्हणून म्हणतात तो मीच असें समजल्यावर त्यांना जरा कसेंसेंच वाटू लागलें. मी त्यांना सरळ विचारलें कीं गांधी–अर्विन वाटाघाटी सध्यां दिल्लीला चालू आहेत, त्यामध्यें आमच्यासबंधीं काँग्रेसची भूमिका काय? भगतसिंग–राजगुरु यांना सोडा म्हणत नाहीं; पण त्यांची फांशी तरी रद्द व्हावी अशी मागणी तुम्ही कराल काय? जवाहर-लालांनीं निश्चित असें उत्तर दिलें नाहीं; ते म्हणाले, 'क्रान्तिकार-कांची व्यक्तिगत अत्याचाराची अथवा दहशतवादाची भूमिका जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत अशी मागणी काँग्रेसला करतां येणें नैतिक दृष्ट्या कठीण आहे.' मी म्हटलें, "ज्याला तुम्ही दहशतवाद म्हणतां तो दहशतवादही नाहीं किंवा तो अत्याचारही नाहीं. व्यक्तीव्यक्तींनीं ब्रिटिश सत्तेशीं घेतलेली ती झुंज आहे. अशी झुंज घेत रहावें या आमच्या भूमिकेची आतां आवश्यकता उरलेली नाहीं. लोकजागृतीसाठीं त्या गोष्टी होत्या. ती लोक-जागृति आतां झालेली आहे. म्हणून व्यक्तिगत क्रांतिकार्याची भूमिका आम्ही सोडल्यासारखीच आहे."

'मग जवाहरलालांनीं काय म्हटलें?" वीरशैवानें विचारलें.

"एक नाहीं तों दुसरेंच शेंपूट त्यांनीं काढलें. व्यक्तिगत क्रांति-कार्याची भूमिका आम्ही सोडली म्हटल्यावर ते म्हणाले, 'केवळ तेवढ्यानेंच भागणार नाहीं. तुम्ही सर्वांनीं अहिंसेचें तत्त्वज्ञान शिरोधार्य केलें, तरच महात्मा गांधींना तुमच्याबद्दल कांहीं खटपट करतां येईल.' मी म्हटलें स्वतःच्या यत्किंचित् प्राणासाठीं आम्ही कांहींच्या बाहींच कबूल करणार नाहीं. व्यक्तिगत क्रांतिकार्य, तुम्ही म्हणतां ते अत्याचार आम्हांला नापसंत नाहींत. पण ते पुरेसे नाहींत. सामुदायिक उठावणी करून ब्रिटिशांशीं युद्ध केल्या-खेरीज भारत स्वतंत्र होणार नाहीं हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे.

अशी ही आमची भूमिका आहे. या स्थितींत अहिंसेचें तत्त्वज्ञान आम्हांला मान्य होणें कधींही शक्य होणार नाहीं."

"पुढें?"

"येवढ्यावरच बोलणें संपलें. मला जास्त वेळ थांबतां येणें शक्य नव्हतें. अखेर मी त्यांना म्हटलें कीं, अहिंसा तत्त्वतः मान्य–अमान्य हें सोडा. पण यापुढें व्यक्तिगत क्रांतिकार्याची आवश्यकता नाहीं ही आमची भूमिका निश्चित आहे. तरी सुद्धां सरकार आमच्यामागें हात धुवून लागलें आहे, तें जोंपर्यंत आमच्या मागें आहे तोंपर्यंत आहे तीच परिस्थिति राहील. सरकार शांत राहिलें तर आम्हीही शांततेनें व्यवहार करूं, इतकें बोलून मी निघालों."

"एकूण भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांची आशा आपण सोडली पाहिजे ?"

"हो असाच त्याचा अर्थ."

"मग आतां तुझा विचार काय?"

"माझा विचार मघां सांगितलाच. कांहीं दिवस विश्रांति घेऊन पुन्हां मोठ्या प्रमाणावर कांहीं करावें असा बेत आहे. मी आतां येथें राहणार नाहीं. आज रात्रीं येथून निघून कलकत्त्याला जाईन. तेथील कार्यकर्त्यांचे बरोबर विचारविनिमय करीन व तेथून शक्य झालें तर जपानमध्यें श्री. रासबिहारी बसू यांच्याकडे जाण्याचा विचार आहे. तेच माझे गुरु आहेत. त्यांना भेटल्यावर मग पुढच्या योजना!"

"म्हणजे आज तूं येथून निघणार तो कदाचित् ४–५ वर्षेंही परत येणार नाहींस?"

"तसेंच कांहीं नाहीं; पण, नाहीं येणार कदाचित्."

"तर मग आम्हांला कांहीं सूचना, पुढें काय करावें, कोठें असावें हें समजलें पाहिजे."

"तें तुम्हांला मी कलकत्त्याहून कळवीन."

"आणिक एक गोष्ट राहिली. तुझ्या मातोश्रींना भेटणार कीं नाहीं? मी त्यांचेकडे १५ दिवसांपूर्वी गेलों होतों. त्या अक्षरशः

रडल्या. माझ्या आईला घरीं मी नसलों तरी दुसरा मुलगा आहे, मोठी मुलगी आहे, तुझ्या आईला तू नसल्यावर कोणीच नाहीं. तेव्हां जाण्यापूर्वी एकदां तरी भेटून जा."

चंद्रशेखरला जुन्या आठवणी आल्या. १९२५ सालीं काकोरीला आगगाडीवर छापा घालून सरकारी खजिना लुटला त्या वेळीं तो जो फरारी झाला तेव्हांपासून आईची त्यानें भेट म्हणून घेतली नव्हती. कारण आईवर व घरावर पोलिसांचा जवळ जवळ सारखा पहारा असावयाचा. आतां तर ४–५ वर्षें परदेशीं जावयाचें. मातृभक्त असलेलें त्याचें अंत:करण किंचित् मृदु झालें.

"तें सर्व खरें वीरशैव, पण आईची भेट घेणें शक्य कोठें आहे?"

"काय शक्य नाहीं? सर्व शक्य आहे. आज रात्रीं तूं जाणार तर दुपारच्या आंत मी त्यांचेकडे निरोप पोंचवितों. तूं दुपारीं ४॥ला आल्फ्रेड पार्कमध्यें पिंपळाच्या मोठ्या झाडापाशीं रहा. मातोश्री तेथें येतील. चारपांच मिनिटें बोलून मग तूं निघून जा."

"ठीक आहे, चालेल. मी सुखदेवराजाला घेऊन आल्फ्रेडपार्कमध्यें येतों."

"मग पक्कें ठरलें तर! दुपारीं ४॥, आल्फ्रेड पार्क."

* * *

खाणें आटोपून बोलणें संपलें व सेंट्रल लॉजमधून वीरशैव निघाला तों दुपारचे ११॥ झाले होते. वीरशैव बाहेर पडला. प्रथम स्वगृहीं जावें, तेथें आईची भेट घेऊन कांहीं वेळानें चंद्रशेखरच्या घरीं जावें असा त्यानें बेत केला. घराची वाट चालतां चालतां त्याच्या मनांत विचार येऊं लागले, 'चंद्रशेखर सुद्धां आपल्या आईची भेट घेणार. आईशीं सुखसंवाद करणार. आम्ही मात्र आमच्या आईला सुख देणार नाहीं ! चंद्रशेखरच्या आईचें ठीक आहे. तो फरारी झाला त्यामुळें आसपासच्या लोकांनीं व पुढाऱ्यांनीं तिला कांहीं कमी पडूं दिलें नाहीं. पण आमच्या घरीं ? मी धड तुरुंगांत नाहीं, धड फरारी नाहीं. लोकदृष्टीनें कार्यकर्ता नाहीं. उलट लोकदृष्टीनें फितूर ! हो खरोखरीच फितूर ! तरी बरें, पोलिसांकडून जो पैसा मिळाला तो सुद्धां

साराच्या सारा मी चंद्रशेखरच्या हवालीं केला ! काय जिणें आहे ! सत्कार्य करून वर काळिमा ! पण असो. कोणीतरी हीं कामें केलींच पाहिजेत!'

१२ च्या सुमाराला वीरशैव घरापाशीं आला. त्याच्यानें आंत जाववलें नाहीं. तो बाहेरच थबकला. आंतून मालकाच्या नोकराची दरडावणी ऐकू आली. "मालकांनीं सांगितलें आहे, तुमचा मुलगा वगैरे आम्ही कांहींही ओळखत नाहीं. आज संध्याकाळचे आंत भाडें मिळालेंच पाहिजे. तो दिवटा मुलगा पोलीसला फितून काँग्रेसच्या बातम्या त्यांना देतो! पैसे कमावतो आणि घराचें भाडें द्यावयाला म्हणे पैसे नाहींत. ही थापेबाजी चालावयाची नाहीं . . .'

वीरशैवाचे डोकीवर कुऱ्हाडच बसली. तो तसाच मागें फिरला. 'कांहींही करून आतांचे आतां पैसे मिळविलेच पाहिजेत, घरभाडें देऊन टाकून त्या कुत्र्याला लाथा मारून बाहेर काढलेंच पाहिजे. ही विटंबना थांबलीच पाहिजे.' वीरशैवाचें डोकें तापून गेलें. 'काय करावें? कोठून पैसे आणावेत? यावेळीं पैसे कोण देणार? पैसे मिळण्याची शक्यता कोठें आहे? मित्र ? ते तर तुच्छतेनें वागवीत असतात. नातेवाइक ? त्यांच्याकडे पाहण्याची सोय नाहीं. चंद्रशेखरकडे पैसे मागावेत? म्हणजे एकादशीनें शिवरात्रीकडे जाण्याचा प्रसंग आहे!'

कोठून पैसे आणावयाचे? वीरशैवाच्या डोक्यांत एक चमक उठली. 'असें केलें तर? पोलीसकडे जावयाचें; कांहींतरी बातमी द्यावयाची. त्यांचेकडून २०० रु. तांतडीनें आणावयाचे, पोलीसकडून मिळालेले पैसे घरीं खर्च करावयाचे नाहींत हा नियम असला तरी तूर्त ते घरीं खर्च करावयाचे, मग सांगूं चंद्रशेखरला. पण पोलीसला बातमी तरी काय द्यावयाची? कांहीं महत्त्वाची बातमी दिल्याशिवाय ते पैसे देणार नाहींत. मग काय बातमी द्यावी? . द्यावी चंद्रशेखरचीच! सांगावें संध्याकाळीं ६॥ला तो आल्फ्रेड पार्कमध्यें आईला भेटणार आहे म्हणून. प्रत्यक्ष भेट ६॥ ला होऊन चंद्रशेखर त्या जागेवरून निघूनही गेलेला अस-

पा. क्र. आ. ना. २२०

णार, मग तो यांच्या बापाच्याही हातांत सांपडणार नाहीं. कदाचित् त्याच्या आईला पकडतील; ती सांगेल ४॥लाच भेट झाली म्हणून. मग पोलीस काय करतील? आईला त्यांना दुसऱ्या दिवशीं सोडून द्यावेंच लागेल. आपल्याला पोलीस कांहीं म्हणूं शकणार नाहींत, कारण बातमी खरी दिली होती. वेळ कदाचित् चंद्रशेखरनें बदलली असेल, त्याला मी काय करणार! —'

वीरशैवाचें विचारचक्र जोरांत सुरू झालें. त्याच्या तापलेल्या डोक्याला सर्व गोष्टी सुतासारख्या सरळ दिसल्या. 'ठरलें. निश्चित ठरलें. यांत कांहींही धोका नाहीं. ठाकूर विश्वेश्वरसिंहाला बातमी द्यावयाची, पैसे घ्यावयाचे व मग चंद्रशेखरच्या आईला ४॥ चा निरोप कळवावयाचा, तेथून घरीं जाऊन त्या कुत्र्याला लाथ घालायची . . .'

त्याचा विचार अगदीं पक्का झाला. त्याबरोबर पावलें आपोआपच भरभर पडत गेलीं. थोडक्याच वेळांत तो कोतवालींत आला. ठाकूर विश्वेश्वरसिंहांच्या खोलींत गेला, त्यांना बातमी दिली, पैसे घेतले, जिन्यावरून खालीं आला. व कोतवालींतून बाहेर पडणार तोंच एक इन्स्पेक्टर धांवत आला व म्हणाला, "तुम्हांला थोरलेसाहेब नाटबॉवर बोलावीत आहेत. चला वर लौकर."

वीरशैवाच्या मनांत चर्र झालें. थोरलेसाहेब कशासाठीं बोलावणार? त्यांचा काय विचार असेल? आपल्याला ते त्यांच्याबरोबर यावयाला लावणार कीं काय?

इन्स्पेक्टर वीरशैवाला वर घेऊन गेला व एका खोलींत त्याला बसवून म्हणाला, "जरा येथें बसा थोरलेसाहेब इतक्यांत येतील. त्यांना तुमच्याशीं कांहीं बोलावयाचें आहे.'

इन्स्पेक्टर बाहेर गेला. ५ मिनिटें झालीं, १० झालीं, तास झाला—थोरलेसाहेब येण्याचें चिन्हही नव्हतें. खोलीच्या दारापाशीं दोन हत्यारबंद पोलीस पहारा करूं लागले.

वीरशैवाला सारें कळून चुकलें. तो फसला होता. चंद्रशेखरही त्यांत फसला होता. त्यानें डोकें आपटून घेतलें, तो मोठ्यानें ओरडूं लागला, विश्वेश्वरसिंहांना हांका मारूं लागला, पण कोणीही आलें नाहीं.

★ ★ ★

ठरल्याप्रमाणें सुखदेवराजला घेऊन चंद्रशेखर सायंकाळीं ठीक साडे चारला आल्फ्रेड पार्कमध्यें गेला. सुखदेवराजबरोबर बोलतां बोलतां ५ ची वेळ होत आली, पण मातोश्री आल्या नव्हत्या. त्यानें सुखदेवराजला म्हटलें, "सुखदेवा, हा काय प्रकार आहे? आई अजून कां आली नाहीं? कांहीं घोटाळा आहे मला वाटतें. निघावें येथून; येथें जास्त वेळ थांबण्यांत अर्थ नाहीं."

सुखदेवराज म्हणाला, "असें करूं, तूं थोडा वेळ थांब. मी सायकलवरून जाऊन तुझ्या घरीं चौकशी करून येतों. अगदीं झटकन् परत येतों."

सुखदेवराज निघाला. तो आल्फ्रेड पार्कचे जवळ असलेल्या एका मित्राची सायकल घेऊन दौडत निघाला.

चंद्रशेखर कांहीं वेळ इकडे तिकडे हिंडला. कांहीं वेळ पिंपळाचे झाडाखालीं बसला. कांहीं वेळ गाणीं गुणगुणला. ५ नंतर ५॥ ची वेळ झाली. अजूनही मातोश्री आल्या नव्हत्या. किंवा सुखदेवराज आला नव्हता.

याच सुमाराला नखशिखान्त सूटबुटांत असलेले दोघे गृहस्थ पार्कमध्यें शिरले. एक गौरकाय इंग्रज होता. दुसरा कोणी हिंदु इसम वाटत होता.

तितक्यांत सुखदेवराज सायकलवरून आला, तो थेट वर वर्णन केलेल्या दोघां व्यक्तींचे अंगावरून पुढें गेला. जात असतांना त्या दोघांकडे त्यानें निरखून पाहिलें. चंद्रशेखरच्या जवळ जातांच त्यानें सायकलवरून उतरून त्याला म्हटलें "चंद्रशेखर कांहींतरी जबर-दस्त घोंटाळा आहे. घरांभोंवतीं गुप्त पोलिसांचें जणूं कडेंच आहे. मी घरांत गेलोंही नाहीं; आणि ते दोघे पाहिलेस का? तो काळा

तो सी. आय. डी. डीवाय. एस. पी. ठाकूर विश्वेश्वरसिंह, दुसरा बहुधा डी. एस. पी. नाटबॉबर असला पाहिजे. आपण येथून लौकर निघणेंच बरें. तूं सायकल घे आणि मागच्या दारानें निघून जा. मी पाठोपाठ येतोंच."

"अरे ते दोघेच आहेत ना? मग ते कां आपल्याला अडव-णार? तूं सायकलवर आहेस तसाच पुढें हो, मी येतोंच."

असें त्यांचें संभाषण चाललें आहे तोंच ठाकूर विश्वेश्वरसिंह व नाटबॉबर यांना हवे असलेले लोक ते हेच असावेत असा संशय आला. त्यांचेपासून सुमारें ३० फुटांवर येऊन ठाकूर विश्वेश्वर-सिंहानें विचारलें, "ए तू कौन है? तेरा नाम क्या है?"

चंद्रशेखरनें उत्तर केलें नाहीं. विजारीच्या खिशांतून त्यानें भर-लेलें पिस्तूल काढलें व चटकन विश्वेश्वरसिंहावर झाडलें. या गोष्टी इतक्या त्वरित झाल्या कीं पहिली गोळी चुकली.

"सुखदेवा तूं नीघ लौकर---लौकर जा, मी या दोघांचा समा-चार घेऊन येतोंच." असें म्हणून दुसरी गोळी चंद्रशेखरनें नाट-बॉबरवर मारली.

सुखदेवराज सायकलवर बसून गेला. तेवढ्यांत दोघा पोलीस अधिकाऱ्यांनीं जवळपास आडोसा घेतला व गोळीबाराला सुरुवात केली; त्यांची छाती धडधडत होती. समोर बहुधा चंद्रशेखरच असावा अशी त्यांची खात्री झाली. त्यांच्या पहिल्या चार गोळ्या चंद्रशेखरच्या जवळपासून गेल्या, त्याला एकही लागली नाहीं.

चंद्रशेखरनें त्यानंतर बरोबर नेम घेतला व रिव्हॉल्व्हरची तिसरी गोळी झाडली, ती बरोबर नाटबॉबरच्या उजव्या हातावर बसली, त्यांच्या हातांतून रिव्हॉल्व्हर गळून पडलें; तें पाहून चंद्र-शेखर मागें जाऊं लागला, तों ठाकूर विश्वेश्वरसिंहानें गोळी मारली ती त्याच्या उजव्या मांडींत शिरली. त्यामुळें चालतां येईना.

"अरे च्या! बरें, तुला हात दाखवितों." असें म्हणून चंद्रशेख-रनें चौथी गोळी झाडली. ती विश्वेश्वरसिंहाच्या तोंडावर लागली, तोही खालीं पडला.

चंद्रशेखर निश्चित होऊन माघारी जाऊं लागला; पण पायांत कळ जबरदस्त येत होती. पाऊल पुढें टाकवेनाही.

पार्कमधील गोळीबार ऐकून बाहेर मोटारींत असलेले डी. एस. पी. साहेबांचे चौघे खास शिपाई धांवत आले. त्यांनीं झाडाआडून चंद्रशेखरवर गोळीबार करण्यास सुरुवात केली.

"आज आतां आटोपला ग्रंथ म्हणावयाचा" असें पुटपुटत चंद्रशेखरनें पिपळाच्या झाडाचा आश्रय घेतला व खिशांतलें दुसरेंही रिव्हॉल्व्हर काढून शत्रूवर झाडण्यास सुरुवात केली.

एकीकडे एकटा एक असा क्रांतिकारकांचा अद्वितीय सेनापति तर दुसऱ्या बाजूस ब्रिटिश सरकारचे दोन मोठे अधिकारी व चार शिपाई असा सामना १५–२० मिनिटें चालला होता.

तितक्यांत सशस्त्र पोलिसांनीं भरलेली मोटार बाहेरून आंत आली. बंदूकधारी ४० पोलीस उतरले व झाडाआडून लपून त्यांनीं गोळीबाराला सुरुवात केली.

चंद्रशेखर मनांत हंसला व पुटपुटला 'एकटयाला मारायला एवढा आटापिटा हं? बाकी पाहिजेच. मी कांहीं झालें तरी क्रांतिकारकांचा सेनापति आहें. त्यांच्या शंभरांना भारी आहे. पण आतां हें प्रकरण संपलें म्हणायचें. काडतुसें संपत आलीं."

आणिक थोडा वेळ चंद्रशेखरनें शत्रूच्या रोखानें गोळ्या झाडल्या. अखेर तो पुटपुटला, 'भगतसिंह, बेटया तूं कांहीं माझ्या आधीं स्वर्गांत जात नाहींस. राजगुरु–सुखदेव, तुमच्या सर्वांच्या आधीं मीच आणि कसा तर रणांगणांत मृत्यूशीं झुंज घेऊन!' असें पुटपुटतां पुटपुटतां त्यानें चटकन रिव्हॉल्व्हर कपाळाशीं नेलें व रिव्हॉल्व्हरमधली शेवटची गोळी झाडली.

बाहेरचा गोळीबार चालूच होता. अर्धा तासपर्यंत फैरीवर फैरी पोलिसांचेकडून चालू होत्या. मोठया लढाईतल्या सारख्या हालचाली करून नव्यानें आलेली ताज्या दमाच्या पोलिसांची तुकडी पिंपळाचे झाडामागें नेण्यांत आली. चंद्रशेखरच्या पिछाडीकडून गोळीबार सुरू झाला.

अर्धा तास असा गोळीबार होऊन चंद्रशेखरकडून प्रत्युत्तर येईना म्हटल्यावर हात तुटलेले नाटबॉबर व तोंड फुटलेले विश्वेश्वरसिंह दबकत दबकत पिस्तुलें घेऊन निघाले. चंद्रशेखर झाडामागें पडला होता. १० फुटांजवळ येऊन नाटबॉबरनें त्याला पुन्हां तीन गोळ्या मारविल्या. कांहींही हालचाल दिसली नाहीं, तेव्हां साहेब पुढें गेले. चंद्रशेखरच्या डोक्यावरचा रुमाल त्यांनीं काढून टाकला. व ते म्हणाले, "मेला एकदांचा! पण What a man! What a man!"

५ फूट ६॥ इंच उंचीचा तो भव्य देह, गौरवर्ण चेहरा, रुंद छाती, कोरीव भिवया, सरळ नाक; वय वर्षें २७ असा तो धीर-गंभीर पराक्रमी क्रांतिकारकांचा सेनापति पिंपळाचे झाडाखालीं स्वस्थ पडला होता.

त्याच्या शरीरांत बंदुकीच्या ७८ गोळ्या शिरल्या होत्या. तोंडावरून, हातांपायांतून, छातींतून रक्ताच्या धारा ओघळलेल्या होत्या. पण तशा स्थितींतही त्याच्या चेहऱ्यावर असीम आनंदाची तेजस्वी प्रभा फांकलेली होती.

---

**टीप :** मृत्यूनंतर श्री. चंद्रशेखरचें शव समारंभानें अलाहाबादेंत मिरविण्यांत आलें व नंतर त्याचें दहन झालें. श्री. पुरुषोत्तमदास टंडन यांनीं त्यांत पुढाकार घेतला. ज्या वृक्षाखालीं चंद्रशेखरला मृत्यु आला त्याची लोक पूजा करूं लागले म्हणून ब्रिटिश सरकारनें तो वृक्ष मुळासुद्धां खणून काढविला.

स्वातंत्र्ययुद्धाच्या रणधुमाळींत

# मंदालेचा संग्राम

ब्रिगेडियर सरदार गंगासिंह मोर्च्यांची पहाणी करीत होते. मंदालेच्या उत्तर भागाची जबाबदारी त्यांचेवर होती. जमादार गणपत शिंदे पाठीमागून चालला होता. जमादार गणपत शिंदे यानें मंदालेच्या किल्ल्यावरचे मोर्चे दाखविले व विचारलें, 'सरदारसाहेब व्यवस्था कशी काय वाटते? प्रत्येक ठिकाणीं तीन तीन मशिनगन्स ठेवलेल्या आहेत. निवडक लोकांच्या दोन कंपन्या या पलीकडील भागांत राहतील. प्रदेश डोंगराळ असल्यानें थोड्या लोकांनिशींसुद्धां शत्रूला बराच काल थोपवून धरणें सहज शक्य आहे.' सरदार गंगासिंहानें उत्तर दिलें, 'जमादार तुम्ही मराठे म्हणजे अक्कलवान लोक. तुमची योजना वाईट कशी असेल ?'

"सरदारजी, एक प्रश्न विचारूं कां?" जमादार गणपत शिंदे यानें विचारलें, " ही पीछेहाट आतां किती दिवस चालावयाची ? इंफाळवर स्वारी करणार, मणिपूर घेणार, कलकत्त्यावर चालून जाणार या सगळ्या गोष्टी दूरच राहिल्या. इंफाळपर्यंत गेलेले आम्ही परत फिरलों, आणि ठाण्यापाठीमागून ठाणें सोडीत मंदाले-

पर्यंत पीछेहाट स्वीकारली. आतां ही पीछेहाट जावयाची तरी कोठपर्यंत ?"

'गणपत, अरे तुम्ही तर गनिमी काव्यानें लढणारे लोक! पीछेहाटीला तुम्ही कंटाळणार? आमच्यासारख्यानें म्हटलें तर शोभेल एखादे वेळीं. परवां मंदालेचे सेनापति जनरल योकुकुरा यांनीं काय सांगितलें? हा आपला डाव आहे, ही 'स्ट्रॅटेजी' आहे. शत्रूला आंत घेत घेत त्याची कोंडी करून त्याचा फन्ना उडवूं. मार्शल रोमेल हा एकटाच हुषार आहे असें नाहीं. टोब्रुकपाशीं ब्रिटिश सैन्यावर एकाएकी माघारे फिरून त्यानें त्यांना उधळून लावलें व पुन्हां सिद्दी बराणीपर्यंत मुलूख पायाखालीं तुडविला. आपणही तसेंच करूं.

बोलतां बोलतां सरदारजींचा स्वर एकदम बदलला, 'पण गणपत, आपल्याला या गोष्टींची चर्चा कशाला ? आपले नेताजी विचार करीत असतील! आपल्याला ते सांगतील तें करावयाचें. माझी खात्री आहे नेताजींचे मध्यें ईश्वरी शक्ति आहे. ते आपल्याला हिंदुस्थानांत घेऊन जाणार. पार पंजाब, अमृतसरपर्यंत त्याच्याही पलीकडे आपलें सैन्य जाणार.'

वरीलप्रमाणें बोलणें चाललें आहे तोंच एक सैनिक मोटार सायकल भरमसाट दौडत तेथें आला. ब्रिगेडिअर गंगासिंहाजवळ मोटार सायकल थांबवून, उतरून सलाम करून तो म्हणाला 'इतक्यांतच रंगूनच्या छावणींतून आपल्यासाठीं बिनतारी संदेश आलेला आहे, तांतडीचा आहे.'

गंगासिंहानें पाकीट फोडलें. मजकूर वाचतां वाचतां गंगासिंहाचे मुद्रेवर कांहींसें आश्चर्य, कांहींशी काळजीची छटा उमटली.

संदेश एवढाच होता, 'ब्रिगेडिअर गंगासिंह आज रात्रीं १२ वाजतां रंगूनमध्यें बोटाटँग पॅगोडामध्यें येतील.'

संदेश मिळाला त्यावेळीं सकाळचे आठ वाजले होते. रात्रीं १२ला रंगूनला पोंचावयाचें म्हणजे केवळ १६ तासांचा अवधि होता.

★ ★ ★

तो १९४५ चा मार्च महिना होता. १९३९ सालीं सुरू झालेल्या महायुद्धाचा शेवट दिसूं लागला होता. अक्ष-राष्ट्रांपैकीं इटली फुटला होता. पश्चिमेंत जर्मनी आणि पूर्वेंत जपान हे दोस्त राष्ट्रांचे बरोबर लढत होते. पण त्यांची चढाई फोल ठरली होती स्वतःचा बचाव कसा करावा याचाच त्यांचेपुढें प्रश्न होता. पश्चिमेंत अँग्लो–अमेरिकनांनीं फ्रान्समध्यें प्रवेश करून, पॅरिस, व्हर्डून मेट्झ इत्यादि फ्रेंच प्रदेश परत जिंकून घेऊन ऱ्हाईनच्या पूर्व तीरापर्यंत जर्मनांना मागें रेटलें होतें. तिकडे रशियानें, पोलंडमधून जर्मनांना हांकलून लावून, सायलेशियांत त्यांची कोंडी करण्याचा डाव केला होता. तेथून त्यांचा मोर्चा थेट बर्लिनवर होता. जर्मनीच्या नाड्या पुरत्या आवळल्या गेल्या होत्या. जपानची स्थिति यापेक्षां कांहीं वेगळी नव्हती. जपानी आरमाराचा अमेरिकन आरमारानें पराभव करून जपानचें आरमारी प्रभुत्व नष्ट केलें होतें. वैमानिक सामर्थ्यांत अमेरिकेची बरोबरी कोणीच करूं शकत नव्हतें. ब्रह्मदेशांत इंफळ-मणिपूरपर्यंत गेलेल्या जपानी सेनांना परत फिरावयास भाग पाडलें गेलें होतें. ब्रह्मदेशांत अँग्लो–अमेरिकन सैन्यानें प्रवेश करून उत्तर ब्रह्मदेश जवळजवळ काबीज केला होता.. काया, इंदा, टिगियांग हीं खोरीं पालथीं घालून ब्रिटिश सैन्य इरावतीच्या खोऱ्यांत शिरलें होतें. त्याची एक बाजू मंदालेपासून उत्तरेस १५ मैलांवर तर दुसरी बाजू मंदालेच्या पश्चिमेस २० मैलांवर आली होती. अँग्लो–अमेरिकनांना प्रतिकार कोठेंच होत नव्हता. पण जपान्यांच्याबद्दल वाटणाऱ्या भीतीनें अँग्लो–अमेरिकन्स सावधपणें हळूहळू प्रगति करीत होते.

जर्मनी–जपान यांचा पूर्ण पराभव होत होता तरीही आपला पराभव होणें शक्य नाहीं, आपल्या जवळ गुप्त अस्त्रें आहेत, त्यांचा उपयोग करून आपण जवळ आलेल्या शत्रूला हांकलून देऊं असा प्रचार दोन्ही देशांतून चालला होता. तो इतका प्रभावी होता कीं, पराभवाच्या अगदीं टोकावर आलेल्या या दोन्हीं देशांतील सैनिकांना त्या प्रकाराची कांहींच कल्पना नव्हती. खालच्या सेनापतीपासून वरिष्ठ सेनापतीपर्यंत, टोजो

१३३६७ ५।३।५२

आणि हिटलरपर्यंत सर्वांचा सूर एकच. आमचा पराभव होणें शक्य नाहीं.

श्री. सुभाषचंद्र बोस यांच्या स्वातंत्र्यसेनेची स्थिति अशीच होती. मणिपुरापर्यंत गेलेले स्वातंत्र्ययुद्धाचे सैनिक माघार घ्याव-यास तयार नव्हते. श्री. सुभाषबाबूंनीं ही माघार तात्पुरती आहे, पावसाळा संपला कीं पुन्हां नवी चढाई सुरू होईल असें सांगून मोठ्या मुष्किलीनें सैनिकांना माघारे वळविलें होतें.

★ ★ ★

सरदार गंगासिह सुभाषबाबूंच्या सेनेंत ब्रिगेडिअर होते. मंदा-लेंतील भारतीय सैन्याचें नेतृत्व त्यांचेकडे होतें. रंगूनचा निरोप मिळतांक्षणींच सरदार गंगासिह यानें निघण्याची तयारी केली. मंदाले ते रंगून हें अंतर ४०० मैलांचें आहे. अँग्लो–अमेरिकन विमानांचे छापे एकसारखे येत असल्यामुळें विमानानें जाणें धोक्याचें होतें. म्हणून सरदार गंगासिहानें आपली मोटार बाहेर काढली आणि रंगूनच्या रस्त्यानें तो भरधाव जाऊं लागला. वाटेमध्यें ठिकठिकाणीं जपानी सैनिक आपापल्या ठाण्यावर सावध होते. अमेरिकन विमानांच्या बाँबवर्षावामुळें रस्त्यावर जागो-जाग खड्डे पडलेले असून मोडक्या मोटारी, तुटलेलीं–फुटलेलीं वाहनें रस्त्याचे अधूनमधून विखुरलेलीं होतीं. अशा कडी पहा-र्‍यांतून व अडीअडचणींमधून सरदार गंगासिह यांची मोटार अत्यंत वेगानें रंगूनकडे धांवत होती. रस्त्यावर कित्येक ठिकाणीं सरदार गंगासिहास उतरावें लागलें. अमेरिकन विमानांची घर-घर ऐकून एके ठिकाणीं एका वृक्षाच्या आडोशाला उभें राहावें लागलें. कित्येक ठिकाणचे पूल मोडकळीस आलेले होते, तेथून मोटार पलीकडे नेणें धोक्याचें होतें. सरदार गंगासिहानें तशां-तूनही बेछूट वेगानें मोटार पलीकडे हाणली. कारण कांहींही करून रात्रीं बाराच्या आंत रंगूनला पोंचणें अवश्य होतें.

सरदार गंगासिह अखेर रंगूनला पोंचला त्यावेळीं रात्रीं ११॥। झाले होते. तो तडक बैठकीच्या जागीं गेला. रंगूनमध्यें इरावती नदीच्या कांठीं बोटॅटाँग पागोडा प्रसिद्ध आहे. चोहोंबाजूला उंच

झाडी असल्यामुळें व आसपास जवळ वस्ती नसल्यामुळें विमान-हल्ल्यापासून तें स्थळ सुरक्षित होतें.

सरदार गंगासिंह तेथें येऊन पोंचतो तों काय आश्चर्य! भारतीय स्वातंत्र्यसेनेचे निवडक सुमारें १०० अधिकारी त्या ठिकाणीं उपस्थित होते. सरदार गंगासिंहाला तो प्रकार पाहून आश्चर्य वाटलें. तो मनांत म्हणाला, 'निरनिराळ्या आघाड्यांवर असलेले निवडक अधिकारी आज बोलावलेले आहेत. कांहीं तरी गंभीर प्रकार दिसतो'.

बरोबर १२ च्या ठोक्याला बैठकीच्या कामास सुरुवात झाली. चिटणिसानें सर्वांचीं नांवें वाचलीं, उपस्थिति घेतली, जेवढे बोलावले होते तेवढेच आले होते, कुणीही परका इसम उपस्थित नव्हता. बैठकीच्या या सामान्य पण आवश्यक गोष्टी संपतात न संपतात तोंच सभागृहाचा दरवाजा उघडला आणि भारतीय सैन्याचे सरसेनापति, स्वतंत्र भारत सरकारचे पहिले अध्यक्ष, श्री. सुभाषचंद्र बोस सर्वांचे दृष्टीस पडले.

गेले कांहीं दिवस अविश्रांत श्रमामुळें त्यांना झोंपसुद्धां मिळालेली नसावी असें सुभाषबाबूंच्या चर्येवरून दिसत होतें. त्यांची चर्या अप्रसन्न नव्हती, पण स्वभावसुलभ असें नित्याचें मधुर हास्य चेहऱ्यावर विलसत नव्हतें! सुभाषबाबू येतांक्षणींच सर्वांनीं उठून त्यांना मानवंदना दिली. सुभाषबाबू आले ते थेट व्यासपीठावर अध्यक्षीय खुर्चीवर जाऊन बसले. त्यांच्या पाठोपाठ मंत्रिमंडळांतील अन्य अधिकारीही खुर्च्यांवर बसले.

शांतता प्रस्थापित झाल्यावर सुभाषबाबू उठले व त्यांनीं भाषणास सुरुवात केली. "प्रिय मित्रांनो, हल्लींच्या आणीबाणीच्या दिवसांत तुम्ही सर्व शत्रूशीं निकराचें तोंड देण्यामध्यें गुन्तलेले असतांना अचानकपणें तुम्हांला येथें बोलावून घेतलें याबद्दल क्षमा करा. ही सभा वास्तविक ३ दिवसांपूर्वीं व्हावयाची. मेजर जनरल श्री. चतर्जी यांची मी वाट पहात होतों; ते पांच दिवसांपूर्वींच येथें अपेक्षित होते; पण, टोकिओ–सिंगापूर–रंगून या विमान-मार्गावर शत्रु विमानांशीं त्यांच्या विमानाची गांठ पडून लढाई

झाली. शत्रूचीं दोन विमानें पडलीं, पण चतर्जी यांचेंही विमान समुद्रांत पडलें. तशा स्थितींतून स्वत:ला वांचवून मोटार, आगगाडी, पायीं असा शक्य होईल तसा प्रवास करीत ते आज सकाळीं येथें आले. त्यांनीं आपले बरोबर टोकिओहून जनरल टोजो यांचा खलिता आणला आहे.

" जनरल टोजो यांच्या खलित्यासंबंधीं बोलण्यापूर्वीं मला हे सर्वांना सांगितलें पाहिजे कीं, आपण सर्व समजतां त्यापेक्षां परिस्थिति अत्यंत बिकट आहे. इंफाळहून माघार घेतांना ही माघार तात्पुरती आहे, पावसाळा संपल्यावर पुन: जोरकस चढाई आपण करूं असें मी आपणांस सांगितलें होतें, पण ती गोष्ट आतां शक्य नाहीं हें मला दुर्दैवानें कबूल केलें पाहिजे.'

कोणी मध्येंच विचारालें 'कां? कां शक्य नाहीं?'

"शक्य कां नाहीं?" सुभाषबाबू उत्तरलें, "भारतामध्यें पुन: शिरणें शक्यच असतें तर प्राणांचीही किंमत देऊन तें केलें असतें; पण आतां या महायुद्धाचें वारें अजिबात फिरलेलें आहे. अँग्लो–अमेरिकन सैन्यानें आम्हांस ब्रह्मदेशांतूनही बाहेर ढकलण्याचा चंग बांधला आहे. दुसऱ्या बाजूला जर्मनी पार कोलमडून पडला. रशियन आघाडीवर जर्मनी जिंकील असें वाटलें होतें, पण तसें घडलें नाहीं. रशियनांनींच जर्मनीला जिंकलें. आणि ओडर नदीच्या कांठीं लढणाऱ्या जर्मन सैन्याची फळी फोडून रशियन बर्लिनवर केव्हां चाल करतील याचा नेम राहिलेला नाहीं. पश्चिम आघाडीवर तोच प्रकार. ऱ्हाईन नदीवरील प्रतिकार संपुष्टांत आला असून अँग्लो–अमेरिकन सेना ऱ्हाईन पार करण्याच्या तयारींत आहेत. अशा स्थितींत जर्मनी–जपान यांचा पराभव जवळजवळ निश्चित झाला आहे.

"आज जो खलिता चतर्जी यांनीं टोकिओहून माझ्यासाठीं आणला, त्यामध्यें टोकिओमधील माझ्या मित्रांनीं ही गोष्ट स्पष्ट केली आहे. हें खरें कीं, अजूनपर्यंत जपानी सैन्याचा पराभव झालेला नाहीं. आणि जपानी सेनापतींना यशाची आशा वाटत

नसली तरी जपानचें संरक्षण आपण करूं शकूं याची खात्री वाटत आहे.

"जपानचें संरक्षण करण्यापुरतीच जपानी सैन्याची आतांची भूमिका असल्यानें या नव्या परिस्थितींत आपल्या भारताच्या आझाद हिंद सेनेला योग्य वाटेल असा निर्णय घेण्याची मुभा जपानी सेनापतींनीं दिली आहे. जनरल टोजोच्या खलित्याचा मथितार्थ हाच आहे."

सुभाषबाबू थांबले. आपल्या बोलण्याचा काय परिणाम होतो तें ते पहात होते. त्यांच्या बोलण्यानें अनेकांना धक्का बसला होता. ते पुढें बोलूं लागले:—

"अशा स्थितींत आझाद हिंद सेनेला स्वतःचे बळावर अँग्लो अमेरिकन सैन्याची फळी तोडून हिंदुस्थानांत प्रवेश करणें शक्य आहे असें मला वाटत नाहीं. भावनेनें या प्रश्नाचा विचार करूं नका. वस्तुस्थिति ध्यानांत घेतलीच पाहिजे. या परिस्थितींत आपणांस आवश्यक वाटल्यास आझाद हिंद सेना विसर्जित करण्याचीही सूचना जनरल टोजो यांनीं केलेली आहे.

" तेव्हां आपल्यासमोर दोन मार्ग आहेत. आझाद हिंद सेनेचें उद्दिष्ट साध्य होणें दुरापास्त आहे हें जाणून स्वतःला विसर्जित करणें हें एक, किंवा, याही परिस्थितीमध्यें आपल्या दोस्तांबरोबर ब्रिटिशांच्या साम्राज्यसेनेशीं अखेरपर्यंत झुंज घेत राहाणें हें दुसरें.

"जपानी लोक आपल्याबरोबर कसे वागलेले आहेत याचा फारसा विचार न करतां मी असें म्हणू शकेन कीं कोणत्याही हेतूसाठीं कां होईना आमच्या स्वातंत्र्ययुद्धाला त्यांनीं हातभार लावलेला आहे. तें मी ऋण समजतों. अशा वेळीं केवळ त्यांचा पराभव होत आहे, व त्यांत आमची चमडी बचावावी या हेतूनें आपण लढाई थांबवावी असें कोणीही भारतीय म्हणणार नाहीं. जे चमडी–बचाऊ असतील ते नुक्तेच चवथ्या भागाचे अधिकारी ज्याप्रमाणें पळून ब्रिटिशांना मिळाले त्याप्रमाणें जाऊं शकतात. फितुराला पळण्यासाठीं आज्ञा द्यावी लागत नाहीं. पण माझ्यासमोर बसलेले लोक हे सच्चे योद्धे आहेत. तेव्हां सन्मानपूर्वक मी

आपणांस विचारतों कीं, आपण काय च्हातां ? विसर्जन कीं लढाई ?"

सभेंत बसलेल्या लोकांनीं मोठ्यानें 'लढाई लढाई' असा पुकार केला, कित्येकांनीं फितुरांचे बद्दल मनस्ताप व्यक्त केला. आणि 'मरण पत्करूं पण लढाई अर्धवट टाकणार नाहीं' असा अभिमान व्यक्त केला.

"शाबास, मित्रांनो माझी खात्रीच होती." सुभाषबाबू उत्तेजित आवाजांत म्हणाले, "पण माझी त्याला एक पुस्ती आहे. आमचें उद्दिष्ट विजयाचें आहे, जी स्वातंत्र्याची लढाई आपण खेळलों त्याचें हवें असलेलें दृश्य फळ म्हणजे रणांगणावरचा विजय! तो आम्हांला मिळालेला नाहीं हें खरें; पण भारतांतील ब्रिटिश सत्ता पुरती डळमळीत करण्याचें कार्य आम्ही केलेलें आहे यांत शंका नाहीं. मला भविष्य दिसत आहे कीं, आणखी चार-पांच वर्षांतच ब्रिटिश सत्ता कोलमडून पडेल. आजच ते भारताला स्वातंत्र्य देऊं करीत आहेत. व्हाईसरॉयच्या कार्यकारी मंडळांत त्यांनीं कॉंग्रेसला जागा दिली आहे. पण मित्रांनो, मला त्यांत ब्रिटिशांचा दुष्ट डाव दिसतो. कॉंग्रेस सवर्ण हिंदूंची प्रतिनिधि आणि पाकिस्तान मागणारी मुस्लिम लीग मुसलमानांची प्रतिनिधि म्हणून तेथें येणार असेल तर भारत 'भारत' रहाणार नाहीं, त्याचे तुकडे होतील. गेलीं कित्येक वर्षें जातीयतेचा पाठपुरावा करीत असलेले कॉंग्रेसचे पुढारी भारताचे तुकडेसुद्धां स्वीकारावयास तयार होतील. जुन्या कर्झनशाहींत क्रांतिकारकांनीं बंगालचे तुकडे होऊं दिले नाहींत. यावेळीं आम्ही पुढें होऊन असे तुकडे होऊं देतां कामा नयेत."

'बरोबर आहे, बरोबर आहे' असे उद्गार सभेंतून निघाले.

"त्यासाठीं मी एक योजना आंखली आहे. मी ब्रह्मदेशांत राहून लढत राहीन. ब्रह्मदेशांतून मलायांत, मलायांतून जपानांत पण शेवटपर्यंत मी लढत राहीन. हें महायुद्ध संपलें तरी आझाद हिंद सेना अशीच्या अशी परदेशांत अभंग ठेवीन. तुमच्यापैकीं निम्मे माझ्याबरोबर येतील, निम्मे कोणत्याही वेषांत, कोणत्याही

स्थितींत भारतांत जाऊन नव्या क्रांतीची सिद्धता करतील. आंतून आणि बाहेरून एकदम उठाव आपण करूं आणि ब्रिटिशांना शेवटचा हिसका देऊं. देशाचे कोणी तुकडे करूं पाहील तर त्याला सशस्त्र विरोध करूं. काय हवा तो त्याग करूं, पण अखंड भारताचें वैभवशाली स्वातंत्र्य अबाधित राखूं."

'अगदीं योग्य, अगदीं योग्य' असे आवाज आले. कित्येकांनीं संमतिदर्शक टाळ्याही वाजविल्या.

" मी काय म्हणतों हें सर्वांच्या लक्षांत आलेलें असावें. कोणी काय करावें याच्या याद्या तयार केलेल्या आहेत. त्या याद्या मी स्वत: तयार केल्या आहेत. त्यांत कोणावरही न्यायअन्याय केलेला नाहीं. आतांचे आतां त्या याद्या वाचून दाखविल्या जातील.'

. सुभाषबाबूंनीं चिटणिसांना खुणावलें. चिटणीस उठले व त्यांनीं भारतांत ज्यांनीं जावयाचें त्यांची यादी वाचण्यास सुरुवात केली.

सभेंत अपूर्व शांतता पसरली होती. यादींतील नांवें सावकाश उच्चारलीं गेलीं. वाचन झाल्यावर सुभाषबाबू पुन्हां उठले व म्हणाले, " ज्यांचीं नांवें आतां वाचलीं गेलीं ते उभे रहा."

लोक उभे राहिले. त्यांच्या अंत:करणांत कालवाकालव झाली ते एकदम ओरडले, "नाहीं. नेताजी, आम्ही तुम्हांला सोडून जाणार नाहीं; तें कधींही शक्य नाहीं. आम्ही शूर योद्धे आहोंत. आम्ही तुमच्याच बरोबर शूरांचें मरण पत्करणार !"

तो देखावा कांहीं विलक्षण होता. मोठमोठे अधिकारी, नाना लढायांतून लढलेले शूर सैनिक एकदम हुंदके देऊन बोलूं लागले सभेंत गोंधळ माजला.

सुभाषबाबूंनाही गहिंवर आला; पण, मन कठोर करून त्यांनीं टेबलावरील घंटा मोठ्यानें वाजविली. "शांत व्हा. सगळे गप्प बसा. मला ऐकणारे लोक हवे आहेत, न ऐकणारे नकोत. तुम्ही शूर आहांत म्हणूनच तुम्हांला भारतांत धाडलें आहे. माझ्यामागें येण्याचा हव्यास नको. उठा, तुम्हांला नव्या क्रांतीचें महत्कार्य करावयाचें आहे. माझी तुम्हांला आज्ञा आहे. यावर चर्चा नको. सगळेच्या सगळे एका बाजूला व्हा."

नेताजींच्या आज्ञेच्या शब्दासरशीं एवढे सारे धुरंधर शेळ्या-प्रमाणें चटकन् एका बाजूला झाले.

"या लोकांनीं आतांचे आतां सभात्याग केला पाहिजे. त्यांच्या मागें कोणास कोठें नेमावयाचें तें नंतर सांगितलें जाईल. उठा, आतांच्या आतां बाहेर निघून जा."

त्या शूर लोकांच्यावर हा वज्राघातच होता. पण आज्ञेसमोर नाइलाज झाला. त्यांतील एक पुढें आला आणि म्हणाला, "नेताजी, आपली आज्ञा आहे म्हणून जातों, पण जाण्यापूर्वी आपला जय-जयकार केल्यावांचून जाणें शक्य नाहीं."

सभेंत एकदम जयजयकार सुरू झाले. 'नेताजी सुभाषचंद्र बोस की जय, जय हिंद, सुभाष बोस की जय, वंदे मातरम्, वंदे मात-रम्, भारत माता की जय."

जयजयकार करतां करतां ते शूर योद्धे एकदम पुढें घुसले व नेताजींच्या पायांवर डोकें ठेवून एकेक निघून गेले.

सर्व निघून गेल्यावर पुन्हां एकवार शांतता निर्माण झाली. पण, त्या शांततेंत दुःख आणि विषाद, शोककल्लोळ आणि भग्न-आशा यांची काळोखी पसरली होती.

सुभाषबाबूंनीं पुनः बोलण्यास प्रारंभ केला, "मित्रांनो तुम्हांला अधिक सांगावयाचें नाहीं. तुमच्या नव्या जागा तुम्हांला सांगितल्या जातील. त्या त्या कामगिरीवर जा आणि ब्रिटिशांशीं असें कडा-डून लढा कीं तुमची आठवण त्यांना विसरतां येऊं नये. आपला उद्देश सफल झाल्यासारखा आहे. भारताचें स्वातंत्र्य कांहीं वर्षां-वर आलें आहे. आतां त्याच्या आनंदांत असा पराक्रम करा कीं भारताच्या पुढील पिढ्या त्या पराक्रमापासून स्फूर्ति घेतील.

कोणी कोठें जावयाचें हें चिटणिसांनीं वाचून दाखविलें आणि सभा संपली. कोणीही कोणाशीं न बोलतां मध्यरात्रीच्या अंधारांत बाहेर पडला आणि दिसेनासा झाला.

* * *

सरदार गंगासिंहाकडे मंदालेचाच भाग होता. त्यानें आपली मोटार काढली आणि रात्रींच्या अंधारांत तो तसाच मंदालेकडे निघाला.

तो १९४५च्या मार्च महिन्याचा ५ दिनांक होता. सरदार गंगासिंह मंदालेला आला. जनरल योकुकुराला त्यानें विचारलें, "जनरल मंदालेबद्दल आपलें धोरण काय?"

"नवीन धोरण तें काय! वरून हुकूम येईपर्यंत मंदाले लढवावयाचें हेंच धोरण. ब्रिटिशांना शक्य तो अधिक काळ येथें अडकवावें असा वरिष्ठांचा विचार आहे. मंदालेचा किल्ला फोर्ट डफरिन चांगला मजबूत आहे."

"मग त्याचा बचाव मी करीन."

"ठीक आहे."

सरदार गंगासिंहानें आपल्या सैनिकांना बोलाविलें. नेताजींची इच्छा त्यांना विदित केली. सर्व सैनिक निर्धाराच्या उत्साहानें वेडावून गेले.

दि. ७ला ब्रिटिशांचा मंदालेस वेढा पडला. विमानांची घरघर, बाँबवर्षाव व मशिनगन्सचा मारा या गोष्टी सुरू झाल्या. मंदालेंतून कडवा प्रतिकार चालू होता. ब्रिटिशांनीं जंगजंग पछाडले. पण त्यांना मंदाले—रंगून रस्ता अखेरपर्यंत तोडतां आला नाहीं.

दि. १०ला मंदाले शहरांत ब्रिटिशांनीं प्रवेश केला. जपानी सैन्याच्या मोठ्या तुकड्या शहरांतून आधींच युक्तिपूर्वक माघारीं घेण्यांत आल्या होत्या, फोर्ट डफरिनमध्यें आझाद हिंद सैनिक आणि कांहीं जपानी तुकड्या प्रतिकार करीत राहिल्या.

ब्रिटिशांना वाटलें मंदाले पडलें. फोर्ट डफरिन काय एका दिवसांत सर होईल. पण फोर्ट डफरिन तसा मजबूत किल्ला आहे. भोंवतालीं उत्तम तटबंदी असून, मोठा खंदक आहे. इरावती नदीचें पाणी त्यांत सोडलेलें आहे. अशा मजबूत किल्ल्यांत निर्धाराचे भारतीय सैनिक लढत होते. विमानांतून बाँबवर्षाव झाले, तोफांचे भडिमार झाले, पण किल्ला मात्र पडण्याचें चिन्ह दिसेना. खंदक ओलांडून किल्ल्याच्या भिंती चढण्याचा प्रयत्न करावा तों आंतून

वाह गुरु की फते! वंदेमातरम्! सुभाषबाबू की जय! जय हिंद, अशा आरोळ्या ठोकीत भारतीय सैनिक तुटून पडत. पावसाच्या सरसर सरसर धारा याव्यात तसा गोळ्यांचा कडकड कडकड पाऊस पडे. ब्रिटिश सैनिकांना पाऊलही पुढें टाकणें शक्य होईना. पावलागणिक शेंकडो सैनिक जायबंदी होऊं लागले.

सरदार गंगासिंह आणि जमादार गणपत शिंदे यांनीं कमाल केली. भारतीय सैनिकांचे अंगांत रणदेवीच संचारली होती. बाँब-वर्षावाखालीं अनेक पुरले गेले. बंदुकीच्या गोळ्यांनीं अनेक ठार झाले; पण प्रत्येक वेळीं जयहिंद, जयहिंद, शिवाजी महाराज की जय, नेताजी सुभाष की जय अशा जयजयकारांत नवे सैनिक मेलेल्यांच्या जागा घेत.

दि. १५पासून ब्रिटिशांनीं भारी तोफखाना आणला. किल्ला सर करण्याचे तडाखेबंद प्रयत्न सुरू केले. दि. १८ ला जनरल योकुकुरा यानें सांगितलें, "आमचा प्रतिकार संपला. आम्हांला किल्ला सोडण्याचा हुकूम आला आहे. तुमचें काय?"

गंगासिहानें उत्तर दिलें "आम्हांला शेवटपर्यंत लढण्याचा हुकूम आहे,"

"ठीक. रामराम."

"आमचा अखेरचा रामराम, जयहिंद."

त्या रात्रीं शिल्लक राहिलेली जपानी तुकडी किल्ल्यावरून काढून घेण्यांत आली. दि. १९ला ब्रिटिशांनीं शर्थ केली. दिवसाकांठीं वीस वेळां तटावर चढण्याचे प्रयत्न झाले. पण त्या दिवशीं यश आलें नाहीं. तेव्हां तोफांतून अक्षरशः आग ओकण्यांत आली. दि. २०ला सकाळीं दहा वाजतां ब्रिटिश सेनेचें किल्ल्यांत पाऊल पडलें.

आंत सर्वत्र उद्ध्वस्त झालें होतें. जिकडे तिकडे मृत्यूचें भयाण साम्राज्य पसरलें होतें. पण जे अजून जिवंत होते, जखमांनीं विव्हळत होते त्यांच्या तोंडून 'जयहिंद' 'नेताजी सुभाष की जय,' 'भारत माता की जय' हेच जयघोष ऐकूं येत होते.

## ...... बळी ! ! पण कशाचे ?

# मृणालिनी

बिपिन बिहारी आणि मृणालिनी कलकत्याला वैद्यकीय महाविद्यालयांत एकत्र शिकत होतीं तेव्हांपासून त्यांचें परस्परावर प्रेम होतें. मृणालिनीचें मातृसुख काळानें तिच्या बालपणींच हिरावून नेलें होतें. १९४०मध्यें तिचे वडील वारले. त्यामुळें त्या सालीं तिला तिसऱ्या वर्षाच्या परीक्षेस बसतां आलें नाहीं. बिपिन बिहारी त्या वर्षी उत्तीर्ण होऊन चौथ्या वर्षांत गेला. १९४१ सालीं बिपिन अखेरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर दोघांचा विवाह झाला. त्यानंतर विपिननें ढाक्यास जाऊन वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्याचें निश्चित केलें. मृणालिनीनें आपलें शिक्षण पुरें करून मग ढाक्यास यावें असा त्याचा आग्रह होता. पण मृणालिनीला कलकत्त्यामध्यें राहण्यांत गोडी वाटेना. वडिलांचा एकुलता एक आधार होता तोही गेलेला; नाहींतरी दोघांनींही एकत्र राहूनच वैद्यक व्यवसाय करावयाचा मग त्याला पदवीची आवश्यकता काय? पदवीशिवायसुद्धां बिपिनला सर्व प्रकारची मदत करतां येईल असें तिचें मत पडलें व तिच्या आग्रहावरून दोघेही १९४१मध्येंच ढाक्यास जाऊन राहूं लागले.

बिपिन स्वभावानें उदार होता. पैसा मिळविणें याची त्याला गोडी नव्हती. वैद्यकीय ज्ञानाचा लोकांना फायदा करून द्यावा,

भेदभावाचा विचार न करतां सर्वांची सेवाशुश्रूषा करावी, समाजकार्यांत स्वतःला झिजवावें याची त्याला हौस होती. मृणालिनीचाही स्वभाव तसाच असल्यामुळें दोघांचेंही उत्तम जमलें. दोघांनींही थोडक्याच अवधींत ढाक्यांत नांव मिळविलें.

विवाहानंतर १९४३मध्यें त्यांच्या प्रेमामध्यें अरुणचंद्राची भर पडली, व १९४७ मध्यें हेमचंद्राची भर पडली. अरुण–हेमांच्याबरोबर बिपिनच्या कीर्तींतही भर पडत गेली. मृणालिनी आणि बिपिन यांना असें वाटूं लागलें कीं आपणासारखे सुखी आपणच.

पण १९४६ च्या 'डायरेक्ट अॅक्शन डे' पासून ढाक्यांतलें वातावरण बिघडूं लागलें होतें. ढाक्यामध्यें किरकोळ किरकोळ कुरबुरी झाल्या. पण विशेषतः नोआखलीमध्यें घडलेल्या गोष्टींनीं मृणालिनीचें मन तेथल्या कामांतून उडलें. सेवेमुळें सद्भावामुळें दोन चार व्यक्ति बदलतील, पण सर्व समाजाचे गुणधर्म व सुष्टदुष्ट आकांक्षा केवळ सेवा करून पालटतां येणार नाहींत असें तिला वाटूं लागलें.

याच्या उलट बिपिन बिहारीची स्थिति झाली. महात्माजींचा नोआखलींत दौरा झाला. त्या वेळच्या त्यांच्या संदेशानुसार संकटाच्या खाईंत धैर्यपूर्वक राहिलें तरच आपल्या जीवनकार्याची खरी कसोटी लागली म्हणावयाची असें त्याला वाटूं लागलें.

येथपासून मृणालिनी आणि बिपिन यांच्यांत मतभेदाला सुरुवात झाली. लहानसहान गोष्टींतून या मतभेदाचे पडसाद उठूं लागले. पाकिस्ताननिर्मितीनंतर त्या मतभेदांना आणखी जोर चढला. देशबंधूंची आयुष्यभर सेवा करावी हें व्रत ढाक्यांत राहिल्यानेंच सफल होणार आहे असें नाहीं. उर्वरित भारतांत जाऊनही तें कार्य करतां येईल असा मृणालिनीचा आग्रह होता. बिपिनला तो पटेना.

* * *

२६ जानेवारी १९५० ला नोआखलींत जाळपोळ, लुटालूट व खून यांना पुन्हां सुरुवात झाली. दोन दिवसांनीं त्याची वार्ता मृणालिनीला कळली. ती म्हणाली, "बिपिन ऐकलें कां ?

परवां २६ जानेवारीच्या ऐन मुहूर्तावर नोआखलींत लुटालूट, खून इत्यादि गोष्टी पुन्हां सुरू झाल्या. शांताक्काचें काल मावशीकडे पत्र आलें आहे. त्यांत अगदीं पहिल्यासारखा प्रकार सुरू झाल्याचें लिहिलें आहे."

"तुझी शांताक्का सुरक्षित आहे ना?"

"ती त्या अमेरिकन मिशनमध्यें आहे म्हणून खुशाल आहे. नाहींतर पत्र लिहिण्याचें तरी धाडस ती करूं शकती का? दंगा सुरू होऊन दोन दिवस झाले पण येथल्या वृत्तपत्रांत त्याबद्दल ओळसुद्धां आली नाहीं!"

"या गोष्टी येऊन उपयोग तो काय व्हावयाचा? येथल्या लोकांत घबराट उत्पन्न व्हावयाची, येथल्या जातिनिष्ठ दंगेखोरांना उत्तेजन मिळावयाचें एवढेंच ना? या गोष्टी छापण्याचा एवढाच उपयोग होईल. छापून येत नाहींत तेंच चांगलें आहे."

मृणालिनीच्या कपाळाला आठ्या पडल्या. ती म्हणाली, "म्हणजे वृत्तपत्रांत छापून आलें तरच दंगेखोर मुसलमान दंगा करावयास प्रवृत्त होतील, एरवीं त्यांना दंगा करण्याचें सुचणारच नाहीं, असेंच म्हणणें ना? या बातम्या छापून आल्यानें त्यापासून हिंदूंना सावधगिरीचा इषारा मिळेल, कोणाला कलकत्त्याला जावयाचें असेल तर जातां येईल किंवा येथेंच कांहीं तजवीज तरी करतां येईल, हें कांहीं तुमच्या लक्षांत आलें नाहीं."

"मी समजलों. आपण दोघांनीं कलकत्त्याला निघून जावें एवढेंच तुला म्हणावयाचें आहे असें दिसतें. तें तूं मला परवांच सांगितलें आहेस."

"हो, मला तेंच म्हणावयाचें आहे. अगदीं आजच्या आजसुद्धां ढाका सोडण्याची माझी तयारी आहे."

"तुझी तयारी पुष्कळ आहे. पण माझी नाहीं. येथें आपण आलों तें सेवेचें व्रत स्वीकारून आलों. हिंदु–मुसलमान दोघांचीही निरपेक्ष रीतीनें सेवा केली म्हणजे सद्भाव व आपलेपणा उत्पन्न होऊन जातिद्वेष कमी होईल या कल्पनेनें आपण येथें आलों. तें काम अर्धवट टाकून मी येथून जाणार नाहीं."

"पण इतकीं वर्षें सेवा करून जातिद्वेष कमी झाला का? मी सुद्धां तुमच्याचप्रमाणें सेवेसाठीं आलें. माझें शिक्षण अर्धवट टाकून आलें. सेवाशुश्रूषा करण्यामध्यें मी कोणताही भेद केला नाहीं. महिन्यापूर्वी तो गुंड अबदुल सतार डोकें फुटून आला, त्याचीही मी शुश्रूषा मनापासून केली. हें सर्व मी केलें. आपण दोघांनीं केलें. उपयोग काय झाला? का ढाक्यांत दंगे झाले नाहींत? का आपण ज्या वस्तींत राहतों तेथले लोक गुंडगिरी करीत नाहींत? किंवा आपण ज्या मुसलमानांच्या उपयोगी पडतो ते जणुं दंगेधोपे करीत नाहींत! सर्व प्रकार उघडपणें चालले आहेत."

"तूं म्हणतेस तें मला कबूल नाहीं. आपल्या कामाला कांहींच यश आलें नाहीं असें तूं कसें म्हणतेस? मुसलमानांच्या ऐन वस्तींत आपण आहोंत. मनांत आणलें असतें तर त्यांनीं आपली केव्हांच चटणी उडवली असती. पण तसें त्यांनीं केलेलें नाहीं. याचें कारण आपण त्यांचें प्रेम संपादन केलें आहे हेंच आहे. मला कालच सफुद्दीन भेटून गेला. त्यानें आश्वासन दिलें आहे. तो म्हणाला प्रसंग आला तर ५०० लोकांनिशीं आम्ही तुमचें रक्षण करूं. तुमचे उपकार आम्ही विसरणार नाहीं."

"त्याला विसर पडला नसेल तर तें चांगलें आहे. तुम्ही ठेवा सफुद्दीनवर विश्वास! नोआखलींत अनेकांनीं कोणा कोणावर असाच विश्वास ठेवला. त्यांचें काय झालें हें सर्वांनाच चांगलें माहीत आहे."

"नोआखलीच्या गोष्टी कशास काढतेस? तेथचा प्रकार वेगळा होता. हिंदु जमीनदारांच्या विरुद्ध गरीब खंडकरी असा तो मुळांतला आर्थिक झगडा होता. आपण कांहीं जमीनदार नाहीं, आपण कोणालाही पिळलेलें नाहीं, उलट त्यांची सेवाच केली आहे. शिवाय नोआखलीच्या वेळेला त्यांना पाकिस्तान मिळवावयाचें होतें. आतां तें मिळालेलें आहे. म्हणून तेवढ्या मोठ्या प्रमाणावर कांहीं होईल असें मला वाटत नाहीं. उगाच घाबरण्यांत काय अर्थ आहे."

" नोआखलींत जितके मेले ते सर्व जमीनदारच होते का? स्त्रिया–मुलें हीं सुद्धां जमीनदारच होती कां ?" मृणाल चिडून बोलली. "त्या वेळीं त्यांना पाकिस्तान मिळवावयाचें होतें,तर आतां चटावलेल्या त्यांच्या हातांना आमची संपत्ति हवी आहे. आमचीं घरेंदारें हवीं आहेत. पण ही चर्चा हवीच कशाला ? माझें ऐका, चला भारतांत जाऊं, तेथें कांहीं दिवस राहूं. येथें पूर्ण शांतता आहे असें वाटलें कीं परत येऊं. कलकत्ता सोडल्याला ९ वर्षें होऊन गेलीं. इतक्यां वर्षांत मी तेथें गेलें नाहीं. तुम्हीही गेलेलां नाहीं. कलकत्त्याला कांहीं दिवस राहूं. मीं नागपूरला जाऊन काकांना भेटून येईन. चला जायचें ना ? हो म्हणा."

विपिन कांहीं वेळ स्तब्ध बसला. थोड्या वेळानें तो म्हणाला "मृणाल, आपण जाऊं कलकत्त्याला, पण आणखी सहा महिन्यांनीं जाऊं. येथील स्थिति विकटच व्हावयाची असेल तर त्या स्थितींत येथून जाणें हेंही बरोबर नाहीं. गांधीजी नोआखालींत हिंडले, तेव्हां त्यांनीं असाच उपदेश केला. 'आहे तेथें धीर धरून रहा.' हा त्यांचा संदेश आहे. आपण त्यांचा संदेश पाळणार नसूं तर.. "

" गांधीजींचें मला नका सांगूं, ते नोआखलींत हिंडले त्यावेळीं दिसावयाला एकटे होते, पण त्यांच्या मागें अखिल ब्रिटिश साम्राज्याची सारी अब्रू आणि शक्ति होती. म्हणून ते हिंडूं शकले. ऑगस्टनंतर पंजाबमध्यें येथल्यापेक्षां भयंकर अत्याचार झाले. तेथें नाहीं कुठें गेले ते ?" मृणाल निराश होऊन म्हणाली. " तुमच्या मनांत येथून निघावयाचें दिसत नाहीं.... मग इलाज नाहीं. माझें मन कांहीं येथें लागत नाहीं. कांहीं कांहीं विपरीत कल्पना येतात, विपरीत स्वप्नें पडतात. झोपेंतून मी दचकून उठतें. चला ना खरोखरीच, जाऊं या ना आपण ! ...."

* * *

या गोष्टीला १५ दिवस झाले. पूर्व पाकिस्तानांतील सर्व ठिकाणांहून आतां लुटालूट, पळवापळवी, अनन्वित अत्याचार यांच्या वार्ता येऊं लागल्या. अशा स्थितींत तो पंधरवडा

मोठ्या अस्वस्थतेंत गेला. ठिकठिकाणचे हिंदु ढाक्यांत येऊं लागले. कित्येक हजार लोक भारतांत जाण्यास निघाले. ढाक्यामध्यें कुरबुरी होऊं लागल्या.

दि. १२ फेब्रुवारीला दुपारीं चार वाजतां बिपिनचा नोकर पूर्णेन्दु बाहेरून धांवत धांवत घाबऱ्या घाबऱ्या घरांत आला. ढाक्यांतही अत्याचारांना सुरुवात झाली होती. त्यांची हकीकत त्यानें सांगितली. आसपासच्या खेड्यांपाड्यांतून कांहीं हिंदू निर्वासित येत होते. त्यांचेवर करीमगंज भागांत दुपारीं १२ वाजतां हल्ला करण्यांत आला. करीमगंज भाग हा हिंदू वस्तीचा होता. निर्वासितांच्यावर हल्ला झाल्याची वार्ता ऐकून त्या भागांतील एक प्रसिद्ध वकील विश्वासचंद्र मारामारीच्या जागीं गेले. तेथें शांततेसाठीं कांहीं प्रयत्न ते करीत आहेत तोंच हल्ला करणारांच्या तलवारी त्यांच्या अंगावर पडून ते जागच्या जागीं ठार झाले.

नोकरांनीं सांगितलेली हकीकत ऐकून बिपिन मनांत चरकला.

विश्वासचंद्र हे ढाक्यांतले एक सर्वमान्य पुढारी होते. त्यांचा व बिपिनचा गेल्या अनेक वर्षांचा गाढ स्नेह होता. त्यांची वायको रोहिणीदेवी व मृणालिनी या जीवश्च कंठश्च मैत्रिणी होत्या.

रोहिणीदेवीचें सांत्वन करण्यासाठीं मृणालिनीनें पूर्णेंदूला बरोबर घेऊन ताबडतोब जावें असें ठरलें. बिपिन म्हणाला, "तूं मुलांना घेऊन जा. रोहिणीदेवी व त्यांची आई यांना कोणाचाच आतां आधार उरला नाहीं. मीसुद्धां संध्याकाळचें दवाखान्याचें काम आटोपून तिकडे येतों. आज रात्रीं त्यांच्या सोबतीसाठीं आपण तेथेंच राहूं."

"बिपिन, पहा बरें ढाक्यांतही सुरुवात झाली. विश्वासचंद्रांचा बळी पडला. मला तरी येथें राहणें सुरक्षित वाटत नाहीं."

"कबूल. तूं म्हणतेस तें मला मान्य. तूं आधीं तूर्त त्यांचेकडे जा. त्यांना सध्यांच्या परिस्थितींत ढाक्यांत ठेवणें बरोबर होणार नाहीं. मी आलों म्हणजे त्यांच्या आईशीं बोलेन व शक्य झाल्यास उद्यांच त्यांना घेऊन तूं कलकत्त्याला जा."

"तें सगळें ठीक, पण तुमचें काय ?"

"माझी काळजी करूं नकोस. मीही चार सहा दिवसांत तुमच्या पाठोपाठ येईन."

मृणालिनी मुलांना व नोकराला बरोबर घेऊन रोहिणीदेवींच्या घरीं निघाली. तिचें मन अस्वस्थ झालें होतें. ढाक्यांतील बिघडलेल्या परिस्थितींत मुसलमानांच्या मोहल्ल्यांत बिपिननें राहावें ही कल्पना तिला अधिकाधिक बोंचत होती. पण अधिक विचार करण्यास, किंवा तसें त्याला बोलण्यास सवडच नव्हती.

★ ★ ★

**मृणालिनी** बाहेर जाऊन तास दोन तास झाले असतील नसतील तोंच, अबदुल सतार १०–१५ लोकांना घेऊन दवाखान्यांत शिरला. बिपिन रोग्यांना औषधोपचार करीत होता. त्यानें विचारलें, "काय, अबदुल आज इकडे ?"

"होय साहेब, जरा काम आहे."

"मित्रमंडळ बरेंच आणलें आहेस ?"

"हे लोक माझ्याबरोबर नेहमींच असतात. सध्यां दिवस जरा खराब आहेत. लोक बरोबर असले म्हणजे बरें असतें."

"काय काम आहे ?"

"येथें सांगतां येण्यासारखें नाहीं. आंत चला म्हणजे बोलूं."

बिपिनला कांहीं शंका आली. पण त्याला नाहीं म्हणतां येईना. हातांतलें काम आटोपल्यावर तो आंतल्या खोलींत गेला. त्याचे पाठोपाठ अबदुल आला. त्याचे पांच सहा मित्रही पाठोपाठ आले.

अबदुलनें इकडे तिकडे पाहिलें.त्याचे मित्र बिपिनभोंवतीं कोंडाळें करून उभे राहिले. बिपिनला तो सर्वच प्रकार चमत्कारिक वाटूं लागला.

"साहेब, आज करीमगंजमध्यें मारामारी झाली म्हणतात." अबदुल म्हणाला.

"होय, मला कळलें."

"एकादे वेळीं आपल्या या भागांत सुद्धां मारामारी होईल."

"आपल्या भागांत मारामारीचें काय कारण आहे ?"

"तुम्हां लोकांचीं दोनचार घरें आहेत, तीं लुटलीं जातील."

"पण, तूं आहेस, तुझे मित्र आहेत, मी आहे, आपण सर्व मिळून त्या घरांचें रक्षण करूं."

"करूं, अवश्य करूं; पण, मृणालिनीबाई कोठें आहेत ?"

"कशासाठीं?"

"त्यांनीं या घरांत राहाणें धोक्याचें आहे. कोण केव्हां हल्ला करील सांगतां येत नाहीं."

"मग त्यांनीं कोठें रहावें ?" बिपिनला अधिकच संशय वाटून त्यानें विचारलें.

"मी त्यांना माझ्या घरीं ठेवावें म्हणतों. तेथें कोणीही हल्ला करूं शकणार नाहीं. बाईसाहेब कोठें आहेत ?"

"त्या बाहेर गेल्या आहेत."

एवढें भाषण होईतों अबदुलबरोबर आलेल्या मित्रांच्यांत चुळबूळ सुरू झाली. त्यांच्यानें आतां अधिक काळ कळ काढवेना. त्या बाहेर गेल्या आहेत, असे उद्‌गार बिपिनच्या तोंडून ऐकल्याबरोबर 'साला बदमाष खोटें बोलतो' असें ओरडून एकानें त्याच्या डोक्यांत बुक्की हाणली. लगेच बाकीच्यांनीं खिशांतून सुरे काढून त्याला ठिकठिकाणीं भोसकलें. बिपिन ओरडला आरडला, कांहीं वेळानें निपचीत पडला.

दवाखान्यांत असलेल्या गुंडांनीं लुटालूट आरंभिली. अबदुल व त्याचेबरोबरचे गुंड घर धुंडाळूं लागले, सर्व धुंडाळून मृणालिनी हातीं लागली नाहीं तेव्हां जमा झालेली लूट घेऊन ते निघून गेले.

★ ★ ★

मृणालिनी मुलांना घेऊन रोहिणीच्या घरीं आली. रोहिणीदेवींच्यावर सैतानाची कुऱ्हाड कोसळली होती. त्यांच्या घरापासचे कांहीं सद्‌गृहस्थ व तरुणही त्यांच्या घरीं आले होते. सर्वत्र भीतीचें वातावरण पसरलें होतें. ढाक्यांत मोठ्या प्रमाणांत

दंगा सुरू होणार अशी वार्ता पसरली होती. करीमगंज भागांतील तरुण मंडळी त्या भागाचें संरक्षण करण्याची सिद्धता करीत होती.

रोहिणीदेवींचें सांत्वन करावें म्हणून मृणालिनी आली पण बिपिनच्या जिवाची नवी काळजी तिच्या मनाला खाऊं लागली. दंगा होणार आणि त्या भागांत बिपिन एकटा सांपडणार ! काय होईल व काय नाहीं असें तिला वाटूं लागलें.

रात्रीं ९ वाजतां बिपिन येणार होता. तो आला नाहीं. ९॥ वाजले तेव्हां पूर्णेन्दूला मृणालिनीनें घरीं पाठविलें. पूर्णेन्दू रात्रीं ११ वाजतां घरची बातमी घेऊन आला. त्यानें तेथील भीषण हकीकत सांगितली. रोहिणीदेवींच्या घरीं परत यावयास निघे-पर्यंत बिपिनबाबूंची नाडी चालू होती, पण ते शुद्धीवर नव्हते. घरावर झालेल्या हल्ल्यामुळें आसपासचे सर्व हिंदु पळून गेले. त्यामुळें निरोप कोणाचे हातीं पाठवावा म्हटलें तर शक्य झालें नाहीं. म्हणून बिपिनबाबूंना तशा स्थितींत टाकून पूर्णेन्दूलाच बातमी घेऊन यावें लागलें. बिपिनच्या मदतीला कोणीही लोक गेले नाहींत. पूर्वीं ज्या मुसलमानाची सेवाशुश्रूषा बिपिन, मृणा-लिनी यांनीं केली होती त्यांतला एकही मायेचा पूत पाणी देण्या-साठींसुद्धां त्यांच्या घराकडे फिरकला नाहीं.

या हकीकती ऐकून मृणालिनीला काय झालें अन् काय नाही असें होऊन गेलें. जो प्रसंग कांहीं तासांपूर्वीं रोहिणीदेवीवर आला होता तोच आतां तिच्यावर आला. पण ती धैर्यशाली होती. रोहिणीदेवींच्या घरांत सोबतीला आलेल्या ५–७ तरुण मंडळींना बरोबर घेऊन ती रातोरात स्वतःच्या घरीं आली.

घरांत सर्व गोष्टी छिन्नविच्छिन्न झाल्या होत्या. मधल्या खोलींत बिपिनचा देह पडला होता. भोंवतीं रक्ताचें थारोळें माजलें होतें. आतांपर्यंत देह थंडगार झाला होता. कांहींही धुगधुगी शिल्लक नव्हती. तो प्रकार पाहून मृणालिनीला भोंवळ आली. पण त्या परिस्थितीमध्यें भोंवळ येण्यास आणि शोक करण्यासही अधिक सवड मिळण्यासारखी नव्हती. जें कांहीं घरांत किडुक-

मिडुक शिल्लक राहिलें होतें तें घेऊन शक्य तों लौकर मुसलमानी वस्तींतून हिंदू वस्तींत जाणें भागच होतें. मृणालिनीच्या बरोबर आलेल्या मंडळींनीं झटपट आवराआवर केली. गुंडांच्या तडाख्यांतून बहुधा कांहींच शिल्लक राहिलें नव्हतें. मृणालिनी परत रोहिणीच्या घरीं येऊन दाखल झाली. दोघां मैत्रिणींची स्थिति आतां एकच झाली होती. कोणी कोणाचें सांत्वन करावें हा प्रश्नच उरलेला नव्हता.

* * *

दुसऱ्या दिवशीं १३ फेब्रुवारीला ढाक्यांत जिकडेतिकडे दंग्यास सुरुवात झाली. आतां येथें राहणें असुरक्षित म्हणून त्या दिवशीं दुपारच्या गाडीनें मृणालिनी, तिचीं दोन मुलें, रोहिणी, तिची दोन वर्षांची मुलगी, व इतर कांहीं मंडळी कलकत्त्यास जावयास निघाली. ढाका स्टेशनवर गर्दी प्रचंड होती. पण तशा गर्दींतून जागा मिळवून मृणालिनी बायकांच्या डब्यांत जाऊन बसली. केवळ २४ तासांत अशा गोष्टी घडल्या होत्या कीं सभोंवार काय घडत आहे हें तिला वा रोहिणीला कांहींच कळत नव्हतें. डोकें सुन्न होऊन गेलें होतें.

गाडी सुरू झाली. गाडींत अनेक हिंदु निर्वासित जीव मुठींत धरून बसले होते. कोणाच्या बायका गेल्या होत्या, कित्येकींचे पति गेले होते, कित्येकांच्या आईवडिलांना परलोकास धाडण्यांत आलें होतें, तर कित्येकांच्या मुलांबाळांची चटणी झाली होती. पैशा–अडक्याचें काय झालें याची बातमी कोणालाच नव्हती.

१३ फेब्रुवारी १९५० ची ती रात्र होती. या हजारो निर्वासितांना घेऊन गाडी कलकत्त्याकडे निघाली. ती मध्यरात्रीं गोविंदगंज स्टेशनपर्यंत धडपणें आली. गोविंदगंजवर अनेक मुसलमान गुंडांचा लोंढा गाडींत शिरला व गाडी चालू झाल्यावर त्यांनीं काटाकाटीला सुरुवात केली. आगगाडीच्या प्रत्येक डब्यांतून किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या.

कांहीं वेळानें बायकांच्या डब्यांतही गुंड शिरले; त्यांनीं तेथें भोसका–भोसकी आरंभिली. प्रत्येकीनें दागिने काढून द्यावेत

असें फर्माविण्यांत आलें. रोहिणीच्या गळ्यांत एक अलंकार होता. त्याला एकानें हात घातला. रोहिणीची आई मध्यें पडली. पण दुसऱ्या एका गुंडानें तिला उचलून चालत्या गाडींतून फेंकून दिलें रोहिणीच्या कडेवर असलेल्या मुलीलाही बाहेर फेंकण्यांत आलें. गुंडांचा हल्ला झालेला पाहून मृणालिनीनें स्वत:जवळचा चाकू काढला व दिसेल त्या गुंडावर वार केले. मृणालिनीचा चाकू तो केवढा ! व तिचा जीव तरी तो केवढा! तिसऱ्या एका गुंडानें तिच्या मुलांना खवाट्याला धरून बाहेर फेंकून दिलें. व अखेरीस दुसऱ्या दोघांनीं मृणालिनीलाही उचलून ढकलून दिलें.

हा प्रकार मध्यरात्रीं झाला. मृणालिनी चालत्या गाडींतून बाहेर फेंकली गेली त्यामुळें ती बेशुद्ध झाली. सुमारें तासभरानें ती शुद्धीवर आली. तिचें सर्वांग ठेचून निघालें होतें. डोक्यांतून, हातापायांतून रक्त वहात होतें. रात्र संपून अस्पष्टसें दिसूं लागल्यावर मृणालिनी उठली. मुलांना शोधण्यासाठीं पाठीमागें चालूं लागली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला अनेक माणसें विव्हळत होतीं. कित्येक मेलेलीं होतीं. कांहीं अंतर चालून गेल्यावर डोकें फुटून मरण पावलेला अरुणचंद्र तिच्या दृष्टीस पडला. त्याचेपाशीं ती कांहीं वेळ थांबली. रडावें म्हटलें तरी तिच्या डोळ्यांत पाणी शिल्लक नव्हतें. दौर्बल्य व मूर्खपणा यांच्या अतोनात तिरस्कारानें तिच्या मनांत कारुण्य किंवा संताप या भावनांना जागा शिल्लक नव्हती. ती आणखी पुढें गेली तों गवतामध्यें रडण्याचा आवाज ऐकूं आला. तीन वर्षांचा हेमचंद्र गवतांत रडत होता. आगगाडींतून तो फेंकला गेला, पण योगायोगानें मऊ गवतांत पडल्यामुळें तो वांचला होता. त्याला फारशी दुखापत झाली नव्हती. आई दृष्टीस पडल्याबरोबर 'अम्मा अम्मा' म्हणून त्यानें तिला मिठी मारली. त्याला घेऊन मृणालिनी तशीच पुढें गेली. रोहिणीची आई मरून पडलेली तिला आढळली. त्याच्या पुढेंच चेंदामेंदा झालेली रोहिणीची लहानशी मुलगी होती.

येवढ्या प्रकारांतून मृणालिनीप्रमाणें आणखीही कांहीं माणसें वांचलीं होतीं तीं एकत्र आलीं.

इतके दारुण अत्याचार पाहिले पण त्यांतून स्वतःचे प्राण वांचविण्याची कोणाचीही इच्छा कमी झालेली नव्हती. म्हणून सर्वांचा एक गट करून ती मंडळी पायानेंच भारताच्या सरहद्दीकडे निघाली. वाटेंत ठिकठिकाणच्या खेड्यांतून निर्वासितांचे तांडे बाहेर पडत असलेले त्यांना भेटले. आजूबाजूच्या खेड्यांना आगी लागलेल्या दिसत होत्या. गुंडांच्या आरोळ्या दुरून ऐकूं येत होत्या.

खायला नाहीं, प्यायला नाहीं, कपडे नाहींत, अंगावर जखमा झालेल्या, अनेकानेक भीषण अत्याचारांचीं चित्रें डोळ्यासमोर सारखीं नाचत असलेलीं, भीति, करुणा, द्वेष, सूड अशा नानाविध भावनांनीं उद्विग्न निर्वासितांचे तांडे भारताकडे निघाले. मृणालिनी त्यांच्या बरोबर चालत निघाली. वाटेंत अन्सारांनीं हल्ले केले. पाकिस्तानी पोलिसांनीं झडत्या घेतल्या, अपमान केले. ते सर्व सहन करीत निर्वासितांचा हा तांडा १६ फेब्रुवारीला भारताच्या सरहद्दींत आला. हेमचंद्राला घेऊन मृणालिनीही त्यांच्या बरोबर बाकी राहिलेल्या निःशेष हिंदुस्थानांत आली.

★ ★ ★

**मृणालिनी** यथावकाश कलकत्त्याला सिल्ढा स्टेशनवर पोचली. तेथें निर्वासितांचा एक समुद्रच पसरला होता. आलेल्यांच्या व्यवस्थेसाठीं स्वयंसेवकांच्या कांहीं समित्या काम करीत होत्या. स्वयंसेवकांपैकीं एकानें मृणालिनीला विचारलें,

"ताई, तुम्हांला कोठें जावयाचें ?"

मृणालिनीला प्रश्न पडला. जावें कोठें ! ! थोड्या वेळानें तिनें सांगितलें, "नागपूरला माझे काका रेल्वेंत नोकरीला आहेत, त्यांना तार करा." स्वयंसेवकानें नागपूरला तार केली आणि मृणालिनीला व हेमचंद्राला नागपूरच्या गाडींत बसवून दिलें.

दिनांक २० ला सकाळीं कलकत्ता–मुंबई गाडी नागपूरला आली. मृणालिनी लहानग्या हेमचंद्राला घेऊन तेथें उतरली. तिचे काका पुलिनबाबू तिला उतरून घेण्यासाठीं स्टेशनवर आले होते. मृणालिनीचा तो वेष, फाटके कपडे, ठेचाळलेलें अंग, सुजलेले व खोल गेलेले डोळे, विस्कटलेले केंस, कपाळावर कुंकू नाहीं, तिच्या

बरोबर असलेला काळवंडलेल्या चेहऱ्याचा उदास हेमचंद्र हा सर्व प्रकार पाहून ते मनांत उमगले. कांहीं न बोलतां मृणालिनीला बरोबर घेऊन स्टेशनच्या बाहेर पडले व स्वतःच्या मोटारींत तिला बसवून ते घराकडे आले. घराशीं आल्यावर मृणालिनी खालीं उतरली. हेमचंद्र, पुलिनबाबू हेही खालीं उतरले.

घरांत जातांना ते ड्रायव्हरला म्हणाले, "हुसेन, आतां ऑफिसच्या वेळेला म्हणजे १० वाजतां ये. तोंपर्यंत जरुरी नाहीं."

मृणालिनी, हेमचंद्र, पुलिनबाबू घरांत शिरले. काकू, काकूंचीं मुलें दाराशीं आलीं.

घरांत शिरल्यावर मृणालिनीनें विचारलें, "हा हुसेन कोण ?"

पुलिनबाबू म्हणाले, "तो आमचा ड्रायव्हर आहे."

मृणालिनी पुलिनबाबूंच्याकडे नुसती पहात राहिली. तिच्या डोळ्यांतून एका भकास भयानक अशा अर्थशून्यतेचा भाव प्रतीत होत होता. तिला कशाचाच उमग पडत नव्हता.

पुलिनबाबूंनीं तिचा भाव कांहींसा जाणला व ते म्हणाले, "येथें तेथल्यासारखा प्रकार नाहीं. येथें पूर्ण शांतता आहे."

पुलिनबाबूंच्या त्या शब्दांच्या लाटा भोंवतालच्या वायुमंडळांत विरल्यासारख्या वाटल्या. पण वायुमंडळाला त्यांचें अस्तित्व सहन झालें नसावें. कारण क्षणार्धांत त्या लाटा परावर्तित होऊन परत आल्या व तेथें प्रतिध्वनि उमटला.

"येथें पूर्ण शांतता आहे... . ! ! ! ! ! !"

उनाडटप्पू ?...छे !

# सोन्यासारखीं पोरें

आठ दिवसांच्या वारेमाप पावसानंतर गेले दोन दिवस कुठें जरा उघडीप आली होती. आठ दिवस पाऊस म्हणजे काय झाला तें बोलायला नको. घराबाहेर तोंड काढायची सोय नव्हती. जी गळती लागली ती सारखी धों धों धों. ज्येष्ठाच्या महिन्यांत पाऊस नाहीं, पाऊस नाहीं म्हणून आरडा-ओरड झाली. अधिकाच्या महिन्यांतही पावसानें जरा गुंगाराच दिला. म्हणून पावसासाठीं जिकडे तिकडे मारे संतर्पणें सुरू झालीं. 'देवा पाऊस पाहिजे, पाऊस पाहिजे' म्हणून सारे ओरडू लागले. देवानें तें ऐकलें व मग पुढल्या पंधरवड्यांत जो पाऊस धाडला तो इतका कीं कांहीं विचारूं नका. त्यांतल्या त्यांत श्रावणाच्या दुसऱ्या आठवड्यांत अगदीं कहर झाला. नद्यांना पूर आले. कृष्णा तुडुंब वाहून निघाली; कोयनेला असें अवसान आलें कीं दोन्ही बाजूंचीं शेतें बुडवीत ती निघाली. वाटेंतल्या पुलांना तिनें ऐकलें नाहीं, मधले बंधारे तिनें पाहिले नाहींत, कोठें गंजी वाहवल्या, कोठें घरें वाहवलीं, कऱ्हाडांतल्या पुलावरून पाणी गेलें, कोठारां-कोठारांतून पाणी शिरलें, मालाची नुकसानी झाली, वखारी उद्ध्वस्त झाल्या. कोयनेनें मोठा हलकल्लोळ माजविला.

कऱ्हाडला कृष्णा आणि कोयना यांचा संगम होतो त्याला नांव आहे प्रीतिसंगम. संगम कसला तो! आणि त्यांत प्रीति तरी

कसली ? पावसाळ्याचा एवढा पूर फोंफावतो कीं दोन्ही बाजूंनी मस्तावलेल्या हत्तिणी याव्यात व त्यांनीं परस्परांना टकरा द्याव्यात असला कांहीं देखावा दृष्टीस पडतो. प्रीतिसंगम हें नांव मार्गशीर्षाच्या महिन्यांत शोभून दिसतें; पण श्रावणाच्या महिन्यांत तें बिलकुल शोभत नाहीं. कृष्णा—कोयना यांची त्या दिवसांत जणुं लढाईच चाललेली असते. त्या लढाईंत दोघींचीं गंडस्थळें जणुं फुटतात व त्यांतून रक्ताचा प्रचंड पाट वाहूं लागतो. त्याचा एक तिसराच प्रवाह सुरू होतो.

पण या लढाईनंतर मात्र कृष्णाकोयनांची अगदीं एकी ! मग त्या ज्या निघतात त्या जातात खेळत खेळत. कोठें त्यांच्या फुगडीचा खेळ चालतो, कोठें एकमेकींना चावण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. कोठें धांवायची त्यांच्यांत शर्यत लागते, कोठें वेणी चांगली कोणाला घालतां येते याची चढाओढ लागते. आणि हे असले खेळ खेळण्याच्या त्यांच्या प्रकारांवरून दोन्ही कांठच्या गांवांना तसलींच नांवें मिळालेलीं आहेत.फुगडी, निर्गुडी, दुधगांव, वेणगांव, चावरी, धावरी अशीं नांवें त्यांच्या कांठच्या गांवांना मिळालेलीं आहेत.

कृष्णा—कोयनांनीं एवढा आकांत माजविला तरी धांवरींतल्या पुंड तरुणांना त्याचें कांहींच वाटलें नाहीं. त्यांच्या पुंडाईला या दिवसांत अधिकच जोर चढला. तसल्या भयानक पुराच्या दिवसांत १०—१५जणांचें टोळकेचें टोळकें नदीच्या पुरांत उड्या टाकावयाचें आणि सपासप पाणी कापीत कापीत या कांठाहून त्या कांठाला, त्या कांठाहून पुन्हां या कांठाला असे शिवाशिवीचे खेळ त्यांचे चालावयाचे. हे खेळ कसले ? यमाची मुसंडी पकडावयाच्या प्रकारास खेळ म्हणतां आलें तर या पुंडांच्या लीलांना खेळ म्हटलेलें चालेल, पण, असले त्यांचे उपद्व्याप चालावयाचे. गांवापासून दोन मैलांवर नदीच्या दोन्ही कांठच्या झाडांना त्यांनीं एक भला मोठा जाडजूड दोर बांधला होता, त्याला लोखंडी कड्या लावलेल्या होत्या. त्या कड्यांना धरून दोराच्या एका टोकानें निघून दुसऱ्या टोकाला जावयाचें हा उद्योगही त्यांच्या आवडीचा होता. पुराच्या दिवसांत त्यांचा आणखी एक धंदा म्हटला

म्हणजे पुरांतून वहात येणारे मोठाले ओंडके, गवताच्या गंजी इत्यादि सामान हेरायचें, पुरांत उड्या टाकून पकडायचें व दोराच्या साहाय्यानें कांठाला आणून घरांघरांतून भरून ठेवायचें. हा धंदा पुराच्या दिवसांत मोठा तेजींत चाले. दोन दोन महिन्यांच्या सर्पणाची बेगमी या दिवसांत हीं 'पोरें' करून ठेवीत असत. वाहतीं जनावरें, वाहतीं माणसें वांचविणें ह्या गोष्टी म्हणजे त्यांच्या हातचा मळ होता.

दोन दिवसांच्या उघडिपीनंतर गांवांतली बाकीची मंडळी शेतावर आपापल्या उद्योगाला गेली. कृष्णा–कोयनांचा पूर बराच ओसरून गेला. आतां मजा राहिली नाहीं म्हणून पुंडखोर टोळी चार दिवसांखालीं तालमींत घुमत होती. ६५ वर्षांचे तात्या आणि ६९ वर्षांचे नाना त्या दिवशीं सकाळींच घराबाहेर पडले. कृष्णेचें स्नान करून शंकराचें दर्शन घेऊन घाटावर शिळोप्याच्या गोष्टी करीत बसले. दोघांचेही केस पिकले होते. पण म्हातारा म्हटलेलें त्यांना खपत नसे. चालणें ताठ व दृष्टि शाबूत होती.

सकाळचा आठचा सुमार असावा. तात्यांची दृष्टि नदीच्या वरच्या बाजूला पलिकडच्या कांठाकडे गेली. दूर अंतरावरून कांहीं तरी वाहात येत होतें. ते नानांना म्हणाले, "नाना पाहिलें का तें काय वाहात येत आहे ?"

नानांनीं निरखून पाहिलें, "काऽय आहे ? काय काळं काळं दिसत आहे. कांहीं लांकूड फांटा असेल."

थोड्या वेळांत वाहाता पदार्थ दृष्टीच्या जरा जवळ आला. तात्या ओरडले, "कोणी बाई माणूस आहे" 'शिरप्या, चंद्या, येश्या अरे यारेऽऽ या' तात्यांनीं मोठी आरोळी दिली. नानांनींही मोठी आरोळी देऊन भिम्याला, त्यांच्या नातवाला, हांक मारली.

काय बोंब उठली म्हणून पुंड कंपनी तालमींतून बाहेर आली. तों तात्यांची तिसरी हांक ऐकूं आली. शिरप्या ओरडला, 'मोप लांकुड फाटा झाला. आतां पाण्यांत पडायचं नायऽऽहो." तात्या ओरडले, "अरे, बाई वाहून चाललीऽऽ, बाई वाहून चाललीऽऽऽ अरे याऽऽरेऽऽ लौकरऽया."

बाई वाहून चालली हें ऐकल्याबरोबर पोरें धांवलीं. नेसत्या लंगोटावरच तालमींतून बाहेर पडलीं. घाटावर आलीं. पहातात तों नदीच्या वरच्या बाजूला पलीकडच्या कांठाकडून एक बाई पालथी वाहात येत होती. भिम्या, चंद्या, शिरप्या सर्वांनीं भराभर उड्या घेतल्या. पाणी कापीत सर्वजण निघाले. शिरप्या सगळ्यांत पहिल्यानें बाईजवळ गेला. येश्या त्याच्या पाठोपाठ होता.

"येश्या, अरे बाई अगदीं खलास दिसते आहे. अंग बघ लांकडासारखे ताठ झालं आहे." शिरप्या म्हणाला. येश्यानें पाहिलें तों खरोखरीच बाईचें अंग ताठरलें होतें. न जाणो असलीच धुगधुगी तर असा विचार करून येश्या म्हणाला, "पहिल्यांदां बाहेर नेऊन पाहूं. असली धुगधुगी तर वांचेल नाहींतर नाहीं." येश्या असें म्हणत आहे तोंच शिरप्यानें बाईला पकडलें. येश्या व तो दोघे मिळून तिला कांठाकडे नेऊं लागले. इतक्यांत भिम्या ओरडला, "अरे तें रे काय ?" वळून पहातात तों एक पालथी पडलेली मोठी घागर बाईच्या किंचित पुढेंच पाण्यांतून निघून धारेनें वहात निघाली होती. भिम्यानें घागरीचा तांबा घेतला. इतका वेळ पावेतों गांवांतली बायका-मुलांची नदीवर गर्दी झाली. पाण्यांत पडलेलीं पोरें जशीं पोहत कांठाकडे येऊं लागलीं तशी कांठावरची गर्दी व नाना-तात्या ही जोडी कांठाकांठानें पळत निघाली. थोडक्याच वेळांत येश्या, शिरप्या इत्यादि मंडळी कांठाला लागली. बाईला वर आणलें. नाकाशीं सूत धरून पाहिलें तों सूत हलत होतें. इतक्यांत कोणी तरी चाक आणलें. बाईला चाकावर घालून तें गरगर फिरविण्यांत आलें. पण फ़ारसें पाणी बाहेर पडलें नाहीं.

"बाई पाणी कांहीं फार प्यालेली दिसंत नाहीं." शिरप्या म्हणाला.

"अरे, माझ्या ध्यानांत आलें काय प्रकार आहे तो. ही घागर पालथीच्या पालथी बाईच्या छातीखालीं असली पाहिजे. त्यामुळें घागर तरंगली त्याच्याबरोबर बाईही घागरीवर तरंगत आली असली पाहिजे व म्हणून बाईच्या पोटांत फारसें पाणी गेलेलें नाहीं. पण

घागर छातीशीं घेऊन ही बाई काय पोहायाला उतरली होती नदींत ?" भिम्या म्हणाला.

तितक्यांत तात्या म्हणाले, "अरे, कामें करतां करतां गप्पा करा. बाई गारठली आहे. तिला शेकलें पाहिजे. तिच्या अंगांत कांहीं ऊब आली म्हणजे ती शुद्धीवर येईल."

जमलेल्या लोकांनीं बाईचें अंग पुसून काढलें, अंग चोळून, शेक देऊन बाईला शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. नानांनीं ह्ऱ्या महाराला बोलावून आणलें व म्हटलें, "अरे बाई कोणत्या गांवची आहे त्याची चौकशी करून ये. पलीकडच्या कांठावरून ज्या अर्थी वहात आली त्या अर्थीं त्या कांठावरच्या कोण्या गांवची असेल. जा, प्रत्येक गांवांत दवंडी पीट आणि शोध लाव." ह्ऱ्यानें काठी-कांबळें उचललें व तो निघाला !

ह्ऱ्यानें ओळीनें गांवें घेतलीं. चावरी, वेणगांव, कसगांव, दुध-गांव, निर्गुंडी अशीं गांवें घेतां घेतां तो दुपारीं फुगडींत येऊन दाखल झाला. फुगडीमध्यें दवंडी दिल्याबरोबर संपतराव धांवत आले. "अरे, बाई कशी आहे, जिवंत आहे का नाहीं ?" अशी चौकशी करूं लागले. त्यांची आवडाबाई सकाळीं उगवत्यालाच पाणी आणायला घागर घेऊन गेली ती परत आली नव्हती. मासे पकडावयास बसलेलीं कोळ्यांचीं पोरें सांगत आलीं. 'आवडाबाई पाणी घेण्यासाठीं खालीं वांकली तोंच घागर हातांतली सुटली. त्याचबरोबर तिचाही तोल गेला व ती पाण्यांत पडली.' कोळ्याचीं पोरें वरच्या बाजूला दूर होतीं त्यामुळें त्यांना कांहीं करतां आलें नाहीं. आवडाबाईनें एक किंकाळी फोडली तें त्यांनीं ऐकलें; पण, पुढें पाहतात तों आवडाबाई धारेबरोबर वहात चालली होती.

संपतराव ह्ऱ्याला म्हणाले, "कोळ्याच्या पोरांनीं हें सांगि-तल्यापासून आम्हांला अन्न गोड लागेना. जीव उडून गेल्यासारखें झालें. तिच्या पोरांनीं रडून रडून डोळे सुजवून घेतले. पण तूं हें सांगितलेंस तें बरें झालें. देवानें खैर केली. कृष्णाबाईनें माझ्या आवडीला तरंगवलें. चल बाबा, पहिल्यांदां घरीं. गुळाचा चहा पहिल्यांदां घे, भाकर खा, मग धांवरीला जायला निघूं." बायको

जिवंत असल्याच्या आनंदाच्या ऐन प्रसंगीं सुद्धां दुरून उन्हाच्यानें चालत आलेल्या महाराला प्रथम जेऊं खाऊं घालायचें संपतराव विसरले नाहींत.

चहापाणी करून भाकर खाणें झाल्यावर संपतराव गाडी घेऊन निघाले. माझ्या आवडाबाईला केव्हांचें एकदां घरीं आणीन असें त्यांना होऊन गेलें. "येवढ्या पुरांतून माझी बायको वांचली, देवाची कृपा हेंच खरं, आतां सत्यनारायण केल्याशिवाय रहायचें नाहीं" असें त्यांनीं ठरविलें.

फुगडीच्या गांवकऱ्यांना बातमी समजतांच ते पण निघाले. त्यांनीं बरोबर वाजंत्री घेतले.आवडाबाई येवढ्या पुरांतून २० मैल वाहात जाऊन वांचली तेव्हां कृष्णाबाईची ती मुलगी असली पाहिजे असें त्यांच्या मनानें घेतलें. तिला गांवांत आणावयाचें तें वाजतगाजतच असें त्यांनीं ठरविलें.

संपतराव, ह्ऱ्या व बाकीची मंडळी रात्रींच्या सुमाराला धांवरीला आली. पहातात तों ती आवडाबाईच निघाली. स्वत: आवडाबाईचा आनंद कांहीं विचारूच नका. पोरें तर तिला जीं बिलगलीं तीं जणुं वानरीचीं पिलेंच ! नाना–तात्यांच्या जोडीनें आवडाबाईला चांगलें शेकल्यानंतर ती तास दीड तासानें शुद्धीवर आली. पहिल्यांदां भलभलतेंच ती बोलत होती. तिला वाटत होतें कीं, आपण दुसऱ्याच कोठल्या जगांत आहोंत. कप दोन कप गरम चहा पोटांत गेल्यावर तिला वरें वाटलें, व ती पूर्ण भानावर येऊन आपण कोण, कोण्या गांवची इत्यादि माहिती तिनें सांगितली.

संपतराव व त्यांचे गांवकरी मित्र त्या रात्रीं धांवरीलाच राहिले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून मंडळी आवडाबाईला गाडींत घालून वाजत गाजत निघाली. संपतराव तात्यांना म्हणाले, "तुमचे फार फार उपकार झाले."

तात्या म्हणाले, "अहो, आमचे कसचे! हीं पोरें; लोक म्हणतात त्यांना उनाडटप्पू, पण त्यांनींच आवडाबाईला वांचविलें. अहो, तीं पोरें अशीं तशीं कां आहेत ! पोरें सोन्यासारखीं आहेत, सोन्यासारखीं!"

# हंस

"सावधान दक्ष, आ–रम्; द्विश: संपत.".

आज्ञा होतांक्षणींच वीस कोवळे कोवळे तरुण एकदम दोन रांकांत उभे राहिले. त्यांचे भोंवतीं सुमारें १००० स्त्री–पुरुषांचा गराडा पडलेला होता. मोदी गणपती रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या घरांच्या गॅलऱ्यांतून, खिडक्यांतून आणि गच्च्यांवरून, लोक डोकावून पहात होते. देवळाजवळ एक पोलीस मोटार उभी होती. मोटारपाशीं एक सबइन्स्पेक्टर १० पोलिसांसह उभा होता.

"सावधान् सिद्ध, क्रमिका पांच कुरु" तत्क्षणीं दिलेल्या आंकड्याबरोबर २० लाठ्या सपसप फिरूं लागल्या.

लाठीचें प्रात्यक्षिक संपल्यावर ते तरुण एकत्र आले. त्यांतील एक तेथील कट्ट्यावर उभा राहिला आणि **"हिंदू आम्ही भीति कुणाची जगतीं आम्हांला"** हें पद्य सांगूं लागला. तो एकेक चरण

# आणि
# सारस

सांगूं लागला व बाकीचे त्याच्या पाठोपाठ साद देऊं लागले. दोन चरणांनंतर जमलेले सारे लोकही पद्य म्हणूं लागले.

पद्य संपल्यावर मघांचा आज्ञा देणारा तरुण उभा राहिला. त्यानें भाषणास सुरुवात केली,

"लोकहो, तुम्हांला माहीत असेल कीं, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचे निवारणार्थ राष्ट्रीय स्वयंसेवक संघानें सत्याग्रह पुकारला आहे. आपण सर्व जाणतां कीं, संघावर अन्यायानें बंदी घालण्यांत आली. ज्या घटनेशीं संघाचा काडीमात्रही संबंध नव्हता तिचें निमित्त करून ही बंदी घालण्यांत आली. संघाचे स्वयंसेवक हे चोर, दरोडेखोर, अनीतिमान, अत्याचारी, जातीय द्वेषानें वरब्टलेले आहेत असे आरोप करण्यांत आलेले आहेत.

"हे आरोप खरे आहेत काय? आमचें म्हणणें एवढेंच कीं, आरोप सिद्ध करा, आम्ही गुहेगार ठरलों तर आम्हांला फांशीं द्या, आम्ही गुन्हेगार नसूं तर आमच्यावरील बंदी काढून घ्या. सरकारनें हे आरोप परिस्थितीनें आंधळेपण आल्यामुळें केलेले आहेत. सरकारला आपली चूक कळून येईल म्हणून आम्ही १० महिने वाट पाहिली, सामोपचाराचे सर्व प्रयत्न झाले; अखेर लोकमताला कौल लावणें, आणि महात्माजींनीं सांगितल्याप्रमाणें शुद्ध बुद्धीनें, आत्मक्लेशांनीं हृदयपरिवर्तन करणें या मार्गाकडे संघाला प्रवृत्त व्हावें लागलें आहे.

"येथें २० स्वयंसेवक उभे आहेत. हा ज्ञानेश्वर काळभोर, याच्या मातोश्री समोर उभ्या आहेत. हा चोर आहे काय? दरोडेखोर आहे काय? या विसांतील प्रत्येक तरुण पहा. आपणा सर्वांच्या कुळांना काळिमा लागेल असें वर्तन यांच्या हातून होईल असें स्वप्नांत तरी आपणांस वाटेल काय? सरकार म्हणतें संघाचे स्वयंसेवक जातीय द्वेषानें जळत आहेत. येथें २० स्वयंसेवक उभे आहेत. यांतला कोणीही 'जळत' असलेला आपल्या दृष्टीस पडत असेल तर पहा. सर्वांचे चेहरे पहा. सर्व आनंदी आहेत, हंसरे आहेत, तगडे आहेत, निर्भय आहेत.

"संघावर केले जात असलेले सर्व आरोप संपूर्ण खोटे आहेत. पक्षस्वार्थानें आंधळे झालेले लोक संघासंबंधीं वारे प्यायल्यासारखें काय हवें तें बरळतात. त्यावर विश्वास ठेवूं नका. निष्कलंक चारित्र्याच्या, समाजहितार्थ सर्वस्व अर्पण करणाऱ्या, कोटयवधि लोकांची सुसूत्र संघटना निर्माण केल्याविना देशापुढील प्रश्न सुटणार नाहींत हें जाणून पूजनीय डॉ. हेडगेवार यांनीं १९२५ सालीं संघाची स्थापना केली. स्थापनेच्या त्या दिवसापासून पक्षापक्षाचा विचार न करतां हिंदुमात्र तेवढा एक हें जाणून प्रत्येकानें हिंदुसमाजावर नितांत प्रेम करावें हीच गोष्ट संघानें शिकवली आहे."

इतक्यांत एक पोलीस जवळ येऊन सांगूं लागला. "साहेब म्हणतात, जरा लौकर आटपा."

"हो हो संपलेंच मला अधिक सांगावयाचें नाहीं. संघावरील आरोप खोटे आहेत. ते सरकारनें मागें घेतलेच पाहिजेत. संघबंदी उठलीच पाहिजे. भारतमाता की जय!"

लगेच सगळीकडे 'भारतमाता की जय' 'संघबंदी उठलीच पाहिजे' 'गुरुजींची सुटका झालीच पाहिजे' अशा आरोळ्या सुरू झाल्या. प्रार्थना होऊन सर्व सत्याग्रही धांवतपळत, हंसतखेळत विनोदाचे फवारे उडवीत पोलीस-मोटारींत जाऊन बसले. जणु एखाद्या सहलीलाच ते निघाले होते.

★ ★ ★

नारायणरावांनीं तें दृश्य पाहिलें. ते बोलले नाहींत. पण चित्ताचा क्षोभ झाला असल्याचें त्यांच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें. ते तडातडा निघाले आणि आप्पांचे घरीं आले.

"आप्पा अरे आप्पा, हा प्रकार आपण किती वेळ पहात रहावयाचा?"

४०९७

"कोणता प्रकार?"

"त्या संघाचा. त्यांची ती चळवळ की मळमळ सुरू होऊन १५ दिवस झाले. दरदिवशीं त्यांचा प्रचार वाढतच चालला आहे. हजार हजार लोक त्यांच्या त्या शाखा पहावयास जमतात,

त्यांच्याबरोबर घोषणा करतात, गर्जना करतात, बायका येऊन त्या मुलांना निरांजनांनीं ओवाळतात, कुंकुमतिलक लावतात, फुलें उधळतात, काय वाटेल ते प्रकार चालले आहेत!"

"यांत नांवें ठेवण्यासारखें काय आहे तें मला अजून समजलें नाहीं."

"नांवें ठेवण्यासारखें काय आहे? काय नाहीं? हा प्रकार असाच चालू दिला तर आपल्या पक्षाचें सामर्थ्य कमी होईल. लोकांच्यांत कमी झालेलें संघाचें वजन अतोनात वाढेल, संघावरची बंदी उठेल आणि आपल्या पक्षाचें कांहीसे वाढीस लागलेलें काम पुन्हां कोसळेल. एवढें सगळें होईल. आणि तुम्ही मात्र म्हणत राहणार नांवें ठेवण्यासारखें त्यांत काय आहे!"

"तूं म्हणतोस ते परिणाम मला कबूल आहेत. पण त्याला आतां आपण करणार काय? संघाच्या लोकांना तरी सत्याग्रह करण्याचा अधिकार आहेच ना? आपण त्यांना कसें थांबवणार?

"त्यांना थांबवतां आलें नाहीं तरी त्यांचा प्रचार थांबलाच पाहिजे. त्यांच्या प्रचाराला विरोधी प्रचार आपण सुरू केलाच पाहिजे. काट्यानें काटा काढायचा तसा आपल्या प्रचारानें त्यांचा प्रचार पार मोडून टाकावयाचा. गांधीजींच्या हत्येनंतर आपण जसा प्रचार केला त्यापेक्षां जास्त हिरीरीनें यावेळीं प्रचार केला पाहिजे."

"करा, मग मी कुठें त्यांत आडवा येत आहे."

"हें तुझें अकरणात्मक बोलणें चालणार नाहीं. संघाविरुद्ध बोलण्यांत तू गप्प राहिलास तर लोक त्याचा अर्थ वेगळा करतील. उद्यांच आपल्या पक्षातर्फे एक सभा बोलवावयाची. त्यांत तुला भाषण करावें लागेल. मी बोलेनच. आचार्य भारवत याला एक बोलावयास सांगूं. तो झकास बोलतो."

* * *

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं रात्रीं पितळे तालमीजवळ सभा बोलाविण्यांत आली. संघवाले सभेंत गडबड करणार अशी खास आंतल्या गोटांतील बातमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनीं

आणल्यामुळें सभेच्या आसपास पितळें तालमीचे लोक फिरते ठेवले होते. लोकसेनेच्या सैनिकांचा कडेकोट बंदोबस्त करण्यांत आला होता. पण त्या सर्वांचा बंदोबस्त बहुधा अपुराच पडेल अशी खात्री वाटून फरासखान्यांतून खास बंदोबस्त करविण्यांत आला होता. लाठीधारी पोलीस इकडून तिकडे फिरत होते. जवळच दोन मोटारी जय्यत उभ्या होत्या. इन्स्पेक्टर, सब इन्स्पेक्टर्स येरझारा घालीत होते.

ठरल्यावेळीं सभेस सुरुवात झाली. सभेस गर्दी भलतीच झाली होती. लोकसेनेचे सैनिक, स्त्री कार्यकर्त्या इत्यादि मिळून चांगली १५०–२०० मंडळी उपस्थित होती.

नारायणरावांनीं अगदीं तुफान भाषण केलें. संघवाल्यांच्या अगदीं शेलक्या शेलक्या गोष्टी त्यांनीं बाहेर काढल्या. फॅशिष्ट मनोवृत्तीचे हे लोक प्रतिपक्षीयाला जीव जाईतोंपर्यंत कसें मारतात त्याचें त्यांनीं रसभरीत वर्णन केलें. एके ठिकाणीं फॅशिष्ट संघवाले प्रतिपक्षीयाला ठार मारावयास त्याच्या घरीं गेले. पण तो घरीं नव्हता म्हटल्यावर दारांत बांधलेल्या गाईला त्यांनीं कसें मारलें, ती गाय त्या मारानें कशी हंबरूं लागली, गाय रक्तबंबाळ झालेली पाहून सूड उगविल्याचें समाधान मिळवून हे दुष्ट कसे निघून गेले, त्या प्रसंगाचें त्यांनीं हृदयविदारक वर्णन केलें. श्रोतृगण त्या भाषणानें विव्हल झाला आणि जिकडून तिकडून शेमशेमच्या आरोळ्या उठल्या.

आप्पांचें भाषण थोडावेळ झालें. संघवाल्यांचा हा सत्याग्रह नसून हट्टाग्रह आहे हा मुद्दा त्यांनीं विशद केला.

नंतर टाळ्याच्या गजरांत अध्यक्ष आचार्य भारवत बोलावयास उठले. ते म्हणाले, " संघवाल्यांच्याबद्दल सभा घ्यावी इतकी सद्धां त्यांची लायकी नाहीं. पण सत्याग्रहाच्या नांवानें हट्टाग्रह करीत आपण निष्पाप, निरपराध असल्याचा डांगोरा ते पिटीत आहेत, त्यामुळें जनता फसण्याचा संभव आहे, म्हणून सत्यस्थिति लोकांपुढें मांडली पाहिजे. संघवाल्यांची अवलाद पूर्णपणें नाहींशी झाली पाहिजे इतके त्यांचे अपराध घोर आहेत. त्यांचे हात रक्तानें बर-

बटलेले आहेत. त्यांच्या घरांघरांतून गुप्त हत्यारें सांठविलेलीं आहेत. गुप्तपणें हे लोक हिटलरची पूजा करतात. त्यांचे संस्थापक जर्मनीला जाऊन नाझीझमची दीक्षा घेऊन आले होते. सर्व मुसलमानांना आणि काँग्रेसवाल्यांना नष्ट करूं अशा प्रतिज्ञा लहान लहान मुलांच्याकडून हे करवून घेतात. काँग्रेसच्या व देशाच्या मोठमोठ्या पुढाऱ्यांचे फोटो हे लोक आपल्या बुटाच्या टाचेंत ठेवतात. ते फोटो समोर ठेवून त्यावर नेमबाजीचें शिक्षण घ्यावयास यांना शिकविलें जातें. या गोष्टी मी फुकाच्या सांगत नाहीं. मला सर्व माहिती आहेत. हे लोक बदफैली आहेत. अनीतीमान आहें. यांच्या कित्येक कार्यकर्त्यांना मी शुक्रवार पेठेंत हिंडतांना पकडलें आहे. संघवाल्यांना सत्यासत्याची कांहींही चाड नाहीं.

"अशा भयंकर लोकांच्या संघटनेवर सरकारनें बंदी घातली ही मी भाग्याची गोष्ट समजतों. ती बंदी उठवण्यासाठीं आतां हे लोक म्हणे सत्याग्रह करीत आहेत. अरे, आतां तुम्हांला सत्याग्रह कां आठवला ? सबंध हिंदुस्थानांत तुमचे ५२ लाख लोक आहेत ना ते कुठें गेले? यांची चळवळ सुरू होऊन १५ दिवस झाले नाहींत तोंच लोक संपुष्टांत आले. आतां म्हणे पोरींना आणि बायकांना तुरुंगांत जायला हे लावणार आहेत !

"संघ म्हणजे विष आहे. हें कालकूट नाहीसें झालेंच पाहिजे. संकुचित विचाराचे, हिंदुधर्माला कलंक लावणारे, आईबापांचा धिक्कार करणारे, भ्याड, नीतिशून्य, द्वेषानें आंधळ्या झालेल्या लोकांची ही संघटना आहे. ती मोडलीच पाहिजे. यांच्या सध्यां चाललेल्या नाटक-तमाशास कोणींही बळी पडतां कामा नये. सरकारवर त्यांच्या चळवळीचा परिणाम होऊं नयें म्हणून जनतेनें आपला आवाज उठवलाच पाहिजे."

आचार्यांचें भाषण झाल्यावर टाळ्यांच्या कडकडाटांत सभा संपली. सर्व घरोघरीं गेले.

★ ★ ★

सभा कल्पनेपेक्षां अधिक यशस्वी झाली याबद्दल नारायण-रावांना मोठे समाधान वाटलें. आचार्य भारवत यांनीं तर कमालच केली. सभा संपल्यावर त्यांनीं आचार्यांना कडकडून मिठी मारली. "शाबास कमाल केलीत तुम्ही. अशा सभा आपण पेठेंपेठेंतून घेऊं आणि आर्. एस्. एस्. ला हाणून पाडूं" याप्रमाणें निश्चित करून नारायणराव घरीं आले.

त्या रात्रीं त्यांना शांत झोप आली.

दुसऱ्या दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें पहाटेच ते उठले. दिवसांचीं कामें काय हें पहातांच 'मनोरंजन' मासिकासाठीं आजच्या आर गोष्ट लिहिलीच पाहिजे याची त्यांना आठवण झाली. सक आठ वाजतां पक्षाचे कामासाठीं बाहेर जावयाचें असल्य नारायणराव प्रातर्विधि आटोपून तांतडीनें गोष्ट लिहावयास बले.

काय लिहावें बरें ? अरे हो ! असें म्हणून नारायण लेखणी भरभर चालवूं लागले. कथा कादंबऱ्या लिहिणें त्यांच्या हातचा मळ होता.

नारायणरावांनीं लिहिलें:–

# तें निर्व्याज निष्पाप बालक

"जानेवारी १९४७ चे ते दिवस होते. दिल्लीमध्यें थंडीच्या त्या दिवसांत हार्डिंग्ज पार्कमध्यें एक बारा वर्षांचा छोटा मुलगा खेळत होता. मुलाला पाहिल्या क्षणींच त्याचेबद्दल प्रेम उत्पन्न होईल अशी त्याची कांति होती. पायांत पांढरी तुमान, अंगांत गुडघ्यापर्यंत लोंबणारा अंगरखा, यावर हिरव्या साटीनचें चकाकणारें जाकीट, त्यावर ती गोंडेदार लालभडक तुर्की टोपी, सर्वच पेहेराव इतका खुलून दिसत होता कीं बस! थंडीनें फुटलेले त्याचे गोबरे गोबरे फुगीर गाल, लकाकणारे डोळे, लहान जिवणी आणि किंचित् नकटें नाक यामुळें कोणासही मुलाला पाहिल्याबरोबर त्याला उचलून घ्यावेंसें वाटावें असेंच त्याचें आकर्षण होतें.

एक मोठा रबरी चेंडू घेऊन तो मुलगा खेळत होता. खेळतां खेळतां हातांतून चेंडू निसटून जवळच्याच मोठ्या पुष्करिणींत पडला. हातांतील खेळणें गमावल्यामुळें मुलाचा विरस झाला. चेंडू काढण्यासाठीं तो ओणवा झाला. पण चेंडू दूर होता तो हाताशीं येईना.

मुलगा पाण्यांत ओणावलेला पाहून कांहीं अंतरावर असलेल्या झिरझिरीत गुलाबी ओढणी घेतलेल्या त्याच्या आईनें हांक मारली.

"हसन हसन, अरे भलतेंच काय ?"

"अम्मा, अग चेंडू पाण्यांत पडला !"

"म्हणून पाण्यांत कां डोकावयाचें ? पडशील ना !"

अम्मानें येऊन चेंडू काढण्याचा प्रयत्न केला पण तो सफल होईना.

हसन अगदींच निराश झाला. त्यानें जवळपास पाहिलें तो तेथें त्या वेळीं कोणीही नव्हतें दूर अंतरावर एका बाकावर एक शीख अधिकारी पायावर पाय टाकून शांतपणें चिरूट ओढीत बसला होता.

हसनच्या मनांत एक कल्पना स्फुरली तो आपल्या छोट्या पायानें धांवत गेला व मेघसिंहाच्या पायाला विळखा घालून गोड आर्जवी आवाजांत म्हणाला.

"चाचाजी, चाचाजी माझा चेंडू पाण्यांत पडलाय हो ! द्या ना काढून. तो बघा तिथें जवळच पडला आहे."

त्या गोजिरवाण्या निर्व्याज अंतःकरणाच्या बालकाला पहातांच मेघसिंहाच्या मनांतलें वात्सल्य अभावितपणें जागृत झालें. त्यानें छोट्या हसनला एकदम उचलून घेतलें व त्याचा गोड पापा घेऊन म्हटलें,

"बेटा, क्या कहता है ? चलो, बताव मुझे."

हसननें आपल्या नाजूक लुसलुशीत हातानें मेघसिंहाचें बोट धरून त्याला पुष्करिणीपाशीं नेलें. मेघसिंहानें हातांतल्या छडीनें त्याचा चेंडू काढून दिला. हसन आनंदानें नाचूं लागला. त्याची

अम्मा मेघसिंहाला धन्यवाद देऊं लागली, पण मेघसिंह म्हणाला, "त्यांत काय आहे, माझा रूपसिंग असाच नाहीं का?"

*

या घटनेला केवळ आठच महिने झाले असावेत; सप्टेंबर महिन्यांतील त्या दिवशीं दिल्ली शहराचें सर्व वातावरण भयानक आरोळयांनीं कुंद होऊन गेलें होतें. ठिकठिकाणीं पिवळया जांभळया आगीच्या ज्वाळा जिभळया चाटीत फडफडत होत्या. रस्त्यारस्त्यानें प्रेतांचे खच पडले होते. स्त्री नाहीं, पुरुष नाहीं, गर्भवती स्त्रिया नाहींत, कोवळीं बालकें नाहींत, जातिद्वेषाचे असुर जेथें तेथें मुक्त थैमान घालीत होते. ....

नारायणराव लिहीत होते. त्यांना स्वत:चें लिखाण आवडलें. किती अप्रतीम रसनिर्मिति झाली आहे, असें त्यांना वाटलें.

तितक्यांत खिडकींतून मोठा गलका व जयजयकाराच्या आरोळया ऐकूं येऊं लागल्या. नारायणरावांनीं खिडकीवरचा रेशमी पडदा दूर करून बाहेर पाहिलें, संघवाल्यांच्या कोणच्याशा शाखेचा सत्याग्रह चाललेला त्यांच्या दृष्टीस पडला.

त्यावेळीं त्यांचा कार्यक्रम बहुधा आटोपलेला दिसत होता. एक स्वयंसेवक उभा राहून गाणें सांगत होता.

संघ माझा चांगला
गांव समदा रंगला ।
चंग आम्ही बांधिला
भेदभाव संपला ।। धृ ।।
संघ माझा चांगला
गांव समदा रंगला ।

सुमारें ७–८ शें स्त्रीपुरुष जमले होते ते सर्व घोळून घोळून म्हणूं लागले;

"संघ माझा चांगला
गांव समदा रंगला ।

नारायणरावांचे कपाळावर आठ्या पडल्या. त्यांच्या मनाच्या एकाग्रतेचा भंग या गोंगाटानें झाला होता. त्यांनीं पडदा पुन्हां सरकवून लेखनास सुरवात केली:—

"मेघसिंहही त्याच आसुरी भावनांनीं पिसाटला होता. हातांत एक कृपाण घेऊन तो वेड्यासारखा रस्त्यानें धांवत धांवत चालला होता. तोंडानें पुटपुटत होता रूपासिंह, रूपासिंह, तुझीं त्या चांडाळांनीं खांडोळीं केलीं ना? आज तुझ्या अतृप्त आत्म्याला मी शांत करतों."

धांवता धांवता मेघसिंह हार्डिज पार्कपाशीं आला. जवळच्याच जळत्या घरांतून एक बारा वर्षांचा मुलगा तितक्यांतच निघून घाबऱ्या घाबऱ्या पळत होता. मेघसिंहाला पहातांच तो "चाचाजी, चाचाजी," म्हणत त्याच्याकडे जाऊं लागला. मेघसिंहाला त्यानें बरोबर ओळखलेलें दिसलें.

१२ वर्षांचा मखमालीसारखा मऊ हसन आधारासाठीं मेघसिंहाकडे धांवला.

हसनला पहातांच मेघसिंहाच्या डोक्यांत एक क्रौर्याची, अघोरी समाधानाची छलाका लकेरून गेली. मेघसिंहानें पळत येणाऱ्या हसनचा हात धरला आणि उजव्या हातांतलें कृपाण—"

नारायणराव लिहिण्याच्या भरांत अगदीं तन्मय झाले होते. पण मध्येंच दार वाजलें. विद्यागौरी दार उघडून किंचित धांवतच आंत आली.

"बाहेर पाहिलें का? आपल्या मंगलेच्या गुणाकरानें सत्याग्रह केला. तो म्हणतो मलाही तुरुंगांत नेलें पाहिजे.'

विद्यागौरीनें पडदा दूर सरकवला. नारायणरावांनीं अनिच्छापूर्वक बाहेर दृष्टि टाकली.

बाहेर सत्याग्रह करणारे स्वयंसेवक हंसत हंसत मोटारींत बसत होते. एकजण म्हणाला, "अरे आपण कुठें जातों समजलें का? अरे, O. T. C. ला निघालों आहोंत" त्याच्या विनोदावर सर्व मोठ्यानें हंसले.

सगळे बसल्यावर इन्स्पेक्टर मोटारींत बसणार व मोटार सुरू होणार तोंच १२ वर्षांच्या एका तजेल मुलानें आपल्या लहानग्या दोन हातांनीं इन्स्पेक्टरचा हात धरला.

"अहो मी मघां सांगितलें ना ? मी सुद्धां सत्याग्रह केला आहे. माझें नांव लिहून घ्या. मला तुरुंगांत न्या."

"अरे, पण काल दिलेल्या सत्याग्रहींच्या यादींत तुझें नांव कुठें आहे ?"

"नसलें तर घाला आतां. लिहा गुणाकर गोखले. अहो यादी तुम्हाला दिल्यानंतर मग रात्रीं माझें सत्याग्रह करण्याचें ठरलें."

"अरे बाळ, पण बालांनीं सत्याग्रह करावयाचा नाहीं. तुमच्या अधिकाऱ्यांचीच आज्ञा आहे."

"अहो, पण मी आईला विचारलें आहे. मी आतां सर्व कार्यक्रम केले, मी प्रार्थना म्हटली, मी ध्वजप्रणाम केला, मला तुम्ही पकडलेंच पाहिजेत. तुम्ही सत्याग्रह करणाऱ्यांना पकडणार कीं संघाचे अधिकारी सांगतील त्यांना पकडणार ?"

"अरे वेड्या,तुला सत्याग्रह म्हणजे काय हें तरी कळतें का ?"

"कळते कां म्हणजे ? आमच्या संघावर वाईट वाईट आरोप केले, संघावर बंदी घातली, गुरुजींना कैदेंत टाकलें म्हणून आमचा सत्याग्रह आहे. सरकारला त्यामुळें समजेल आपण किती किती वाईट गोष्टी केल्या आहेत."

गुणाकराचा तो आर्जवी, आग्रही, सात्त्विक निग्रहाचा प्रफुल्ल चेहरा पाहून इन्स्पेक्टरसुद्धां विरघळला.

तें दृश्य पहात असतां विद्यागौरीचे डोळ्यांत पाणी तरारूं लागलें.

नारायणराव मात्र पुन्हां टेबलाशीं बसले. कांहींशा रुक्ष आवाजांत ते म्हणाले, "त्यांत काय पाहावयाचें आहे ! एकजात सर्व विषवल्ल्या आहेत. कांहीं एक कौतुक करावयाला नको."

तितक्यांत इन्स्पेक्टरला न जुमानतां तो १२ वर्षांचा मुलगा मोटारींत जाऊनही बसला. मोटार सुरू झाली.

नारायणरावांनीं आपले लिखाण सुरू केलें.

"...आणि उजव्या हातांतलें कृपाण मेघसिंहानें त्या कोवळ्या शरीरांत खुपसलें. रक्ताचें एक कारंज उडालें. मेघसिंहाचे कपडे लाल झाले.

"साप आहेत साप; हें तरी सापाचेंच पिल्लूं" मेघसिंह पुटपुटत होता "रूपा, रूपा तुझीं खांडोळीं केलीं ना रे!!"

मेघसिंहाच्या चेहऱ्यावर आसुरी समाधान झळकलेलें स्पष्ट दिसलें.

आनंद, वात्सल्य, प्रेम, निर्व्याजता, सुजनता या मानवी मनाला ईश्वरी प्रसाद देणाऱ्या सर्व भावनांचा पूर्ण होम झाला असल्याचें त्या चेहऱ्यावरून स्वच्छ प्रतीत होत होतें.

"निर्व्याज निष्पाप बालक ! ! !"

नारायणरावांची गोष्ट संपली.

विद्यागौरी खुर्चीच्या मागें उभी राहून नारायणरावांच्या गोष्टीचा शेवट वाचीत होती. पण तिच्या डोळ्यांसमोर "अहो, मी सुद्धां सत्याग्रह केलाय. मला पकडा, तुरुंगांत न्या" असें म्हणणाऱ्या गुणाकराची मूर्ति नाचत होती.

तिनें मान फिरविली. समोरच्या भिंतीवर एक सुंदर तैलचित्र टांगलेलें होतें. निसर्गरम्य असें एक सरोवर, त्यांत निळें निळें निर्मळ पाणी, आजूबाजूला रमणीय वनश्री आहे, आपल्या लांब डौलदार माना वांकवून कांहीं हंस पाणी चाखत आहेत, मध्येंच एका कमळाच्या पानावर एक सारस पक्षी मान उंचावून भकास डोळ्यांनीं व तहानलेल्या घशानें, करुणापूर्वक व चिरचिऱ्या आवाजांत आकाशाकडे पाहून नसलेल्या पाण्यासाठीं टाहो फोडीत आहे, असें तें नयनमनोहर चित्र होतें.

विद्यागौरीनें त्या चित्राकडे एकवार क्षणभर पाहिलें, व दुसऱ्या क्षणीं नारायणरावांकडे पाहून एक दीर्घ सुस्कारा टाकला.

# स ॥ गा
## परिवर्तन

आईच्या मृत्यूनंतर दुसऱ्या दिवशीं विनायक दु:खी मनानें राख सांवडून अस्थि घेऊन प्रयागला जाण्यास निघाला. अंबूताईंचा मृत्यु हा कांहीं अनपेक्षित नव्हता, किंवा अकालींही नव्हता. पण आई–वडिलांच्या मायेची पांखर आपणावर नित्य असावी असें वाटणाऱ्या मातृपितृभक्त अंत:करणाचा विनायक असल्यानें त्याला मातृनिधनाचें दु:ख जास्तच जाणवलें. आधींच सत्त्वशील असलेली त्याची वृत्ति अधिकच अंतर्मुख झाली.

विनायक अलाहाबादेस रात्रीं पोंचला. स्टेशनवर तो उतरला. कोणी स्वागतासाठीं येण्याचा प्रश्नच नव्हता. पंड्यांच्या तावडींत सांपडावयाचें नाहीं, निरर्थक आचारधर्म आचारावयाचा नाहीं. गंगामातेला अस्थि अर्पण करून, तीर्थस्नान करून परत निघावयाचें असा मनाचा ठराव असल्यामुळें विनायक स्टेशनजवळच्या एका पथिक निवासांत उतरला. दिवस पावसाळ्याचे होते. स्टेशनवरून पथिक निवासांत जाईतोंपर्यंत पर्जन्यदेवानें विनायकला ओले कपडे काढून ठेवण्याइतका प्रसाद दिलाच.

विनायकला रात्रीं झोंप येण्याची अडचण आली नाहीं. पथिकाश्रमांतील ढेकणांनीं त्याला बेजार केलें नाहीं किंवा डासांनीं त्याची झोंप चाळविली नाहीं. मन भारावलेलें असल्यामुळें अंथरुणावर तो पडला न पडला तोंच त्याला झोंप लागली. झोंपतांनां दुसऱ्या दिवशीं अस्थिविसर्जन करून लगेच सायंकाळीं पुण्यास जाण्यासाठीं निघावयाचे असा विचार त्याच्या मनांत घोळत होता.

पहाटे विनायक जागा झाला. पण प्रातर्विधीसाठीं गच्चीवरून खालच्या मजल्यावर जावयाचें म्हटलें तरी सुद्धां जाणें शक्य नव्हते. पावसाचा तडाखा भयंकर होता. रस्त्यावरून पाणी जोरानें वहात चाललें असल्याचा आवाज स्पष्टपणें ऐकूं येत होता. रात्रभर पावसाचा धिंगाणा चालू असावा हें त्या आवाजावरूनच कळत होतें.

सकाळीं ९ वाजले पण बाहेर पहाटेचे ६ वाजलेले असावेत इतकाच उजेड होता. पावसाच्या स्थितीमध्यें कांहींच बदल नव्हता. विनायकानें उठून बाहेर भिजत जाऊन प्रातर्विधि उरकलें.

" देखिये बाबूजी बारिश कितनी जोरसे आती है। आज कुछ व्यवहार न होगा। बझार बंद होगा।, ऑफिसेस बंद रहेगी।, पाठशाला और कॉलेजेस बंद रहेगी। क्या आप ऐसी अवस्थामें अभी प्रयाग तीर्थ जाओंगे ?"

(" बाबूजी पाहिलेंत पावसाचा जोर किती भयंकर आहे. आज सर्व व्यवहार बंद रहाणार, बाजार बंद राहणार, ऑफिसें, शाळा, कॉलेजें बंद राहणार. अशा परिस्थितींत आपण प्रयागतीर्थाला आजच जाणार का ? )

" हो पाऊस असला तरी मी आज निघणारच. कांहींही झालें तरी रात्रीचे गाडीनें पुण्यास गेलेंच पाहिजे. तिकडे महत्त्वाचीं कामें आहेत,"

सकाळची न्याहारी करून पथिकाश्रमाच्या मालकाकडे एक मोडकी तोकडी छत्री होती ती घेऊन विनायक बाहेर जाण्यास निघाला.

"काय मालक प्रयाग तीर्थ येथून किती दूर आहे ?"

"येथून कमींतकमी ५ मैलांचें अंतर आहे."

"वहानें मिळतील का ?"

"वहानें मिळतील. पाऊस कितीही असला तरी पोटासाठीं त्यांना धंदा केलाच पाहिजे. एकादा रिक्षा केलात तर फार पैसे पडणार नाहींत. टांगेवाला दीड रुपया तरी घेईल, पण माझें ऐका एवढ्या भर पावसांत जाऊं नका"

विनायकाचा जाण्याचा निश्चय झालेला होता. अस्थींचें गांठोडें बरोबर घेऊन तो बाहेर पडला. रस्त्यावरून पाणी तुडवीत कांहीं अंतर गेल्यावर चौकांत एक सायकल रिक्षा उभा होता ! विनायकानें त्याला हांक घातली.

"ए रिक्षा"

"क्या बाबुजी ?"

"अरे प्रयागतीर्थ जाना, क्या लेगा?

"बाबूजी आपने समझकर दे देना ! देखिये बारिश कैसी टूट पडी है !"

"बारिश तो है ही, फिर बोल जल्दी क्या लेगा ?"

"एक कहूं ? आठ आना लूंगा !"

विनायकाला आश्चर्य वाटलें. एवढा पाऊस, त्यांत कोपऱ्यावर असलेला एकटा एक असा रिक्षा, अशा मोकयाच्या वेळीं ५ मैल जाण्याचा आकार काय? तर आठ आणे ! देशांतील पराकाष्ठेच्या दारिद्र्याची ही मूर्तिमंत साक्ष होय, पै पैशाला लोक महाग आहेत, असें विनायकाच्या मनांत आलें. रिक्षा चालूं लागला. अजून पावसाचा जोर कमी झालेला नव्हता. त्याचा मारा अविरत चालू होता. रस्त्यानें सर्वत्र गुढगाभर पाणी वहात होतें. तशांतून नखशिखान्त भिजलेला रिक्षावाला छाती हॅन्डलवर वाकवून कष्टानें पेडलें मारीत चालला होता.

हळूंहळू अलाहाबादची वस्ती मागें पडली. दोन्ही बाजूला पाण्यानें भरलेल्या शेतांतून डांबरी सडक जात होती. त्यावरून रिक्षा धांवूं लागली. रस्ता जवळजवळ निर्मनुष्य होता. नाहीं

म्हणावयास मैलभराच्या अंतरांत कोठें दोनचार यात्रेकरू कोंडाळें करून गंगामैय्याच्या दर्शनाला पायीं रस्त्यानें चालले होते. पण विनायकाचें तिकडे लक्ष नव्हतें.

सपाटीचा रस्ता संपून मध्येंच एक भला उंच चढ लागल्यानें रिक्षावाला थांबला व पाय उतारा होऊन तो रिक्षा लोटूं लागला. तितक्यांत रस्त्याच्या कडेला उभे असलेले दोन इसम धांवत आले व ते पाठीमागून रिक्षा लोटूं लागले. विनायकाला वाटलें रिक्षावाल्याच्या कोणी ओळखीचे लोक त्याला मदत करण्यासाठीं थांबलेले असावेत. कांहीं वेळानें चढ संपला, रिक्षा उतारावर धांवूं लागला. रिक्षाच्या गादीखालीं पाय ठेवण्याच्या जागेंत एकाबाजूला मुटकुळी करून तो २५ वर्षांचा तरुण बसला व दुसऱ्या बाजूला वयस्कर म्हातारासा इसम बसला.

"बाबूजी आपण गंगायमुनांच्या संगमावर जाणार ना ?" त्या तरुणानें विचारलें. "आम्हां गरिबांची नौका आपल्या सेवेसाठींच आहे."

विनायकाच्या ध्यानांत आलें कीं प्रत्यक्ष संगमाचे जागेवर जाण्यासाठीं नौकेंतून जावें लागत असावें. तेथेंही नौकावाल्यांमध्यें मोठी चढाओढ असली पाहिजे म्हणून गिऱ्हाईक मिळविण्यासाठीं हा नावाडी इतक्या दूर पळत आला असावा. त्यानें उत्तर दिलें. "हो संगमाचे जागीं जावयाचें आहे. जाईन तुझ्या नौकेंतून; पण, पैसे किती घेशील ?"

'क्या बाबूजी ! पैसेका हिसाब क्या? हम गरीब आदमी! जो कुछ आप दे देंगे वही हम लोक ले लेंगे."

"छे छे, ती भानगड चालवयाची नाहीं. नंतर घासाघीस आणि भांडणें नकोत. आतांच काय तें नक्की बोल, नाहीतर आपलें दुसऱ्या नावाड्याला विचारलें."

"महाराज आपणांस काय सांगूं? आम्ही गरीब लोक पैशाचा वायदा कधीं करीतच नाहीं. आपण जें द्याल त्यांत आम्हांला संतोष आहे. दहा जणांचें पोट चालवायचें. कोठून तरी चार आठ आणे मिळाले म्हणजे झालें."

पैशाचे वायदे नेहमींच आधीं ठरवून घेणाऱ्या विनायकास ती परिस्थिति ऐकून दुःख झालें. दहा माणसांचें जीवन रुपया दोन रुपयांत चालवावयाचें! किती कष्ट असतील! आणिक थोडी घासाघीस झाली. नावाडी पैसे ठरविण्यास राजी होईनात. दरएक वेळीं दीनवाण्या डोळ्यांनीं, अंगावरचे फाटके कपडे दाखवीत, "महाराज आम्ही गरीब माणसें, आपल्या हातानें जें मिळेल त्यावर खूष राहूं" असें त्यांनीं म्हणावें, हा प्रकार झाल्यानें विनायकानें माघार घेतली. त्यानें मनात विचार केला, "५ मैल पावसांतून यावयाला रिक्षावाला ८ आणे घेतो. मैल दोन मैल पुरांतून येण्याजाण्यास नावाडी किती घेईल? घेईल ८–१२ आणे, फार तर रुपया, विशेष नाहीं. बिचाऱ्या गरिबाला पोटाला तरी मिळेल!"

असें बोलणें होत आहे. तोंच समोर एक किल्ला दिसूं लागला. रिक्षावाला थांबला, "महाराज, आलें प्रयागतीर्थ."

★ ★ ★

रिक्षावाल्याचे पैसे चुकते करून विनायक नदीकाठाकडे निघाला. बरोबर दोघे नावाडी होतेच. विनायकानें तरुण नावाड्याला विचारलें, "क्यों जी आपका नाम क्या ?"

"मुझ गरीब को लोग रामप्रसाद कहते हैं जी!"

"तूं कोठचा राहणारा ?"

"महाराज मी इकडचा नाहीं. माझा मुलूख दूर तिकडे लांब बिहारमध्यें आहे."

"काय बिहारचा राहणारा ? मग इकडे कशाला आलास ?"

"महाराज, पोट आहे ना ? घरची शेती होती. पण जमीनदारानें शेती हिसकावून घेऊन देशोधडीला लावलें, तेव्हांपासून पोटापायीं रानोमाळ हिंडत आहें. महाराज, हा किल्ला पाहिला का?" उजव्या हातच्या किल्ल्याकडे बोट दाखवीत विषय बदलीत रामप्रसाद म्हाणाला. "हा अशोकानें बांधलेला आहे. अजून जसाच्या तसा आहे. कोठल्याही भिंतीला चीरसुद्धां गेलेली नाहीं."

उजव्या हाताला अशोककालीन भव्य किल्ला उभा होता. डाव्या हाताला गंगामैय्या दुथडी वाहून चाललेली होती. पाया-

खालीं चिखल असा होता कीं, पाय केव्हां फसेल याचा नेम नव्हता. पाऊस कमी झाला होता, पण अजिबात थांबलेला नव्हता. थोड्या अंतरावर किनाऱ्यावर पांच पन्नास नावा नांगरलेल्या दिसत होत्या. जवळच्या बजरंगाचे देवळाशीं कांहीं तेलंगी यात्रेकरू दर्शन घेत होते. दूर अंतरावर एक मोठा तराफा नुकताच किनाऱ्याला लागत होता. त्यांत ओले गच्च भिजलेले सुमारें ४०-५० स्त्री-पुरुष यात्रेकरू आनंदानें हंसत खिदळत होते. एवढे लोक सोडले तर तो नदीचा विस्तीर्ण काठ जवळजवळ सुनाच होता.

"यावें, यावें महाराज, असें इकडून या, इथें पाऊल ठेवा, आतां नावेंत पाऊल ठेवा, भिऊं नका, नाव कलंडावयाची नाहीं, इथें कोरडी जागा आहे. बसा आपण—" रामप्रसादनें विनायकाचें स्वागत खरोखरी एखाद्या राजाला शोभेल अशा थाटानें चालविलें होतें.

नावेंत पाऊल ठेवण्यापूर्वीं किंचित अंतरावर असलेला दुसरा एक नावाडी ओरडला, "आअिये महाराज, क्या तीर्थके जगह स्नान करने जाअेंगे ? यहाँ पधारिये"

विनायकानें उत्तर दिलें, "याचे नावेंतून मीं चाललों, आतां तुझा उपयोग नाहीं."

"महाराज, पैसा कितना देना इसका ठराव किया है न ? देखिये इसका ठराव पहले करना" त्या नावाड्यानें कपाळाला आठ्या घालून किंचित् तिरकस दृष्टीनें रामप्रसादाकडे पहात विनायकाला सल्ला दिला.

त्या तिरकस दृष्टीचा अर्थ विनायकाचें ध्यानांत आला नाहीं. समव्यवसायी लोकांत ही लाथाळी नेहमींच चालणार असें तो मनांत समजला. पण रामप्रसादनें त्या तिरकस दृष्टीला आपले जळते डोळे भिडवून गुरकावलें, "ए साले ! बीचमे मुह डालनेकी तुझे क्या जरुरी ?"

तितक्यांत नाव किनाऱ्यापासून सुटली. रामप्रसाद सुकाणूं धरून बसला. बाकी दोघेजण दोन्ही हातांनीं वल्हीं मारूं लागले. नाव किनाऱ्यापासून दूर जायला फार वेळ लागला नाहीं. काठापाशीं

पाण्याची ओढ व खळखळ फार असल्यामुळें प्रथम नाव थोडीशी प्रवाहाबरोबर वहात गेली, पण किनाऱ्यापासून दूर प्रवाहाचे किंचित् मध्यें आल्यावर पाण्याचा वेग तितकासा भासेनासा झाला व नाव प्रवाहाविरुद्ध जाऊं लागली. रामप्रसाद स्वत: सुकाणूंवर बसला होता, त्याचा मध्यम वयस्कर बाप व दुसरा तरुण असे दोघे जोर जोरानें वल्हीं मारीत होते. पुढें वाकून वल्ही मागें न्यावयाचीं व मग पाण्याला जोर लावून छाती मागें टाकीत पाणी कापावयाचें, यामध्यें दंडाचे हालणारे ते पिळदार स्नायु, पुढें मागें होणारी ती हालचाल, जोरानें चाललेला श्वासोच्छ्वास यांतून प्रतीत होणारें शक्तिसौंदर्य विनायकाला नवीन नव्हतें. पण गंगा-मैय्याच्या वाहत्या प्रवाहांत वल्हयांमुळें फुटणाऱ्या लाटा, नावेंत शिरूं पहाणारें पाणी, पावसाच्या धारांमुळें पाण्याच्या पृष्ठभागा-वर चाललेलें नाचकाम या गोष्टींतील निसर्गसौंदर्य विनायकाला अगदींच नवीन होतें.

विनायकाच्या मातृभक्त मनाला गंगामातेचें तें दृश्य जणुं स्वदेश–भूचें–भूमातेचें एक प्रतीकरूप चित्रच वाटूं लागलें. गंगामातेचा प्रवाह घाईघाईनें अज्ञात अखेरीकडे निघालेल्या भारताच्या जीवनप्रवाहा-सारखा त्याला वाटूं लागला. येथल्या लाटा सागरावर येणाऱ्या उत्तुंग लाटांप्रमाणें नव्हत्या, कारण भारतीय जीवनांत जर उंची नाहीं तर या चित्रांत कशी येणार, असा तरंग त्याचे मनांत आला. वरून कोसळणारा पाऊस जणुं भारतावर कोसळणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचें चित्रण करीत आहे, आणि राकट शरीराचे ते नावाडी जणुं भारतांतील दारिद्रय प्रतिबिंबीत आहेत, असें त्याला भासूं लागलें. पण त्याच बरोबर प्रत्येक वल्हयागणिक धांवत्या प्रवा-हाला पराभूत करून प्रवाहाविरुद्ध सरकणारी ती नाव जणुं काय कष्टांची किमया करून अडचणींच्या प्रवाहाविरुद्ध भारताला प्रगत करतां येईल असें सुचवीत असावी असा आभास त्याच्या मनाला होऊं लागला.

शेवटची कल्पना मनांत येतांच विनायकाला किंचित हंसूं आलें. त्याच्या मनांत आले "आपलें मन आशावादी आहे तर, कोठल्याही रूपकांतूत तें अखेर मनाला उल्हसितच करणार.'

विचारांच्या पुष्पक विमानांतून विहार करणाऱ्या विनायकाचें भ्रमण चालू आहे तोंच—

" क्या महाराज आप तो बम्बईके रहनेवाले होंगे न ?

असा रामप्रसादाचा आवाज कांहींसा त्याला ऐकूं आला. पण त्याचा अर्थ ध्यानांत न घेतांच, तिकडे लक्ष न देतांच विनायकानें उत्तर दिलें.

" हां। "

" आप तो बडे अमीर आदमी होंगे ? '

" हां। "

" आप कोई मिलके मालिक होंगे ? "

" हां। "

" मैनें पहलेही पहचान लिया था। "

विनायकाचे विचार चालूच होते. रामप्रसादाचे ते प्रश्न त्याच्या डोक्यांत फारसे शिरले नाहींत, किंवा आपण कशाला हो म्हणत आहोत याचेंही भान त्याला राहिलें नाहीं.

इतक्या अवकाशांत मैल दीड मैल दूरवर पसरलेल्या व भरधांव निघालेल्या गंगामैय्याच्या प्रवाहाच्या ऐन मध्यावरून नाव चालू लागली. पावसाचा जोर कमी झाला असला तरी बुरबुर चालू होती. त्यामुळ दोन्ही कांठावर काय आहे, कोण माणसें आहेत हें कांहींच दिसत नव्हतें. निसर्गाच्या त्या रौद्र रूपामध्यें ती एकटी एक नाव, ते तिघे नावाडी, आणि विनायक प्रवाहाविरुध्द प्रवास करीत होते.

कांहीं वेळ निस्तब्धतेंत गेला.

" महाराज सामने देखिये, आगया प्रयाग तीरथ। यहांसे गंगामाई आती है, वहांसे जमुना आती है, वहां संगम होता है, बीचमे सरस्वती गुप्त रूपसे मिलती है इस लिये इस तीरथको त्रिवेणी संगम कहा जाता है। "

विनायक रामप्रसादनें दाखविलेल्या दिशेनें पाहूं लागला. एका बाजूनें येणारी यमुना व दुसऱ्या बाजूनें येणारी गंगा त्याच्या दृष्टीस पडली. त्याचें मन आनंदानें उमललें.

त्याला वाटलें भारताच्या सर्व-प्रश्नावर तोडगा सांगण्याचें कार्यच हा त्रिवेणी संगम करीत आहे. यमुनेचा काळा प्रवाह दाखवीत असावा कीं व्यक्तीव्यक्तीमधील स्वार्थ, द्वेष, मत्सर इत्यादि पापें धुवून टाकणारा प्रवाह हवा, गंगेचा स्फटिकवत् प्रवाह दाखवीत असावा कीं चारित्र्यसंपन्नता, स्वदेशनिष्ठा, ईश्वरार्पण बुद्धि यांचें सिंचन करणारा प्रवाह हवा, आणि गुप्त रूपानें वास करणारी सरस्वती सांगत असावी कीं ज्ञानोपासना अप्रसिद्धपणें आणि अखंडपणें घडविणारा तिसरा एक प्रवाह असला पाहिजे, आणि एक सामूहिक संघटित जीवन उत्पन्न करून स्वदेशाचा जीवनओघ पुढें नेला पाहिजे असें हे तिन्ही प्रवाह एकवटून पुढें जाणारा जान्हवीचा जलौघ सूचित करीत असावा.

तितक्यांत रामप्रसादादानें विचारलें, " क्या महाराज आप किनारेपर उतारकर स्नान करेंगे ? "

" हां ! "

रामप्रसादनें सुकाणूं फिरवून नाव मधल्या किनाऱ्याला आणून टेकविली.

" उतरा महाराज येथें, आपलें स्नान उरकून घ्या, आटोपलें कीं लागलीच निघूं. "

विनायक अस्थींचें गांठोडें घेऊन किनाऱ्यावर उतरला. थोडक्याच वेळांत स्नान करून, शुचिर्भूत होऊन ओलेत्यानें भक्तियुक्त मनानें आईच्या अस्थि त्यानें गंगेंत विसर्जन केल्या.

तो अखेरचा विधि आटोपतांना त्याचा कंठ निरुध्द झाला. हात जोडून त्यानें म्हटलें " आई तूं होतीस तोंपर्यंत यथाशक्ति तुझी सेवा केली ; आतां तूं पार्थिव शरीरानें नाहींस. तथापि मातृभूमीची सेवा म्हणजे तुझीच सेवा असें मी तरी समजतों. अशी तुझी सेवा अखेरपर्यंत माझे हातून घडो असा आशीर्वाद दे. "

विनायकानें बरोबर आणलेलें पावसानें ओलसर झालेलें वस्त्र परिधान केलें व रामप्रसादाला तो म्हणाला—

" चलिये जी ! "

★ ★ ★

नाव चालू झाली. प्रवाहाच्या मध्यावर आली. कांहीं वेळ कोणीच कोणाशीं बोललें नाहीं.

" क्यौं महाराज ! आपका स्नान हुवा, अब कहिये हम लोगोंको क्या मुशाहिरा देंगे ? " रामप्रसादनें सुरुवात केली.

हा अनपेक्षित प्रश्न आतां भलत्याच ठिकाणीं कां उत्पन्न झाला याचें विनायकाला आश्चर्य वाटलें.

" हें आतां कां विचारलें ? "

" तसें नाहीं. आम्ही तीन माणसें आहोंत. आमच्या पोटाकडे पाहून द्या म्हणजे झालें ".

" देईन. मला परवडेल आणि तुम्हाला संतोष होईल, असें कांहीं देईन. "

रामप्रसाद व त्याचा बाप यांचेमध्यें डोळ्यांवाटें कांहीं संकेत झाले.

" आतांच येथें सांगा काय देणार तें."

नाव पुढें जावयाची थांबली. वल्हीवाले अशी वल्ही मारू लागले कीं नाव प्रवाहाविरुद्ध पुढें जाईना. रामप्रसादनें सुकाणु असें धरून ठेवले कीं नावेला परतीची दिशा घेतां येईना.

" आतांच सांगू ? तें कां ?" विनायकानें विचारलें.

" कां म्हणजे ? आम्ही मागतों म्हणून." इतका वेळ मऊ चाल-णारा रामप्रसादचा स्वर एकदम बदलला व कठोर झाला. विना-यकाला समजलें कीं कांहीं भानगड आहे.

" मुशाहिरा किती पाहिजे ?"

" पोटाला पुरेल इतका. इथं तिघेजण आहोंत, घरीं बायका-माणसें कच्चींबच्चीं मिळून १० जणांचे कुटुंब आहे. सर्वांचें पोट भागलें पाहिजे."

" म्हणजे किती तें आण्यांत,' रुपयांत सांगा. मला तसें कांहीं समजत नाहीं. नावेंत बसण्यापूर्वींच मी तुम्हाला सांगितलें होतें कीं आधीं ठराव करा. त्यावेळीं तूं म्हणालास मर्जीला लागेल तें द्या. त्यांत आम्ही सुखी आहोंत.'

'आतांही मी तेंच म्हणत आहे. मर्जीला येईल तें द्या. शंभर रुपयांच्या आंतली रक्कम मी घेणार नाहीं."

"एवढ्या येण्याजाण्याचें १०० रुपये ?"

"कोण म्हणतो शंभर रुपये?' रामप्रसादच्या बापानें पहिल्यांदां तोंड उघडलें." आम्ही पैशाचा वायदा करीत नाहीं. तुम्ही तुमचा कोट काढून ठेवा, हातांतलें घड्याळ काढून ठेवा; त्यांत आम्हांला जें मिळेल तें आमचें नशीब !"

"म्हणजे ही शुद्ध दरोडेखोरी आहे !"

"दरोडेखोरी ? कशाला म्हणतोस दरोडेखोरी ?" रामप्रसादच्या डोळ्यांत एक खुनशी चमक चमकली. "तुझ्या अंगाला आम्ही हातही लावलेला नाहीं; आम्ही येथें तिघें आहोंत. मनांत आणलें असतें तर केव्हांच तोंड दाबून पैसे काढून घेतां आलें असतें. पण आम्ही दरवडेखोर नाहीं. आम्ही तसें करणार नाहीं. तुम्हां लोकांनीं आम्हां गरिबांना पिळून लुटलेले पैसे आम्ही तुम्हांला ओकायला लावणार. हा पूर्ण न्यायच आहे."

"गरिबांना पिळून मिळालेला पैसा ? कोणी पिळले ? मी ? मी कधीं कुणाला पिळलें ?"

"तूं पिळले नसशील. तुझ्या काकानें पिळलें असेल."

"रामप्रसाद सरळ भाषा बोल. मला वाटलें तूं भला माणूस आहेस !"

"हो मी भला होतों. अजूनही भलाच आहे. पण भल्याशीं भला आहे. आमच्या शेतावरून ज्या दिवशीं त्या जमीनदारानें आम्हांला हांकलून लावलें, १० माणसांचें कुटुंब उकिरड्यावर फेंकलें, त्यादिवशीं माझें भलेपण संपलें. जमीनदाराच्या कुळीच्या लोकांना जिथें संधि सांपडेल तिथें त्या गोष्टींचें शासन देण्याचा आम्ही निश्चय केला आहे."

"म्हणजे हें अन्यायपरिमार्जन आहे म्हणतोस तर ! वेडा आहेस. नव्यानें अन्याय करून जुन्या अन्यायांचें परिमार्जन होत नसतें."

रामप्रसादनें त्यावर उत्तर दिलें नाहीं. तेव्हां रामप्रसादचा बाप म्हणाला, "बोलत वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं. ठरलेल्या गोष्टी पुऱ्या झाल्याच पाहिजेत."

"म्हणजे ?"

"म्हणजे दुसरें कांहीं नाहीं. कोट आणि घड्याळ काढून ठेवा."

"आणि नाहीं ऐकलें तर ?"

रामप्रसादानें फोंफों वाहणाऱ्या त्या तुफान नदीकडे एकवार पाहिलें व म्हटलें, "नाहीं ऐकलें तर गंगामाईचा आश्रय करावा लागेल."

"म्हणजे तुम्ही मला ढकलून देणार !"

"छे ! छे ! तुझ्या अंगाला आम्ही हातही लावणार नाहीं. आम्ही तिघे नावेच्या केवळ एका बाजूला होऊं. नाव त्यामुळें उलटेल. चौघेही पाण्याच्या ओढींत सांपडूं. पाण्याच्याच लाटावर आम्ही तिघे वाढलेलो असल्यानें उपडी झालेली नाव आम्ही किनाऱ्याला घेऊन जाऊं, तुझें तूं पहा काय होईल."

सभोंवार मैल दीड मैल दूर अथांग पसरलेलें, पावसाळ्यानें लाल झालेलें पाणी अविश्रांतपणें धांवतपळत होतें, फेसाळत होतें, नजर टिकूं देत नव्हतें. निर्मनुष्य भकास वातावरणांत झिमझिम पडत राहिलेला पाऊस तेथली भयानकता वाढवीत होता. ढगाळलेलें काळें आकाश, किंचित् प्रकाशामुळें वातावरणाला आलेली काळोखी, तिघा नावाड्यांचे गंभीर, क्रूर व काळे चेहरे !! विनायकाची छाती धडधडूं लागली. त्याच्या हाताला किंचित् कंप सुटला, आवाजांत बारिक कातरता आली, ओठ सुकल्यासारखे झाले, डोळ्यांत अस्थिरता आली, चेहरा उतरला, पण मन म्हणालें, 'खबरदार रहा दरोडेखोरासमोर वाकूं नकोस, बेहत्तर आहे, होईल तें होईल, ताठ रहा.'

विनायकानें ठरविलें अगदीं गंगेचा महापूर असला तरी काय झालें. पोहून जाऊं—पार होऊं—नाहीं पार झालों तर पर्वा नाहीं, पण वाकायचें नाहीं, पराभव खावयाचा नाहीं.

विनायकानें बाह्या सांवरल्या, तो म्हणाला, "मी लेचापेचा मनुष्य नाहीं. मलाही चार हात करतां येतात."

विनायकाची स्थिति रामप्रसाद सूक्ष्म दृष्टीनें पहात होता. त्याच्या दृष्टींतून कांहींही सुटलें नाहीं.

"कोणाशीं चार चार हात करणार, आमच्याशीं? त्याचा उपयोग काय? नाव उलटावयाची ती उलटणारच! पुढचा प्रकार व्हावयाचा तो होणारच. मूर्ख होऊं नकोस. गोष्टी शहाणपणानें सुफल होतात, तुला मागचा एक प्रसंग सांगतो. केवळ २५-३० दिवसांपूर्वींचीच गोष्ट. असाच कोणी मुंबईचा गुजराथी शेटचा आला होता. त्याला आम्ही नीट समजावून सांगितलें. पण त्याला तें खरें वाटलें नाहीं. मूर्ख होता. पैसा त्याला प्राणापेक्षां प्रिय वाटला. बिलकुल ऐकेना. मग इलाज राहिला नाहीं. तो वहात गेला! तीन गटांगळ्या त्यानें घेतल्या. त्यावेळीं पुष्कळ आरडला ओरडला. पण उपयोग नव्हता. त्याच्या प्रेताचासुद्धां पत्ता लागला नाहीं. सुसरी-मगरींनीं बहुधा खाल्लें असेल!"

मुंबईच्या वृत्तपत्रांतून १५ दिवसांपूर्वीं तीर्थयात्रेला जाऊन बेपत्ता असलेल्या लक्षाधीशाबद्दल झालेली चर्चा विनायकाला आठवली.

"धमक्यांचा माझ्यावर परिणाम होणार नाहीं." तो बाह्यतः शांतपणा दाखवीत म्हणाला. "आयुष्य हा तर एक खेळ आहे, ती एक परमेश्वराची सेवा आहे. दरोडेखोरांच्या धमक्यांना बळी पडण्यापेक्षां गंगामातेच्या उदरांत, त्रिवेणी संगमांत कायम निवास केलेला वाईट कोण म्हणेल? त्रिवेणी संगमांत नुसत्या अस्थि पडल्या तरी आत्मा स्वर्गास जातो म्हणतात, मग ज्याचा त्रिवेणीमध्यें प्रत्यक्ष मृत्यूच होईल त्याचें खासच वाईट होणार नाहीं."

विनायकाच्या धैर्याचें रामप्रसादाला मनांतून नवल वाटलें. पण त्याचेजवळचे शब्द संपलेले होते. त्यानें बापाला हांक मारली.

"दादा ..."

तोंच विनायक ओरडला, "थांब थोडा थांब."

"थांबू? का विचार बदलला? हरकत नाहीं. अजून घड्याळ व कोट काढून ठेव."

"छे, विचार बदलला नाहीं. दरोडेखोरांच्या हातून गंगास्नानाचें पुण्य मिळण्यापूर्वीं परमेश्वराची अखेरची प्रार्थना मला करून घेऊं दे."

"परमेश्वराची प्रार्थना? खुशाल कर! प्रार्थनेनें मरण चुकलें असतें तर जगांत कोणी मेलेंच नसतें, पण वेळ थोडा आहे, लौकर आटप." रामप्रसादनें तडकाफडकीं उत्तर केलें.

* * *

पावसाची बुरबुर आतां अजिबात थांबली होती. विनायकानें उत्तरेकडे तोंड केलें व आसनमांडी घातली. तो मनांतल्या मनांत प्रार्थना करूं लागला. "परमेश्वरा, तूं तर चराचरांत भरलेला आहेस. आजपर्यंत तुझी मी मातृभूमीच्या रूपामध्यें पूजा केली, राष्ट्रपुरुषामध्यें तुझें रूप पाहिलें, स्वदेशसेवारूपानें तुझी सेवा मी केली, आजच्या कठिण प्रसंगामध्यें माझें धैर्य कायम ठेव. मी निश्चयानें गंगामातेचें पात्र ओलांडून सुरक्षित जाईन. पण तुझी तशी इच्छा नसेल तर मात्र ही माझी अखेरची वंदना स्वीकृत कर."

दैवी विचारांच्या ओघामध्यें विनायक गाऊं लागला.

**हे अखंड राष्ट्रपुरुष अमित शक्तिधारी**
**कोटि कोटि कंठ करें वंदना तुम्हारी ॥ धृ ॥**

**हे विराट दिव्य देह, अद्वितीय एकमेव**
**सर्वगम्य तुम सदैव अशिव ध्वंसकारी ॥ १ ॥**

**शतसहस्रशीर्षवान लक्ष लक्ष दृढ सुजाण**
**हे असंख्य भुज महान कोटि चरण चारी ॥ २ ॥**

**एक देश, एक वेष, एक हृदय तव विशेष**
**हे सहस्र जिव्ह शेष, द्वेष क्लेश हारी ॥ ३ ॥**

विनायक मनांत म्हणाला, "हें वर्णन अजून खरें झालेलें नाहीं. भूतकाळांत हा राष्ट्रपुरुष असा होता, आज तो अद्वितीयही नाहीं, अखंडही नाहीं. उलट द्वेष व कलह यांनीं मत्सरग्रस्त आणि छिन्नविच्छिन्न झाला आहे. त्याला पुन्हां पुर्ववत् केलें पाहिजे.

हे प्रफुल्ल प्राणवंत, मरणभयविहीन संत
तूं प्रफुल्ल चिरवसंत तरुण वनविहारी ॥ ४ ॥

तुम पुराणपुरुष हिंदु, तव निकेत सप्तसिंधु
भरतखंड मार्नाबद्ध म्लेंछदमनकारी ॥५॥

मम अजेय विश्वभूप तव हिमाद्रि मुकुटरूप
रत्नहार कल अनूप गंगयमुनवारी ॥ ६ ॥

किती सुंदर वर्णन आहे! पण तेंही भूतकाळाचें! म्लेंछांचें दमन करणारा आज कोण आहे? खरोखरी गंगायमुनांच्या पवित्र जलाचा हा रत्नहाररूप प्रदेश, हा त्रिवेणी संगम, पण येथें सुद्धां दुर्दशेच्या भुंग्यांनीं सर्व पुरतें पोखरून टाकलेलें आहे. आज त्याच भूमीमध्यें चोरदरोडेखोरांचें आणि असुर राक्षसांचे पीक आलें आहे. हे राष्ट्रपुरुषा, जागा हो, आमच्या प्रयत्नाला यश दे, आमच्या संघटनेला यश दे. शक्तिशाली हो.

बीतचले युगयुगान्त किन्तु तुम प्रसुप्त क्लान्त
बन कराल हे कृतान्त कठिण नृत्यकारी ॥ ७ ॥

जाग महाभाग जाग सुन प्रचंड असुरराग
खोल नयन बरस आग बन भुजंगधारी ॥८ ॥

हे अखंड राष्ट्रपुरुष अमित शक्तिधारी
कोटि कोटि कंठ करे वंदना तुम्हारी ॥ धृ. ॥

गात असतांना विनायकाचे मानस पूर्णपणें शांत झालें. पटदीप रागाच्या स्वरांनीं त्याच्या मनांत आणि सभोंवतालीं निर्भय निश्चल शांतता प्रस्थापित झाली.

विनायक तें पद्य जसें जसें गाऊं लागला तसतशी रामप्रसादाच्या चेहऱ्यावरील क्रौर्याची छटा मावळूं लागली. तो विनायकाकडे जणूं डोळे फाडून पाहूं लागला. ही कोणी निराळीच व्यक्ति आपल्यासमोर उभी आहे असें वाटत असल्याचें त्याच्या चेहऱ्यावरून भासलें. पटदीपाची शांतता त्याच्याही डोळ्यांत प्रतीत होऊं लागली.

पद्य संपल्यावर विनायक उभा राहिला. त्यानें कासोटा मारला. कोटाचीं बटणें नीट बांधलीं. प्रणामाच्या स्थितीमध्यें उभें राहून अखेरची प्रार्थना तो म्हणूं लागला.

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिंदुभूमे सुखं वर्धितोऽहम्
महामंगले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ॥ १ ॥

प्रभो शक्तिमन् हिंदुराष्ट्रांगभूता
इमे सादरं त्वां नमामो वयम्
त्वदीयाय कार्याय बध्दा कटीयम्
शुभामाशिषं देहि तत्पूर्तये
अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिम्
सुशीलं जगद् येन नम्रं भवेत्
श्रुतं चैव यत्कण्टकाकीर्णमार्गम्
स्वयं स्वीकृतं नः सुगं कारयेत् ॥ २ ॥

परमेश्वरा, तुझें हें कार्य मी स्वीकृत केलें आहे. मातृभूमीची सेवा करण्याच्या व्रताचें आचरण करण्यास मी बध्दपरिकर झालेलों आहें. आतांच्या प्रसंगांतून पार पडूनही मी संघटनेचें कार्य यशस्वी रीतीनें करीन. तुझें वरदान असूं दे.

समुत्कर्षनिःश्रेयसस्यैकमुग्रम्
परं साधनं नाम वीरव्रतम्
तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा
हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम् ॥
विजेत्री च नः संहता कार्यशक्तिः
विधायास्य धर्मस्य संरक्षणम्
परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम्
समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ॥३ ॥

विनायकानें डोळे उघडले व त्यानें हांक मारली.

"रामप्रसाद, संपली प्रार्थना, तयारी आहे. उठाव बार."

रामप्रसाद दोन मिनिटें कांहीं बोललाच नाहीं!

विनायक नदीच्या पुरांत पडण्याचे तयारींत राहिला. रामप्रसादचे दोघे साथीदार त्याच्या संकेताकडे डोळे लावून होते.

"क्या तैयारी महाराज, क्षमा कीजिये, जो कुछ हमने अब तक कहा वह भूल जाअिये, हम सीधे किनारे तक जाअेंगे आप वहांसे लौट जा सकोगे"

रामप्रसादच्या आवाजामध्यें मऊपणा आलेला होता. त्याची ती मग्रुरी, क्रौर्य कोठें लोपलें होतें कोण जाणे! विनायकाला आश्चर्यानंदाचा एक धक्काच बसला. "काय? मघांची दरोडेखोरीची ती भाषा पोकळच होती?"

"हो महाराज, मस्करी केली आपल्याशीं. त्रास झाला आपल्याला. क्षमा असूं द्या. खरोखरी आपण फार धैर्यशील आहांत, महान् योगी आहांत."

रामप्रसादच्या बापाच्या चेहऱ्यावर नाना तर्‍हेचे भाव उफाळलेले दिसले. त्याच्या कपाळावर हजार आठ्या उमटल्या. तो रामप्रसादकडे संताप आणि गोंधळ अशा संमिश्र भावनांनीं पाहात राहिला.

रामप्रसादनें सुकाणूं वळविलें. नाव तत्काळ प्रवाहाला लागली, भराभर अंतर कापूं लागली. दूर असलेला किनारा जवळ आला.

"कोणी कांहीं बोललें नाहीं. त्या एकूण घटनेचा अर्थ विनायकाला समजला नाहीं. संकट संपलें या जाणिवेचा आनंद व त्याचबरोबर हा काय प्रकार घडला या बद्दलचा गोंधळ अशा संमिश्र भावना तो अनुभवीत होता.

थोडक्याच वेळांत नाव किनाऱ्याला लागली. विनायक जेथें नावेंत बसला, त्या ठिकाणापासून ही जागा बरीच वर होती. कोणीच चिटपाखरूं तेथें नव्हतें. रामप्रसाद अदबीनें म्हणाला,

"उतर जाअिजे महाराज !"

विनायक खालीं उतरला. जमिनीला पाय लागल्यावर त्यानें विचारलें, "काय पैसे द्यावयाचें ?"

"कुछ नही महाराज, आप तो हमारे सगे हैं। कुछ देनेकी जरूरत नहीं। हम लोगोंनें मस्करी की। इस बातकी कृपापूर्वक क्षमा करना, और कुछ नहीं।"

रामप्रसादनें सुकाणू हलवलें, होडी पुनः प्रवाहांत गेली. विनामकाला स्वतःचा विश्वास वाटेना. पाण्याच्या धारेबरोबर धावत जाणाऱ्या होडीकडे तो पहात राहिला.

★ ★ ★

होडी पाण्यांत दूर गेली. रामप्रसादचा बाप संतापून म्हणाला, 'मूर्खा, आज कोणती अवदसा तुला आठवली होती? हातांत आलेलें सावज घालवलेंस. ज्यानें आपणां सगळ्यांना नागडें उघडें करून गुरासारखें लोळायला लावलें त्याच्या कुळीबद्दल केलेली प्रतिज्ञा विसरलास काय?"

रामप्रसादनें शांत स्वरानें उत्तर दिलें,

"दादा प्रतिज्ञा विसरलेलों नाहीं, पण मघांचा इसम आपला सगा होता."

"सगा होता, मग ही अक्कल आधीं कां सुचली नांहीं?"

"मला तें आधीं माहीत नव्हतें."

"केव्हां माहीत झालें?"

"तो गाणें म्हणूं लागला त्यावेळीं"

"अजबच प्रकार आहे एकूण"

"रागावूं नका दादा. तुम्हांला मागची एक हकीकत मी सांगितलेली नाहीं. बिहारमध्यें आपल्या गांवांतून आपण हांकललें जाण्यापूर्वीं मी एकदिवस बाजारासाठीं पाटण्यास गेलों होतों. तुम्हाला आठवत असेल, रात्रीं परत येण्याऐवजीं मी दुसऱ्या दिवशीं सकाळीं घरीं परतलों. त्या दिवशीं सायंकाळची गोष्ट. मी शहरांतून हिंडत असतां रामाच्या मंदिरापासच्या मैदानावर एक मोठी सभा पाहिली. कुतूहलानें मी तिथें जाऊन उभा राहिलों. मैदानावर हजारो लोक होते. मध्येंच कांहीं हजार लोकांचे लाठी, कवायत, बॅण्ड असे खेळ चालले होते. खेळ करणाऱ्या लोकांत लहान मुलेंही मी पाहिलीं. मोठीं माणसेंही दिसलीं. खेडचांपाडचांतले लोकही त्यांत ओळखून आले. शहरी लोक तर त्यांत होतेच. एकाबाजूला लोखंडी नळावर मोठें व उंच असें देवळांतल्या देवाचें निशाण फडकत होतें. त्या लोकांची शिस्त, वागणूक, अदब

फारच चांगली होती. त्यांतील एकानें मला नेऊन आग्रह करून पुढें बसविलें. मी नाहीं नाहीं म्हणत होतों. पण तो म्हणाला, "तुम्ही आमचेच आहांत." लाठीकाठीचे कार्यक्रम संपल्यावर निशाणापाशीं एक उंच फलाट उभा होता तेथून एका मुलानें गाणें सांगितलें, मघाशीं तो म्हणत होता तेंच तें गाणें. तें सर्वांनीं म्हटलें मी सुद्धां म्हटलें. माझ्या मनांत तें गाणें अगदीं ठसून गेलें.

गाणें संपल्यावर एक साधु भाषण करावयास उठला. त्याच्या अंगांत पिवळट रंगाचें एक लांब कुडतें होतें, दाढी वाढलेली होती, डोकीचे केसही वाढलेले होते, डोळ्यावर चष्मा होता, कपाळावर तिलक लावलेला होता. ती उंच व सडपातळ मूर्ति बोलूं लागली तेव्हां माझें मन तिकडे आपोआप ओढलें गेलें. त्या मूर्तीसभोंवार एक तेज पसरल्यासारखें भासत होतें, मला असें वाटलें कीं, त्यांत जाऊन मिसळून जावें. त्या साधुपुरुषाचे शब्द साधे सोपे. त्यानें प्रभु रामचंद्राच्या गोष्टी सांगितल्या. मराठ्यांच्या शिवाजीबद्दलही तो बोलला. त्यानें सांगितलें, सर्व हिंदू एक आहेत. रामचंद्राच्या काळांत कोणी कोणाचा द्वेष करीत नव्हतें, कोणी कोणाला फसवीत नव्हतें. पण स्वार्थाचा कलि आमच्या अंगांत शिरल्यानें आम्ही हिन्दु परस्परांशीं भाडूं लागलों, परस्परांना फसवूं लागलों. त्यामुळें परकीय राज्य आलें. आतां तर आम्ही माणुसकीलाही महाग झालों आहोंत. आपल्यावर पडलेली भूल नाहींशी व्हावी, आपण कोण हें आपल्याला समजावें, सर्वांबद्दल आपल्या मनांत प्रेम उत्पन्न व्हावें म्हणून हा संघ सुरू केला आहे.

" तो साधु आणखीही पुष्कळ बोलला. मला तें तितकेंसें आठवत नाहीं. पण तो शेवटीं म्हणाला, "सर्वांनीं संघाचे स्वयंसेवक झालें पाहिजे." मला तें पटलें. मला वाटलें कीं सर्व एक झाले, सद्बुद्धीनें वागूं लागले, तर कोठेंच कोणावर अन्याय होणार नाहीं, व सर्वांचें भलें होईल. व त्याक्षणीं मी स्वतःला संघाचा असें समजलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं घरीं आलों. पुढें जमीनदाराशीं आपल्या कटकटी सुरू झाल्या. थोडक्याच दिवसांत गांव सोडावें लागलें. झालेल्या अन्यायाचा सूड उगविण्याची आपण प्रतिज्ञा केली. त्यांत मी तें

संघाचें विसरून गेलों, आज त्याला ४–४।। वर्षे झालीं. पण तो त्याच दिवशीचें तेंच गाणें म्हणूं लागल्याबरोबर सर्व आठवण अगदीं ताजी झाली. तो संघाचा होता. मीही मनानें संघाचा आहे. मला तो भावासारखा वाटूं लागला. माझें मन पालटलें. भावाला नदींत बुडविण्याचें काम माझ्यानें होणें शक्य नव्हतें . . . ."

रामप्रसाद थांबला. भूतकाळांतील तो दिवस, ते जमलेले लोक, तुम्ही आमचेच आहांत म्हणणारा तो तरुण, गाणें गाणारा युवक व तो तेजःपुंज साधुपुरुष त्याच्या डोळ्यासमोर जणुं स्पष्ट दिसूं लागले.

रामप्रसादच्या बापाला रामप्रसाद काय बोलला हें कांहींच कळलें नाहीं. तो समजावणीच्या स्वरांत म्हणाला,

"बेटा आज एकाला जाऊं दिलेस हरकत नाहीं पण उद्यां तसेंच करशील, सगळेच सगे आहेत म्हणूं लागशील. तसें करूं नकोस म्हणजे झालें."

बापाचें बोलणें ऐकतांच रामप्रसादच्या डोक्यांत एकदम वीज चमकून प्रकाश पडावा असें कांहीं झालें. मनांतला अडथळा एकाएकीं नाहींसा होऊन त्याचा विचारप्रवाह सुरळीत चालू लागला.

थोड्या वेळानें एकेक शब्द उच्चारत रामप्रसाद म्हणाला.

"खरें आहे, सर्व हिंदू भाऊ आहेत असें त्या साधूनें सांगितलें होतें तें खरें आहे. तुम्ही म्हटल्यावर मला तें या क्षणीं पटलें. सगळेच सगे आहेत असें मी आतां म्हणतों. आतां मी कोणाला बुडविणार नाहीं माझ्या हातून असा उद्योग पुढें व्हावयाचा नाहीं. . ."

एवढें बोलून रामप्रसाद स्वस्थ बसला. सुकाणूचा दांडा त्याच्या हातांत होता. प्रवाहाबरोबर नाव पुढें पुढें चालली होती. त्याची दृष्टि मात्र कोठेंतरी दूर लागलेली होती.

पाऊस थांबला होता. मध्येंच आकाशांतील ढग कोठेंसे किंचित् विलग झाले. त्यांतून सूर्यकिरणांची एक तिरीप निसटून बाहेर आली. तिचा झोत नावेवर पडला व क्षणार्धांत नाव उजळली.

*प्राच्यां उदेत्य पूर्वं यः प्रतीच्यां प्रत्यभासत।*
*प्राच्यां चास्तं गतः, तस्मै विवेकरवये नमः॥*

# हिंदु धर्माचे दिग्विजयी आचार्य

# विवेकानंद

रात्रीं १० वाजतांची वेळ. एक प्रवासी अमेरिकेंतल्या शिकॅगो स्टेशनवर उतरला. स्टेशनवर अतोनात गर्दी होती. अनेक फलाट, अनेक दादर, घाईघाईंत इकडून तिकडे जाणारे प्रवासी, हमालांची गडबड, इंजिनांच्या शिट्ट्यांचे आवाज, यांमुळें तो प्रवासी बावचळलेला दिसत होता. वय कांहीं फारसें नव्हतें, तिशीच्या जवळपास असावें. अंगावर बेतशीर कपडे, मुद्रा हिंदुस्थानांतल्या दृष्टीनें उजळ पण अमेरिकेंतल्या दृष्टीनें काळी, टपोरे तेजस्वी डोळे, साधारणपणें बरीशी अंगलट अशी त्याची मूर्ति होती. एक वैशिष्टच असें दिसलें कीं, प्रवाशाच्या डोक्यावर भगव्या रंगाचें वस्त्र गुंडाळलेलें होतें आणि त्यामुळें हा तरुण पौर्वात्य देशांतला असावा असा सहजच तर्क करतां येण्यासारखा होता.

गाडी स्टेशनवर येतांच सर्व प्रवाशांची उतरण्याची एकच धांदल झाली. झरझर सर्व उतारू फलाटावर उतरले. हा प्रवासीही एक बॅग घेऊन उतरला. इकडे तिकडे पहात 'मि. आयव्हर, मि. डेव्हिड आयव्हर' अशा दोन हांका त्यानें मोठ्यानें घातल्या. पण कोणाचीच ओ आली नाहीं.

'मोठीच पंचाईत आली ! हा आयव्हर परिषदेची जागा मला दाखवतो म्हणाला, पण घाईमध्यें विसरून तसाच गेलेला दिसतो. आतां काय करावें? परिषदेच्या ठिकाणीं आतां कसें जावें ?' असें पुटपुटत तो तरुण प्रवासी फलाटावरून चालूं लागला. पण त्याला समजेना कीं जावें कोणत्या बाजूला.

दोन्ही बाजूंना उंच उंच इमारती होत्या. स्टेशनच्या दोन्ही बाजूंना दाट वस्ती दिसत होती. प्रवाशाला अडचण पडली कीं जावें तरी कोणत्या दिशेला ? उजव्या बाजूला जावें कीं डाव्या बाजूला ? तो कांहीं काळ जागच्या जागींच थांबला. कोणाला तरी विचारावें असें त्याच्या मनांत आलें.

त्याला वाटलें कदाचित कोणी मनुष्य आपल्याकडे पाहील, आपल्याला विचारील, पण तेथल्या गर्दींत तसें करावयास वेळ कोणालाच नव्हता. जो तो अतिशय घाईघाईंत चालला होता. प्रत्येकजण जणुं महत्त्वाच्या कामांत गुंतलेला होता.

'आतां काय करावें ? जावें डाव्या हातानें. दादर चढून बाहेर पडावें. तेथें कोणाला तरी विचारतां येईल.' असें मनाशीं ठरवून प्रवासी चालूं लागला. स्टेशनबाहेर पडला तों रात्रीं १०॥ चा सुमार झाला होता. स्टेशनबाहेर अनेक गाड्या उभ्या होत्या. प्रवासी बाहेर पडतांच गाडीवानांनीं त्याला घेरलें.

"कोठें जावयाचें ?"

"कुठें बरें– ऽ ऽ धर्मपरिषदेंत जावयाचें."

"धर्मपरिषदेंत ? कोणत्या भागांत आहे ?"

"कोणत्या भागांत आहे तें तर आठवत नाहीं."

"आठवत नाहीं ? ए हे रे वेडपट ! कोणत्या देशाचा हा मूर्ख !" गाडीवाल्यांनीं प्रवाशाचें पाणी जोखलें. एकमेकांकडे डोळे मिचकावीत सर्वजण फिदीफिदी हंसले !

गाडींतून जाण्याचा मार्ग बंद झाल्यावर प्रवासी इकडेतिकडे पाहूं लागला. स्टेशनच्या आवारांतून आठ निरनिराळे रस्ते फुटलेले होते. यांतला एक रस्ता त्यानें धरला व धीरे धीरे चालणें सुरू केलें. वेळ रात्रीची होती त्यामुळें पायी चालणाऱ्यांची रहदारी कमी झाली होती. क्वचित एखादी मोटार इकडून तिकडे धांवत होती. प्रवाशानें अधून मधून भेटणाऱ्या पादचाऱ्यांना इंग्रजींतून विचारलें, "महाराज, सर्वधर्मपरिषद कोणत्या भागांत भरणार आहे तें आपण सांगूं शकाल काय ?" प्रवाशाचा प्रश्न पादचाऱ्याला समजला असावा असें दिसलें नाहीं. ते दुसऱ्याच कोणत्यातरी भाषेंत कांहीं उत्तर देऊन निघून गेले. अर्धा तास अशा रीतीनें घुटमळल्यावर प्रवाशाचा नाइलाज झाला. आणिक कोठें गेलों तर रस्ता अजिबात चुकेल असें वाटून तो माघारी फिरला व पुन्हां स्टेशनच्या आवारांत आला. परत येईपर्यंत ११। वाजले होते.

स्टेशनमध्यें प्रवासी आला, पण पुढें काय हा प्रश्न समोर होताच. डोळ्यावर झोंप येऊं लागली होती, तथापि झोंपावें कोठें हें समजत नव्हतें. प्रवाशानें सर्व स्टेशन पालथें घातलें. अखेर पार्सल ऑफिसचे पलीकडे अनेक पार्सलें पडलीं होतीं. तेथेंच एक मोठें रिकामें खोकें पडलेलें होतें. ही जागा झोंपावयास बरी, आपण झोंपलेले आहोंत हें कोणास समजावयाचें नाहीं, व मध्येंच कोणी उठवणार नाहीं असा विचार करून प्रवाशानें खोक्यांत पाऊल टाकलें व हातांतली बॅग उशाला घेऊन अंगावरल्या कपड्यांसह तसेंच उघड्यावर अंग झोंकून दिलें. त्याला थोड्याच वेळांत गाढ झोंप लागली.

★ ★ ★

प्रवासी सकाळीं जागा झाला तेव्हां कोंवळीं कोंवळीं उन्हें पसरलीं होतीं. प्रवासी उठला. थंडीमुळें अंग ताठरलें होतें. गार वारे डोळ्यांना झोंबून पाणी काढीत होते. रात्रीपेक्षां सकाळीं

चांगले लोक भेटतील, ते आपल्याला मदत करतील अशा आशेनें प्रवाशानें डोक्याला वस्त्र बांधलें, आपली बॅग उचलली. 'अरे पण प्रातर्विधि कोठें करावेत? जवळच कोणाच्या तरी घरीं जावें. नाहीं तरी आपण संन्यासी कोणाच्याही घरीं जाण्यास आपणांस मानापमान कांहींच नाहीं' असा विचार करीत प्रवासी रस्त्यावर येऊन चालू लागला.

रस्ता भव्य होता. दोन्ही बाजूला उंच उंच हवेल्या उभ्या होत्या. रस्त्यानें येणाऱ्या-जाणाऱ्यांची गर्दी विशेष नव्हती. उत्तम उत्तम तजेल घोडयांच्या बग्या दारादाराशीं उभ्या होत्या. प्रवाशानें एका घराशीं उभे राहून घंटा वाजविली. थोडक्याच वेळांत दार उघडलें गेलें. एक बाई बाहेर आली. प्रवाशाचे ते चुरगळलेले कपडे, मळलेलें तोंड, न धुतलेले डोळे असा अवतार पाहून 'you begger! अरे भिकारडया!' असे उद्‌गार तिच्या तोंडून बाहेर पडले. तिनें लगेच दार लावून घेतलें. प्रवाशाचा चेहरा पडला. तो रस्त्यावरून तसाच पुढें चालू लागला. कांहीं वेळानें दुसऱ्या एका घराशीं तो थांबला. घंटा वाजविली. आंतून एक निग्रो नोकर बाहेर आला. 'you Niggar!' अशी शिवी देऊन त्यानें दार लावून घेतलें. तिसऱ्या ठिकाणीं दार न उघडतां वरून खिडकींतून प्रवाशाला हाकलण्यांत आलें. एके ठिकाणीं घरचा मालक, 'you dog अरे कुत्र्या, अरे बदमाश, अरे चोरा' अशा शिव्या देत मारायला उठला.

सकाळीं प्रवासी बाहेर पडला. अनेक ठिकाणचे अपमान सोशीत, सहन करीत, तसाच तोंडसुद्धां न धुतलेल्या स्थितींत तो चालत होता. हळू हळू उन्हें कडक होत गेलीं. दुपारचे १० वाजले, प्रवाशाला कोठेंही थारा मिळाला नाहीं. दुपारचा १२ चा सुमार झाला. प्रवासी अगदीं थकला. रात्रीं पोटांत कांहीं नव्हतें. सकाळ-पासूनही पोटांत कांहीं गेलेलें नव्हतें. अशा स्थितींत ती बॅग हातांत घेऊन शिकागोमधील लेक शोअर ड्राइव्ह या अतिप्रसिद्ध श्रीमंतीनें भरभराटलेल्या भागांतून तो फिरत होता. कोठल्या एका प्रकारचा अपमान होण्याचें राहिलें होतें असें नाहीं.

दुपारीं १२ वाजतां प्रवासी अगदींच थकला. त्याच्याच्यानें पाऊल पुढें टाकवेना. डोळ्यासमोर अंधेरी येऊं लागली. त्याला असें वाटलें कीं बसावें कोठेंतरी ! पण बसायचें कोठें ? अर्धेमर्धें बसलें तर कोणी येईल व लाथ मारील. इतक्यांत प्रवाशाला जवळच एक झाड दिसलें. प्रवाशी झाडापाशीं गेला, तेथें बसला. त्यानें डोकें झाडाला टेकलें, डोळे मिटले. तो मनांत म्हणाला, "प्रभो तुला नमस्कार असो ! कर्ता करविता तूंच आहेस !"

★ ★ ★

प्रवाशाच्या मनांत परमेश्वराचें चिंतन चालू आहे तोंच त्याच्या समोर असलेल्या चार मजली उंच इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरची एक खिडकी उघडली. एका १० वर्षांच्या लहान मुलीनें बाहेर डोकावून पाहिलें तों तिला एक चमत्कारिक दृश्य दिसलें. ती ओरडली 'ममी ममी, अग तें बघ काय आहे.' ममी खिडकीशीं आली. एक भगवें कापड डोक्यास गुंडाळलेला कोणी मनुष्य रस्त्याच्या कडेला खुशाल एका झाडाला टेकून खालीं धुळींत बसला होता.

"ए, हे, कोणरे ? कोण तूं ?" ममीनें विचारलें. मन पोळलेल्या प्रवाशाला तो आवाज ऐकूंही गेला नाहीं.

ममीच्या मनांत एक कल्पना स्फुरली. ती झरझर जिना उतरून खालीं गेली. दरवाजा उघडून प्रवाशापाशीं आली व त्याला हलवून मंजूळ आवाजांत म्हणाली—

"Oh Sir ! Are you one of the Eastern delegates for the Parliament of Religions ? (अहोऽ अहो, सर्वधर्मपरिषदेला आलेल्या पौर्वात्य प्रतिनिधींपैकीं आपण एक आहांत होय ना ? )

प्रवाशानें डोळे किलकिले केले. पहातो तों एक सुंदर युवती विनयपूर्वक आपणांस हालवून कांहीं प्रश्न विचारीत आहे. प्रवाशाला वाटलें कोण ही ? कोणी देवता तर नाहीं ?

त्यानें उत्तर केलें, "I thank you Madam for your courtesy. You are right. I am a delegate for the Parliament of Religions." ( बाई मी आभारी आहें. धर्मपरिषदेला आलेल्या प्रतिनिधींपैकीं मी एक आहें खरा ! )

"पण तुम्ही अडचणींत दिसतां. रस्ता चुकलेले दिसतां, कृपया उठा व आमच्या घरांत चला, थोडी विश्रांति घ्या, चला, उठणार ना ? "

इतक्या नानाविध अपमानानंतर प्रवाशाला घडत असलेला प्रकार परमेश्वरी कृपाप्रसादाप्रमाणें वाटला. तो मंत्रमुग्धसा उठला, बाईच्या पाठोपाठ चालूं लागला.

घराच्या दरवाज्यावर. —

Mr. and Mrs. George W. Hale अशी पाटी होती.

घरांत गेल्यावर ममीनें विचारलें, " तरुण मित्रा तूं सकाळचाच कोठून आलास ? "

" मी रेल्वे स्टेशनवरून आलों. "

" स्टेशनवर कोठून आलास ?"

" बोस्टनहून. "

" तेथील गाडी तर रात्रीं येते. "

" हो, मी रात्रींच आलों ! "

" अरे देवा, रात्रींपासून तुला अशी भटकन्ती करावी लागली! '

" होय. "

" पण प्रतिनिधींच्या उतरण्याची सोय परिषदेनें केली आहे. तेथें कां नाहीं गेलास ?"

" सोय केली आहे आणि मी तेथें गेलोंही असतों पण गंमत अशी झाली कीं, माझ्याजवळचा परिषदेच्या कार्यालयाचा पत्ता हरवला. "

" पत्ता हरवला ? काय वेंधळेपणा ! पत्ता कसा हरवला ? "

" आगगाडीमध्यें मी पैशाचें पाकीट कांहीं कामासाठीं काढलें होतें, मधेंच एक मनुष्य आला, तो म्हणाला, 'पाकिट फार चांगलें आहे मला देतां का ?' मीं त्याला पाकीट देऊन टाकलें, पाकिटा-

बरोबर पैसे व पत्ता दोन्ही गोष्टी गेल्या."

"वा! शाबास! औरच आहे तुझें औदार्य. तूं त्याला पाकिट मिळणार नाहीं म्हणून कां सांगितलें नाहींस?"

"बाई, मी संन्यासी आहें. कोण्याही याचकानें कोणतीही गोष्ट संन्याश्याजवळ मागितली तर त्यानें किंचितही विचार न करतां ती द्यावी असा आमच्या धर्माचा दंडक आहे."

"हा तुमचा धर्म कोणता?"

"आमचा धर्म हिंदुधर्म."

"चांगला धर्म आहे तुमचा. दुसऱ्यानें पाकिट मागितलें पाकिट दिलें, पाकिटाबरोबर पत्ता गेला, पैसेही गेले. आतां तूं करशील तरी काय? पत्ता एकवेळ मिळेल पण पैसे कोठून आणशील? कां भीक मागशील?"

"ज्या भगवानानें पैसे नेले तोच भिकेची काळजी करील."

"बरा आहे तुझा भगवान! उद्यां त्यानें अंगावरचे कपडे मागितले तर काय कपडे काढून देशील?"

"त्यांत बाई कठीण काय आहे?"

"मग रस्त्यानें काय नग्नावस्थेंत हिंडशील?"

"हिंदुस्थानांत हजारो संन्यासी केवळ कोपीन नेसून हिंडतात, कित्येक तर अक्षरशः नग्न असतात. मनुष्य जन्माला येतो तो कांहीं कपडे घालून येत नाहीं. अंगावर कपडे घातल्यानें मनुष्य ईश्वराला प्रिय होतो असेंही माझ्या ऐकिवांत नाहीं, पण बाईसाहेब हातापायांतून खिळे ठोकून ख्रिस्ताला ठार मारण्यांत आलें तो ईश्वराचे घरीं गेला, त्यावेळीं त्याच्या अंगावर काय वस्त्रें होतीं?"

ममी निरुत्तर झाली. आपल्या समोरचा तरुण मनुष्य सामान्य नाहीं हें तिला समजलें. ती झरकन उठली. घाईघाईनें तिनें साबण, पंचा इत्यादि गोष्टी या तरुण प्रवाशाला आणून दिल्या. "तुझें हातपाय धुणें होऊं दे. मग सावकाश बोलतां येईल. पण कदाचित् तुला स्नान करावयाचें असेल. हें इथें पाणी आहे, हें स्नानगृह आहे, कांहींही संकोच नको, तूं आमच्या घरचा पाहुणा आहेस. समजलें ना मी थांबतें बाहेर."

प्रवाशाचें मन परमेश्वराकडे धांवलें तो म्हणाला, "हे परमात्मन् तुझी लीला अगाध आहे, तुझी लीला अगाध आहे."

प्रवासी स्नान आटोपून बाहेर आला. त्याचा शीण नाहींसा झालेला होता. मुद्रेवर तजेला आला होता.

"बैस इथें. ही उत्तमपैकी रम् ठेवलेली आहे ती घे म्हणजे आणखी तजेला येईल. तोंपर्यंत जेवण येईल."

"संन्याशाला रम् निषिद्ध आहे, बाई!"

"रम् घ्यावयाची नाहीं? बरं आमच्या घरीं उत्तम बिअर आहे ती तर चालेल ना?"

"बाई, मी आपल्या सौजन्याबद्दल खरेंच आभारी आहें; पण, संन्याशाला साधें पाणी पुरें."

इतक्यांत भोजनाचें ताट आलें. ममीनें नीट चौकशी करून काय हवें न हवें विचारून आग्रहपूर्वक या तरुण संन्याशाला जेवावयास बसविलें.

जेवण चालू असतांना ममीनें विचारलें.

"तरुण मित्रा, तूं स्टेशनवर आलास, मग तेथून परिषदेच्या कार्यालयाला दूरध्वनि कां नाहीं केलास?"

"खरें सांगावयाचें म्हणजे दूरध्वनि कसा करतात हें मला माहीत नाहीं. दूरध्वनीची सूचि कशी पाहतात याची सुद्धां मला कल्पना नाहीं. आमच्या हिंदुस्थानांत या गोष्टी अजून आलेल्या नाहींत. पण मी स्टेशनवर अनेकांना परिषदेचा पत्ता व रस्ता विचारला. एकानेंही धड उत्तर दिलें नाहीं. हिंदुस्थान भौतिक सुधारणांत मागासलेला आहे, पण तेथें सज्जनपणा विरळा आहे असें कोणासही बहुधा आढळणार नाहीं."

"आमच्या लोकांची चूक झालीही असेल, मी नाहीं म्हणत नाहीं. तथापि स्टेशनपासचा सर्वच्या सर्व भाग जर्मन वस्तीचा आहे, त्यांना तूं इंग्लिश भाषेंत विचारलेला प्रश्न बहुधा कळला नसावा! पण अशानें अमेरिकेंत तुझ्यासारख्याचें कोठेंच निभणार नाहीं. पैशाचें पाकीट तूं लोकांना देणार, पत्ता हरवणार, ओळख नाहीं, पाळख

नाहीं आणि या विचित्र पोषाखांत हिंडणार. तरुण मित्रा, तुझा हिंदुस्थान देश कदाचित साधुसंतांचा असेल,पण ही अमेरिका आहे."

"ही अमेरिका असो अथवा अन्य पाताळ लोक असो. माझा परमेश्वरावर जोंपर्यंत विश्वास आहे तोंपर्यंत मला सर्वच सारखें आहे."

* * *

ममीनें मध्यंतरीं सर्वधर्मपरिषदेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. बॅरोज यांना दूरध्वनीवरून आपण तेथें येत असल्याचें कळविलें. दुपारच्या विश्रांतीनंतर या तरुण संन्याशाला घेऊन ममी परिषदेच्या जागीं गेली. निवासस्थानची जागा उत्तम रीतीनें शृंगारलेली होती. दाराबाहेर नव्या कोऱ्या मोटारी व उंची बग्या उभ्या होत्या. उत्तमोत्तम पोषाख केलेले, गंभीर चेहऱ्याचे ख्रिश्चन धर्माधिकारी आंत बाहेर जात येत होते.

तरुण संन्याशाला बरोबर घेऊन ममी आंत गेली. आंतल्या चौकांत मोठा मांडव घातलेला होता. शोभिवंत दिवे टांगलेले होते. मोठमोठीं उंचीं खुर्च्याटेबलें ठेवलेलीं होतीं. कांहीं लोक बसले होते, कांहीं गटागटानें उभे राहून गप्पा मारीत होते.

चौकांत पाऊल टाकल्याबरोबर ममी म्हणाली, "तें बघ! त्या लोकांच्या मध्यें तांबड्या मखमलीचा तो सुंदर झगा घातलेला धर्ममंत्री पाहिलास? तो युरोपच्या कॅथोलिकांचा सर्वमान्य पुढारी, इटलीमधील कार्डिनल मॅसारिक आणि या बाजूला त्या बाई पाहिल्यास त्या बाई म्हणजे थिऑसफीच्या प्रसिद्ध विदुषी ॲनी बिझांट."

कार्डिनल मॅसारिक आणि ॲनी बिझांट यांच्या भोंवतीं नखशिखान्त पाश्चात्य पोषाख केलेली १०–१५ मंडळी उभी होती. दोघेही आपापल्या भक्तगणांबरोबर गप्पा करण्यांत गुंग होऊन गेले होते.

तरुण संन्याशानें दोन्ही गटांकडे पाहिलें. मॅसारिकभोंवतीं असलेल्या लोकांत त्याला एक चेहरा ओळखीचा वाटला. त्यानें चटकन दोन तीन पावलें बाजूला टाकून हांक मारली.'

" मुजुमदार! मुजुमदार! "

परिचित वाटणाऱ्या चेहऱ्यानें मान वळवली. डोक्यास भगवें वस्त्र गुंडाळलेल्या त्या मूर्तीकडे त्यानें क्षणभर पाहिलें व निर्विकार मुद्रेनें तोंड पूर्ववत् फिरवून मॅसारिकच्या गप्पागोष्टींत लक्ष घातलें.

तरुण संन्याशाला त्या घटनेनें धक्का बसला. 'ओळखही देत नाहीं बेटा, अं!' तो माघारी आला व ममीला म्हणाला, "चला आपण पुढें जाऊं या." दोघेही पुढें सरकलीं. ॲनी बिझांटबाईच्या अंगावरून पुढें जात असतां दुसरा एक चेहरा या तरुण संन्याशाला परिचित वाटला. तो तेथें क्षणभर थांबला. दोघा चेहऱ्यांची दृष्टादृष्ट झाली. पण दुसऱ्या व्यक्तीचे चेहऱ्यावर कोणतीच रेषा उमटली नाहीं. संन्याशी मनांत पुटपुटला, "चक्रवर्ती, तूं ओळखत नाहींस काय मला! शाबास आहे तुझी!"

तीं दोघें पुढें निघणार तोंच ॲनी बिझांटचें लक्ष तरुण संन्याशाकडे गेलें. ती म्हणाली,

"Oh, there goes a young man coming from India; What does he want here?"

(हिंदुस्थानांतून हा तरुण आलेला दिसतो. काय ठेवलें आहे त्याचें इथें?) एवढें बोलून बाईनें पूर्वीचें संभाषण चालू केलें.

डॉ. बॅरोज चौकाच्या पलीकडच्या बाजूस उभे होते. ममी या या तरुण संन्याशाला घेऊन तेथें गेली व तिनें डॉ. बॅरोजना त्याची ओळख करून दिली. डॉ. बॅरोजना ओळख पटली. ते म्हणाले, "अरे हो, प्रा. राइट यांनीं तुमच्याबद्दल लिहिलें होतें खरें. त्यांनीं म्हटलें होतें कीं, अमेरिकेंतले सर्व शहाणे एकत्र केले तरी या तरुण संन्याशाची विद्वत्ता व अनुभव त्या सर्वांच्यापेक्षां कांकणभर जास्तच ठरेल. तुम्ही आलांत आनंद झाला. आतां तुम्ही असें करा, इतर पौर्वात्य प्रतिनिधि येथें आलेले आहेत. तुमच्या हिंदुस्थानांतले मुजुमदार, चक्रवर्ती, गांधी, नगरकर असे चौघेजण आहेत. तुमची त्यांची ओळख आहे? नसेल कदाचित्. थांबा मी देतों त्यांची ओळख करून. त्यांचे बरोबर तुम्ही रहा.

" अहो, मुजुमदार, चक्रवर्ती, नगरकर, गांधी, जरा एक क्षणभर इकडे येऊं शकाल का ? " डॉ. बॅरोज यांनीं हांक मारली.

डॉ. बॅरोजच्या हांकेसरशीं चौघेजण थोडे धांवतच आले.

" हे श्री. मुजुंमदार कलकत्त्याचे, आणि हे श्री. चक्रवर्ती कलकत्त्याचेच, हे दोघे ब्राह्मो समाजाचे प्रतिनिधि म्हणून आले आहेत. हे श्री. गांधी हे जैनमताचें प्रतिनिधित्व करणार आहेत. आणि हे श्री. नगरकर मुंबईचे,–हो आपण कोणाचें बरें प्रतिनिधित्व करणार आहांत ?

" प्रार्थना समाजाचे " नगरकरांनीं उत्तर दिलें.

" बरोबर. मी विसरल्याबद्दल क्षमा असू दे. पण तुमच्या हिंदुस्थानांतले पंथोपपंथ लक्षांत ठेवणें भारी कठीण आहे. "

" ख्रिश्चन धर्मांतील शेंकडोशें पंथ ध्यानांत ठेवावयास इतरांना जितकें कठीण पडतें तितकेंच ना ?" तरुण संन्याशानें खोंचक स्वरांत विचारलें.

त्या खोचक प्रश्नावर डॉ. बॅरोज मोकळ्या मनानें खदखदून हंसले.

Right Ho ! ! You have hit the mark, revered Sir

( अगदीं बरोबर ! तुम्ही वर्म ओळखलेंत. ) —बरें पण आपण स्वत: कोणत्या पंथाचें प्रतिनिधित्व करणार ? "

तरुण संन्याशानें स्पष्ट पण विनयपूर्वक उत्तर दिलें,

"मी कोणत्याच 'पंथाचा' प्रतिनिधि नाहीं. मी सर्वसमावेशक अशा हिंदुधर्मासंबंधीं विचार मांडणार म्हणतों."

"फारच उत्तम, नाहींतर एवढ्या मोठ्या हिंदुधर्माच्या अफाट हिंदुस्थानांतून हिंदु धर्माचा प्रतिनिधि कोणीच नाहीं आणि पंथोपपंथांचे प्रतिनिधि मात्र चार असा देखावा दिसला असता." डॉ. बॅरोज यांनीं मध्येंच जीभ चावली. "Oh please excuse my remark if stingy. It was a slip of the tongue. (माझा शेरा बोंचक असल्यास क्षमा करा. माझ्या तोंडीं न कळत ते शब्द येऊन गेले)."

"विशेष नाहीं. विशेष नाहीं." असें मुजुमदार, चक्रवर्ती इत्यादि पुटपुटले. तरुण संन्याशाचा चेहरा गंभीर झाला.

"तर मग हे आपले तरुण संन्याशी मित्र आतां सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत."

डॉ. बॅरोजच्या परिचयानंतर परस्परांनीं हस्तांदोलन केलें. मुजुमदार, चक्रवर्ती पुरते थिजले. पण वरपांगी "आपणांस पाहून फार आनंद वाटला" इत्यादि औपचारिक शब्दसंपत्ति त्यांनीं भरपूर उधळली.

ममी घरीं एकटीच गेली. तिच्या घरीं आलेला पाहुणा सुखरूपपणें पोंचता झाला होता. आतां तो इतर पौर्वात्य प्रतिनिधींच्या मेळाव्यांत होता.

ममी तिच्या घरीं गेली पण इकडे तरुण संन्याशास मात्र येथें संकोचल्यासारखें वाटूं लागलें. भारी पोषाख केलेल्या मोठमोठ्या धर्मोपदेशकांच्या घोळक्यांत व पाश्चात्य पोषाखांत मिरवणाऱ्या, अंतर्बाह्य परकीय झालेल्या स्वबांधवांच्या सहवासांत त्याला गुदमरल्यासारखें वाटूं लागलें.

कांहीं वेळानें संध्याकाळ झाली व रात्रही झाली. मुजुमदार, चक्रवर्ती इत्यादींना या भिकारड्या संन्याशाशीं बोलण्यास सवड नव्हती. ते टेबलापाशीं बसून दुसऱ्या दिवशीं करावयाच्या भाषणाची तयारी करीत, लिहिलेलें भाषण पाठ म्हणण्यांत गुंग होऊन गेले. तरुण संन्याशाचें मन मात्र कांहीं निराळ्याच भावनेनें भारून गेलें होतें.त्याला जुन्या काळच्या आठवणी येत होत्या, सद्गुरूंचें स्मरण होत होतें. मातृभूमीची स्थिति त्याचे डोळ्यासमोर उभी रहात होती. अशा विचारांत कांहीं वेळानें त्याच्या चित्ताचा परमेश्वराकडे लय लागला. त्यानें ती रात्र व दुसऱ्या दिवसाची पहांट परमेश्वराचे चिंतनांत व्यतीत केली.

* * *

दुसऱ्या दिवशीं म्हणजे सोमवार दिनांक ११ सप्टेंबर १८९३ या दिवशीं सकाळीं ठीक दहा वाजतां सर्वधर्मपरिषदेस सुरु-

वात झाली. कोलंबस स्मारक मंदिरांत आर्ट पॅलेस नांवाचा प्रचंड मंडप उभारला होता; त्यांत सुमारें ६–७ हजार स्त्रीपुरुष बसले होते. सर्व बाजूंनीं हंड्या व झुंबरें लकाकत होतीं. देशोदेशींचीं निशाणें फडकत होतीं. सुमारें २०० लोकांना बसतां येईल असें व्यासपीठ उभारलें होतें. निरनिराळ्या धर्मांतील थोर थोर पुरुषांचे पुतळे तेथें उभे होते. व्यासपीठाच्या वरच्या बाजूस, कोलंबस अमेरिकेच्या भूमीवर पहिलें पाऊल टाकीत आहे, असें भव्य तैलचित्र टांगलें होतें.

बरोबर १० वाजतां परिषदेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. बॅरोज हे सभेचे अध्यक्ष कार्डिनल गिबन्स यांना बरोबर घेऊन सभागृहांत आले. अध्यक्ष सभागृहांत येतांच सर्वांनीं त्यांचें स्वागत केलें. अध्यक्षांच्या पाठोपाठ कार्डिनल मॅसारिक व अन्य प्रतिनिधी होते. ते सर्व घंटांच्या निनादांत कांहींशा समारंभानें सभागृहांत श्रोत्यांना उजवी घालून व्यासपीठावर जाऊन बसले. मध्यभागीं कार्डिनल गिबन्स हे आसनस्थ झाले होते. त्यांच्या उजव्या हाताला कार्डिनल मॅसारिक व ख्रिश्चन धर्मांतील निरनिराळ्या पंथोपपंथांतील धर्मगुरु मखमलीचे झगे पांघरून बसले होते. डाव्या हाताला चीन, जपान, इराण, हिंदुस्थान इत्यादि पौर्वात्य देशांतील प्रतिनिधि दिसत होते.

थोडक्याच वेळांत सभेच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीला निरनिराळ्या प्रतिनिधींचा परिचय करून देणें हाच प्रमुख कार्यक्रम होता. अध्यक्ष एकेका प्रतिनिधीचें नांव घेत व तो प्रतिनिधि परिचयात्मक असें ५ मिनिटें भाषण करून आपल्या जागेवर बसे. याप्रमाणें एका पाठोपाठ एकेक प्रतिनिधि येऊन भाषण करूं लागले.

या तरुण संन्याशाचे अंतःकरणांत तें भव्य, ऐश्वर्ययुक्त दृश्य पाहून व्याकुलता उत्पन्न झाली. ' मी मातृभूमीपासून येथें इतका दूर आलों आणि अजूनपर्यंत मी तर कोठें भाषण असें केलेलें नाहीं. इथें हे एकेक विद्वान लोक ! त्यांचेसमोर मी काय बोलणार ? " असे विचार त्याच्या मनांत धांवूं लागले.

एक एक प्रतिनिधि उठत होता व भाषण करीत होता. कार्डि-नल' मॅसारिक उठले. ते म्हणाले,

" His pious Holiness the president, and memebers of this learned assembly" ( शुचिर्भूत आणि पवित्रस्वरूप अध्यक्ष महाराज आणि विद्वत् सभाजनहो )

जुन्यांतल्या जुन्या, जगभर फैलावलेल्या आणि एकमेव सत्य असलेल्या ख्रिश्चन धर्माचा प्रतिनिधि म्हणून मी उभा आहें. ख्रिस्ती धर्माचे गोडवे गाण्याचें मला कारण नाहीं. कारण ही पहिलीच अपूर्व अशी ख्रिस्ती परिषद देशांत भरत आहे, एवढी एकच गोष्ट या धर्माची श्रेष्ठतम थोरवी कबूल करावयास लावण्यास पुरेशी आहे."

कांहीं वेळानें मुजुमदारांची पाळी आली. तो धिटाईनें उठला. व्यासपीठावर जाऊन उभा राहिला. अध्यक्षांना व श्रोतृगणाला नम्रपणें वंदन करून त्यानें सुरुवात केली,

"My Ecleciastical Lord, the most distinguished Ladies and Gentlemen, (हे धर्माग्रणींचे प्रभो आणि मानधन अशा थोर स्त्रीपुरुषांनो,)

अज्ञानांत खिचपत पडलेल्या हिंदुस्थानांतील कोट्यवधि जीवांना आशेचा किरण दाखविणाऱ्या ब्राह्मो समाजाचा मी प्रतिनिधि आहे."

मुजुमदाराचें भाषण संपलें तेव्हां अनेकांनीं टाळ्या वाजविल्या. तें भाषण आटोपल्यावर अध्यक्षांनीं त्या तरुण संन्याशाला खुणावलें, 'यापुढें तुमची पाळी.' तरुण संन्याशाचे हृदय धडधडूं लाग[ले.] "काय मूर्ख मी ! मुजुमदारानें किती सुन्दर भाषण केलें. तो भाषण पाठ करून आला होता. मी तर भाषणावर विचारही केला नाहीं." अध्यक्षांनीं पुन्हां खुणावलें तेव्हां संन्याशानें उत्तर दिलें, "नको आतांच नको, कांहीं वेळानें."

त्यानंतर पुन्हां अनेकांचे परिचय झाले. ईजिप्तच्या सलाउद्दीन बे नें भाषण करून 'अल्लाचा धर्म हाच एकमेव धर्म' अशी गर्जना

केली. ज्यूंच्या प्रतिनिधीनें ख्रिस्ती व मुसलमान या दोघांचा उपहास करून ज्यूंच्याकडे सर्वांचें पितृत्व असल्याचा दावा मांडला. जपानमधील बुद्ध भिक्षूंनीं सर्व हिंसाप्रधान धर्म निखालस चूक आहेत असें सांगून भगवान बुद्धाच्या संदेशाच्या सत्यत्वाची प्रचीति आणून दिली. त्यानंतर चक्रवर्तीचें भाषण झालें. त्यानें सुरवात केली–

"His Most Exalted Piousness, the uncrowned king of the Holy church, the President, Ladies and Gentlemen of this blessed land, (सर्वश्रेष्ठ आसनस्थ मूर्ते, पवित्र धर्मतत्त्वांच्या अनभिषिक्त राजर्षे, हे सभाधिपते आणि देवभूमींतील देवदेवतांनो) प्राचीनतम अशा सर्वधर्मसहिष्णु भूमींतून आपला प्रसाद संपादन करण्यासाठीं आम्ही आलों आहोंत."

चक्रवर्तीचे भाषणानंतर ३१ व्या क्रमांकावर बसलेल्या तेजस्वी संन्याशाला अध्यक्षांनीं पुन्हां एकदां खुणावलें, पण त्यानें पुन्हां एकदां नकार दिला. त्याची छाती धडधडत होती, मन गोंधळलें होतें. तोंडाला कोरड पडली होती, त्याची स्थिति अध्यक्षांच्या ध्यानांत आली. "You must try, You must try" "तुम्हांला प्रयत्न केलाच पाहिजे, त्याविना गत्यंतर नाहीं" असें ते म्हणाले.

त्यानंतर पुन्हां कांहीं प्रतिनिधींचा परिचय झाला. दुपार संपून संध्याकाळचे ५ वाजले. अध्यक्षांनीं रेव्हरंड हेन्री ग्रीन यांना त्या संन्याशाकडे पाठविलें. यावेळीं कोणतीही सबब चालणार नाहीं. बोलावेंच लागेल' असें त्याला सांगण्यांत आलें. संन्याशाला तें मान्य करण्याविना गत्यंतर नव्हतें.

तिकडे आधींच्या वक्त्याचें भाषण सुरू होतें; इकडे हा संन्यासी धडधडत्या अंतःकरणानें परमेश्वराचें स्मरण करूं लागला. 'कोणाचें बरें या प्रसंगीं स्मरण करावें ? विद्येची अधिष्ठात्री देवता जी सरस्वती तिचेंच स्मरण करणें योग्य, असें म्हणून त्यानें सुरुवात केली.

**या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।**
**या वीणावरदंडमंडितकरा या श्वेतपद्मासना ।।**
**या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर् देवैः सदा वन्दिता ।**
**सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ।। १ ।।**

(कुन्द पुष्पें, चंद्र, हिम, आणि शुभ्र हार याप्रमाणें जी गौरवर्ण आहे, जिनें शुभ्र वस्त्रें परिधान केलेलीं आहेत, उत्कृष्ट वीणेचा दांडा तिच्या हातास भूषवीत आहे, जी शुभ्र कमळावर बसली आहे, ब्रह्मा–विष्णु–महेशादि देवांनीं जिला सदैव वंदन केलें आहे, ती, अज्ञानाला समूळ निवटणारी देवी सरस्वती माझें रक्षण करो! )

इतक्यांत पूर्वीच्या वक्त्याचें भाषण संपलें व अध्यक्षांनीं नांव पुकारलें.

**"विवेकानंद, विवेकानंद, हिंदु धर्माचे प्रतिनिधि विवेकानंद"**

तो तरुण संन्याशी उठला. सरस्वतीचें स्मरण करतां करतां त्याच्या पायांत जोर आला, धडधड शांत झाली, मन उल्लसित झालें.

व्यासपीठाच्या पायऱ्या चढत तो म्हणूं लागला.

**सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ।**

देवी सरस्वती! भगवती! प्रसन्न हो, प्रसन्न हो, माझें अज्ञान दूर कर !

क्षणभरांत तो संन्याशी व्यासपीठापाशीं जाऊन उभा राहिला. ७ हजार स्त्रीपुरुषांचे डोळे त्याच्याकडे लागलेले होते. त्याच्या अंगांतील भगव्या रंगाचें वस्त्र, डोक्यावरील भगव्या रंगाचा फेटा, यामुळें त्याचें हिंदुत्व प्रकाशून दिसत होतें. त्याची तेजस्वी मुद्रा व बोलके डोळे सर्वांना आकर्षित करीत होते.

पुनः एकदां '**सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा**' असें सरस्वतीचें चिंतन करून त्यानें सुरुवात केली.

पण तो जणूं स्वतः बोलतच नव्हता; शब्द त्याचे तोंडांतून आपोआप येत होते. जणूं सरस्वतीच त्याचे कंठांतून अति मधुर आवाजांत बोलूं लागली. सर्वांच्या अंतःकरणाचा ठाव घेऊं लागली.

"Sisters and Brothers of Amerika ! "

"अमेरिकेंतील भगिनींनो आणि बंधूंनो ! "

खडीसाखरेपेक्षां गोड, मधापेक्षां मधुर, अमृतापेक्षां अमृतपूर्ण असे ते शब्द ! त्यांत अध्यक्षाच्या नांवाचें शब्दजंजाळ नव्हतें, कीं व्यक्तिगत विद्वत्तेचें प्रदर्शन नव्हतें, साधे सोपे हृदयस्पर्शी शब्द ! ते ऐकतांच त्या ७ हजार स्त्रीपुरुषांच्या अंगावर आनंदानें रोमांच उभे राहिले ! कित्येक उठून उभे राहिले, कित्येक ओरडूं लागले, कित्येक आनंदानें बेहोष होऊन नाचूं लागले. टाळ्यांचा अतिप्रचंड कडकडाट सुरू झाला, तो थांबता थांबेना. अनंतामधून येणाऱ्या ॐकार ध्वनीची संवेदना मिळाली म्हणजे अननुभूत आनंदानें अंतःकरण थरारून उठतें तो प्रकार श्रोत्यांच्या अनुभवास आला.

विवेकानंदांनीं दोन वेळां बोलण्याचा प्रयत्न केला पण टाळ्यांचा गजर सतत १० मिनिटें चालू होता. त्यामुळें त्यांना स्वस्थ उभें रहावें लागलें. लोक भानावर आल्यावर विवेकानंदांनीं पुनरपि सुरुवात केली.

"अमेरिकेंतील भगिनींनो आणि बंधूंनो, आपण आम्हां प्रतिनिधींचें ज्या आपुलकीनें व उत्कंठेनें स्वागत केलें आहे त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करतांना माझें मन उचंबळून येतें. मी आपणां सर्वांचा आभारी आहें. सर्व जगांतील विरक्तांमध्यें पुरातन असलेला जो संन्यासमार्ग त्याच्या नांवानें मी आपला आभारी आहें; नानाविध धर्मांची जी भूमि जननी आहे तिच्या वतीनें मी आपला आभारी आहे, आणि संख्येनें कोटि कोटि असलेले जे हिंदु, त्यांच्या सर्व पंथोपपंथांचा प्रतिनिधि या नात्यानें त्यांच्या वतीनें मी आपला आभारी आहें.

आज कोणीतरी धर्मसहिष्णुतेसंबंधीं बोलले. माझा जन्म ज्या धर्मांत झाला तो धर्म परमतसहिष्णु आहे. एवढेंच नव्हे तर जगांतले सर्वच्या सर्व धर्म पूर्णतया सत्य आहेत असें तो मानतो. धार्मिक अत्याचारांनीं निर्वासित झालेल्या विविध धर्मांच्या अनुयायांना आम्ही आमच्या पोटांत आनंदानें जागा दिली हें मी

अभिमानपूर्वक सांगतों. रोमनांच्या अत्याचारांनीं यहुदी व मुसलमानांच्या अत्याचारांनीं पारसिक भारतांत आले. त्यांना त्यांचा धर्म बदलण्याची कधींच आवश्यकता पडली नाहीं. सर्वंच धर्म जेथें सत्य आहेत तेथें बदलावयाचा धर्म तो कोणता व स्वीकारावयाचा धर्म तरी तो कोणता ?

आम्हांला या निष्ठेंचें बाळकडूच आहे. भारतांतील कोटयवधि लोकांना कंठगत असलेली आणि मी माझ्या बाळपणीं पाठ केलेली एक काव्यपंक्ति आपणास सांगतों.

**रुचीनां वैचित्र्याद् ऋजुकुटिलनानापथजुषां**
**नृणामेको गम्यः त्वमसि पयसामर्णव इव ॥**

( महिम्न स्तोत्र )

ज्याप्रमाणें आकाशांतून निरनिराळ्या ठिकाणीं पडणारें पाणी अखेर सागराला जाऊन मिळतें, त्याप्रमाणें हे परमात्मन्, लोकांच्याकडून निरनिराळ्या मनोभावनांनीं अनुसरले जाणारे पूजनाचे विविध असे सरळ अथवा वक्र मार्ग अखेर तुलाच येऊन पोंचतात !

माझाच धर्म तेवढा खरा असल्या अविचारी हट्टाग्रहाचे दिवस आतां संपले. आजची ही पुण्यमय परिषद गीतेंतल्या विचारांचेंच सत्यत्व प्रकट करीत नाहीं काय ?

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥**

(गीता ७-२१)

**यऽप्यन्यदेवताभक्ताः यजन्ते श्रद्धयाऽन्विताः ।**
**तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ॥**

(गीता ९-२३)

( जो जो भक्त ज्या ज्या स्वरूपाचें श्रद्धेनें पूजन करूं इच्छितो, त्याची त्याची तीच श्रद्धा मी अढळ करतों.

आणखी जे कोणी इतर देवतांचे भक्त श्रद्धायुक्त होऊन पूजन करतात, ते देखील अप्रत्यक्षपणें माझेंच पूजन करतात. )

जो जो माझ्याकडे येतो, तो तो कोणत्याही साधनानें येवो मी त्याला प्राप्त होतों; विविध मार्गांनीं धांवणारे हे लोक अंतीं मलाच येऊन मिळतात.

खरोखर संकुचितपणा, पंथनिष्ठा, व त्यांचेंच अपत्य म्हणजे पिसाटवृत्ति; या पिशाचांनीं आपल्या सुंदर पृथ्वीला आजपर्यंत घेरलें आहे. हीं पिशाचें नसतीं तर मानवी समाज एव्हांना कितीतरी प्रगत झाला असता. पण आतां त्या पिशाचांचे दिवस भरले आहेत असें मी समजतों. आज सकाळीं परिषदेच्या सुरुवातीला जी घंटा वाजत होती तिच्या निनादांतून हेंच सूचित झालें आहे कीं तरवारीच्या तडाख्यांनीं अथवा लेखणीच्या फटकाऱ्यांनीं पंथनिष्ठेचा प्रचार करण्याची पिसाटवृत्ति मेली व त्याचप्रमाणें एकाच ध्येयाकडे जाणाऱ्या व्यक्तींच्यामधील असद्‌भावनाही नाहींशी झाली."

श्रीविवेकानंदांचें भाषण संपलें. भाषण चालू असतांना सभागृहांत इतकी गाढ शांतता पसरली होती कीं, हातरुमाल पडल्याचाही आवाज ऐकूं यावा. ते जसजसे बोलूं लागले तसतसें लोकांचे कान, डोळे, मन, चित्त, बुद्धि, आत्मा हीं सर्व ते सांगत असलेल्या विचारांबरोबर एकरूप होऊन धांवूं लागलीं. असे उदात्त विचार यापूर्वीं कोणीही केव्हांही ऐकले नव्हते. कोणी देवदूत तर आपणाशीं बोलत नसावा अशी लोकांची स्थिति झाली. खरोखरी विवेकानंद भाषण करीत असतांना त्यांचा चेहरा अग्नीप्रमाणें तेजःपुंज दिसत होता. भाषण संपलें पण लोकांना तें संपल्याचें समजलेंच नाहीं. भाषण संपल्यावरही सभागृहांत पहिल्यासारखीच शांतता कित्येक क्षणांपर्यंत टिकून राहिली. नंतर एकदम टाळ्यांचा कडकडाट सुरू झाला. व पावसाच्या जोरजोरानें सरीवर सरी याव्यात तद्वत् टाळ्यांच्या सरीवर सरी येत राहिल्या. विवेकानंद व्यासपीठाजवळून दूर होऊन शांतपणानें आपल्या जागेवर जाऊन बसले.

★ ★ ★

**विवेकानंदांच्या** भाषणानंतर सभेचे अध्यक्ष कार्डिनल गिबन्स हे भाषण करावयास उठले. त्यांचें भाषण चालू झालें न झालें तोंच कार्डिनल मॅसारिक जागेवरून उठले व जवळ बसलेल्या

रेव्हरंड हेन्री ग्रीन यांच्या पाठीवर बोटांनीं स्पर्श करून त्यांना त्यांनीं आपल्या पाठीमागें येण्यास खुणावलें. दोघेही अल्पावधींत अध्यक्षांच्या मागें असलेल्या छोटया खोलींत गेले.

आपल्या पाठीमागें दार लावून घेतल्यावर रे. हेन्री ग्रीन यांना कार्डिनल मॅसारिक म्हणाले,

"बिल, अरे ख्रिस्ती धर्माचा त्रिखंडांत जयजयकार व्हावा हा जो या परिषदेचा हेतु तो विफल होणार!"

"तें कां?" रे. हेन्री ग्रीन यांनीं विचारलें.

"आतांचें भाषण ऐकलेंस? हा गृहस्थ अशीं भाषणें करीत जाईल तर परिषद अयशस्वी होईलच, पण २५ वर्षांचे आंत ख्रिश्चन धर्म जगावरून नाहींसा होईल."

"तो बोलतो विलक्षणच! प्रश्नच नाहीं!"

'प्रश्न नाहीं कसा? प्रश्न असा आहे कीं, त्याचे उद्योगास खीळ घालावी कशी?"

"त्याचे उद्योग थांबवावयाचे हें एकदां निश्चित झाल्यावर मार्ग काय कोणताही! साम, दाम, दंड, किंवा भेद."

"मला वाटतें प्रथम सामदामाचा विचार करावा."

" करावा. "

"मग त्यासाठीं विलंब न लावतां आतांचे आतांच त्याला बोलावून त्याचे बरोबर बोलणें करावें."

" अगदीं बरोबर. !"

"तर मग त्याला बोलावणें पाठव. कार्डिनल गिबन्सचें भाषण संपल्याबरोबर तो येथें येईल असें कर."

"ठीक आहे."

थोडक्याच वेळांत कार्डिनल गिबन्स यांचें भाषण संपलें. सर्व लोक विवेकानंदांचेकडे पाहून टाळ्या वाजवीत होते, टोप्या उडवीत होते, उत्साहानें त्यांचें अभिनंदन करीत होते. तोंच कोणी चपराशी त्यांचेजवळ आला व त्यानें सांगितलें कीं, कार्डिनल मॅसारिक यांनीं आपणांस तावडतोब कांहीं कामासाठीं बोलाविलें आहे. विवेकानंद उठले व मागच्या खोलींत गेले.

विवेकानंदांना पाहिल्याबरोबर कार्डिनल त्यांना सामोरे आल्यासारखे पुढें येऊन म्हणाले :—

"विलक्षण ! अगदीं विलक्षण ! ! आपलें आजचें भाषण म्हणजे अतिविलक्षण ! ! ! खरोखरी अप्रतिमच होतें !"

" आम्हांला तर वाटलें आपण या भूमीवर नसून स्वर्ग लोकांतच आहोंत." रेव्हरंडनीं दुजोरा दिला.

" एकाच भाषणांत तुम्ही अमेरिका जिंकलीत."

" शंकाच नाहीं."

विवेकानंद एका वक्त्याकडून दुसऱ्या वक्त्याकडे आळीपाळीनें पाहात राहिले.

"आमच्या मनांत एक कल्पना आली आहे. पहा तुम्हांला कसें काय वाटतें. आमची समजूत अशी आहे कीं आपल्यासारख्या पुरुषाची मनीषा अमेरिकेनें पुरी केलीच पाहिजे."

" निःसंशय पुरी केलीच पाहिजे."

" मला वाटतें आपण जे विचार आज सभागृहांत मांडलेत त्यांचा जगभर प्रसार होण्याच्या दृष्टीनें एक आश्रम स्थापन केला पाहिजे."

" आश्रम हवा पण त्याचें केंद्र कलकत्त्याला असलें पाहिजे" रेव्हरंडनें सुचविलें.

" केंद्र कलकत्ता हें बरोबर पण नंतर ८–१० वर्षात त्या आश्रमाच्या शाखा जगाच्या सर्व भागांत स्थापन झाल्या पाहिजेत."

" बरोबर आहे. या विचारांचा जगभर प्रसार झालाच पाहिजे."

व्यवहारांत अननुभवी असलेल्या विवेकानंदांना समजेना कीं हा प्रकार तरी काय आहे.

कार्डिनल पुढें म्हणाले, " त्या केंद्रांत अनेक धर्मोपदेशक तयार व्हावेत. हें कार्य करण्यास स्वामी विवेकानंद, आपणांसारखा पुरुष आम्हांला लाभला हें आमचें परमभाग्य आहे. रेव्हरंड बिल, आश्रमाच्या स्थापनेला प्राथमिक असा किती खर्च येईल ?"

" मला वाटतें ५ लाख डॉलर्स तरी सुरुवातीला लागतील."

"तितके पाहिजेतच तेवढ्यांत केवळ एखादी इमारत तयार होऊं शकेल. पण तितकेच डॉलर्स दर वर्षाला खर्च केले पाहिजेत म्हणजे आश्रमाचा वाढता खर्च भागूं शकेल."

विवेकानंदांना वाटलें कीं परमेश्वरी प्रसादाचा तर हा एक प्रकार नसेलना ?

कार्डिनल आपल्या लाघवी आवाजांत हलकेच म्हणाले–

"प्रिय विवेकानंदजी, आम्ही जाणतों कीं हें ईश्वरी कार्य आहे. याचा खर्च अमेरिकेनें केलाच पाहिजे. आम्ही करूं. हा सर्व खर्च आम्ही करूं. आजच्या आज येवढ्या रकमेचा चेक आपल्या हवालीं होईल. पण आमची एक सूचना आहे."

"हो सूचना आहे, नाजूक आहे पण सहज करण्यासारखी आहे." रेव्हरंडची पुस्ती मिळाली.

"सूचना एवढीच कीं या थोर कार्यासाठीं कोणीही वेळ वाया घालवितां कामा नये. आपणसुद्धां ताबडतोब हिंदुस्थानांत जाऊन या कार्याला सुरुवात करावी. ताबडतोब म्हणजे उद्यां येथून निघालांत तरी सुद्धां चालण्यासारखें आहे."

"मला वाटतें आपण थोडें मोकळ्या मनानें बोलण्याची आवश्यकता आहे." रेव्हरंड कार्डिनलकडे पहात विवेकानंदांकडे वळून म्हणाले. "कार्डिनल मॅसारिक यांचें म्हणणें एवढेंच आहे कीं इथें भाषणें करीत बसण्यापेक्षां कांहीं प्रत्यक्ष कार्य करणें चांगलें.थोडक्यांत तुम्ही येथें भाषणें करूं नये, राहूंही नये, व तुमच्या हिंदुस्थानांतील कार्याला लागेल ती मदत आम्ही करावी. अशा पद्धतीची कामाची वांटणी आपणां दोघांमध्यें असली पाहिजे."

"५ लाख डॉलर्सचा हा चेक आतां तयार आहे." कार्डिनलने चेकबुक खिशांतून काढले.

विवेकानंदांच्या चेहऱ्यावर कांहीं परिणाम दिसला नाहीं.

तें पाहून रेव्हरंड ग्रीन यांनीं दोन पावलें पुढें टाकलीं.

ते म्हणाले, "कार्डिनल तसें नाहीं, दर वर्षीचा खर्च आपण निश्चितपणें करणार आहोंत हें स्पष्ट झालें पाहिजे. मला वाटतें पहिला चेक १० लाख डॉलर्सचा असावा."

विवेकानंद त्या दोघां धर्मोपदेशकांचा संवाद ऐकत होते. एक कॅथॉलिक पंथाचा अत्युच्च पुढारी तर दुसरा विद्वान् गणला गेलेला धर्मगुरु ! त्यांच्या मनांत हळूहळू प्रकाश पडत गेला.

"हा पैसा घ्या, ही लांच घ्या व भारतांत परत जा, असा त्यांच्या म्हणण्याचा सरळ अर्थ आहे. मला ते विकत घेऊं पाहतात. मला भुलवूं पहातात. मला ते कोण समजले ? माझें कार्य म्हणजे काय बाजारांतला तमाशा आहे ? "

विचार करतां करतां विवेकानंदांच्या मनांत सात्त्विक संताप उत्पन्न झाला. ते एकदम ओरडले :—

"बस् पुरे करा तुमचा सौदा ! मी विकत घेतां येणारा मनुष्य नाहीं. मी कांहीं कॅथॉलिक धर्मगुरु नाहीं. मी त्रिखंडाच्या वैभवावर लाथ मारणारा हिंदु संन्यासी आहे. "

विवेकानंद संतापानें माघारे वळले व झटक्यानें खोलीचा दरवाजा उघडून बाहेर चालते झाले.

कार्डिनल मॅसारिक व रेव्हरंड ग्रीन थिजून नुसते पहात राहिले.

★ ★ ★

विवेकानंद बाहेर आले तों अनेक लोक त्यांच्याकरतां बाहेर खोळंबून होते. कित्येक स्त्रिया होत्या, मुलें होतीं, पुरुषही होते. विवेकानंद दृष्टीस पडल्याबरोबर ते सर्व त्यांचेकडे धांवले कित्येकांनीं त्यांच्यासमोर गुढघे टेकले ; कित्येकांनीं त्यांना फुलें अर्पण केलीं. कित्येक नुसते पहात राहिले, कित्येकींनीं त्यांच्या हाताचीं चुंबनें घेतलीं. सात्त्विक प्रेमाचा व भक्तीचा एकच कल्लोळ उसळला.

त्या भक्तजनामध्यें ममी होतीच. ती म्हणाली, "महाराज अधिक काय बोलूं ? मला क्षमा करा ! मी आपणांस केवळ एक सामान्य प्रवासी या नात्यानें वागविलें. मी आपणांस जाणलें नाहीं. मी आपल्याला अरे तुरे बोललें. मी आपला अपमान केला, मला क्षमा करा ! माझेवर अनुग्रह करा ! "

"माताजी, हें काय भलतेंच बोलणें ! मला आपण आश्रय दिलात, ऐनवेळीं जेऊं खाऊं घातलेंत, त्याचे उपकार जन्मभरसुद्धां

फिटण्यासारखे नाहींत." विवेकानंदांनीं विनयानें उत्तर दिलें.

भोंवतीं असलेल्या सात्त्विकतेच्या आनंदांत मागचा कडू प्रसंग विवेकानंद विसरले.

इतक्यांत एक वयस्कर गृहस्थ व त्यांची पत्नी दोघे गर्दीतून पुढें आलीं.

तो गृहस्थ म्हणाला, "महाराज आपण संन्यासी आहांत. ममी सांगत होती कीं आपणाकडे कांहींही याचना केली तर आपण ती विफल करीत नाहीं."

"काकाजी, मी संन्यासी! आपली काय सेवा करूं?"

"महाराज, आपण आज आमच्या घरीं मुक्कामास चलावें, आपल्या सहवासाचा आम्हांला लाभ द्यावा एवढीच अल्पशी विनंति आहे. आपण नाहीं म्हणू नका."

त्या जोडप्याच्या प्रेमळ आग्रहापुढें नाहीं शब्दही उच्चारणें कठिण झालें.

भोंवतालच्या मंडळींचा निरोप घेऊन विवेकानंद शिकागोमधील प्रसिद्ध कोटचधीश श्री. मार्टिन जोन्स यांच्यावरोबर निघाले. आजूबाजूनें अनेक लोक येऊन फुलें देऊन जात होते. परिषदेला आलेले प्रतिनिधीही येऊन अभिनंदन करून जात होते.

★ ★ ★

मार्टिन जोन्स यांचे घरीं आदरसत्कारांनीं विवेकानंदांचा जीव गुदमरून गेला. त्या कोटचधीशाच्या घरची सर्व संपत्ति त्यांच्या सेवेसाठीं झटत होती. अशांत रात्र झाली. जोन्स पति-पत्नींनीं विवेकानंदांना चौथ्या मजल्यावरील भव्य आणि सुशोभित केलेल्या दिवाणखान्यांत पोंचविलें व 'Good Night' म्हणून त्यां[illegible] निरोप घेतला.

खोलीभर निळा प्रकाश पडेल अशी योजना केलेली होती. भिंती-वरील सूक्ष्म रंगरंगोटी त्या निळ्या प्रकाशांत खुलून दिसत होती. भिंतीवर अमेरिकेंतील अनेक थोर पुरुषांचीं तैलचित्रें टांगलेलीं होतीं. मधेंच जॉर्ज वॉशिंग्टनचें एक मोठें तैलचित्र होतें त्याला ताज्या फुलांचे गजरे समर्पण केलेले होते. जमिनीवर उत्तम नक्षी-

नक्षीचें फरशीकाम केलेलें होतें. मखमलीचे कोच व खुर्च्या ठेवलेल्या होत्या. एका बाजूस शोभिवंत पलंग व त्यावर मऊ पिसांचा बिछाना अंथरलेला होता. त्याच्याच पलीकडे टुमदार अशी गच्ची होती.

भारावलेल्या मन:स्थितींत विवेकानंद पलंगापाशीं गेले. दुपारीं झालेल्या परिषदेनंतर प्रथमच त्यांना एकान्त मिळाला होता. परिषदेमध्यें ते स्वत: भाषणाला उठले ती वेळ, तो टाळ्यांचा कडकडाट, देवी सरस्वतीचें स्मरण, त्या स्फूर्तीतून झालेलें भाषण, त्यानंतर झालेल्या टाळ्या ह्या सर्व गोष्टी त्यांच्या मनश्चक्षूसमोरून सरकत गेल्या.

भाषणानंतर लोकांनीं केलेलें अभिनंदन, उधळलेलीं फुलें, कोट्यधीशाच्या घरीं झालेलें येणें हीं दृश्येंही मनांत येऊन गेलीं. एवढ्याशा अल्प अवधींत विविध भावनांचा अनुभव त्यांना आला होता. त्यांच्या मनाला त्याचा शीण वाटूं लागला.

भारावलेल्या मन:स्थितींत ते पलंगापाशीं गेले. खोलीचें कांहींसें अवलोकन त्यांनीं केलें आणि ते पलंगावर बसले मात्र !

तोंच हजारो विंचवांनीं एकक्षणीं नांग्या माराव्यात तशा शिणका त्यांच्या शरीरांतून निघाल्या. ते एकदम उभे राहिले. मन त्यांना विचारूं लागलें, "अरे तूं कोण ? तूं कुठें आहेस ? तुझा देश कोणता ? तुझा वेष कोणता ? तुझा धर्म कोणता ?"

एश्वर्य आणि यश यांच्या शिखरावर असलेल्या स्थितींत विवेकानंदांच्या चित्तासमोर हिंदुस्थान उभा राहिला. स्वदेश मूर्तिमंतपणें त्यांना दिसूं लागला. तीस कोटि हिंदु समाज, त्याचें दारिद्र्य, त्याचा विस्कळितपणा, त्याचें अज्ञान, त्याचें पारतंत्र्य, त्यांतील अपमान, त्यांतील दु:ख, तेथील दुष्काळ, तेथील हालअपेष्टा त्यांना साक्षात् दिसूं लागल्या. गुरुबंधूंच्या सान्निध्यांत संन्यासधर्माची घेतलेली प्रतिज्ञा स्फुरूं लागली. त्यांच्या मनांत कालवाकालव होऊं लागली. खोलींतलें तें ऐश्वर्य त्यांना खायला उठलें. तें त्यांना सहन होईना.

अभावितपणें त्यांचीं पावलें गच्चीकडे वळलीं. गच्चीच्या बाहेर अंधार पसरलेला होता. त्या अंधारांत आकाशांतील तारे चमकून दिसत होते. जणुं ते विवेकानंदांचें सांत्वन करूं इच्छीत होते.

विवेकानंद कितीतरी वेळ गच्चीपाशींच उभे राहिले. विचारांच्या कोलाहलांत त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. आकाशांतील आकाशगंगाच जणुं त्यांच्या डोळ्यावाटें वाहूं लागली.

पण तेवढ्यानेंही मनाचा भार हलका होईना. मनाच्या यातना इतक्या वाढल्या कीं ते तेथेंच पडले, फरशीवर गडबडा लोळत लोळत ते स्फुंदून स्फुंदून रडूं लागले. कांहीं वेळानें मन आवरून त्यांनीं आईचें स्मरण केलें, हात जोडले व प्रार्थना केली.

"आई जगदंबे, माझी मातृभूमि जोंपर्यंत भीषण दारिद्र्याच्या दुःखांत आहे तोंपर्यंत मला लाभणाऱ्या यशाचें आणि कीर्तीचें काय होय! मूठभर तांदुळासाठीं माझ्या देशांतील लाखो लोकांना मरावें लागत आहे. आणि येथें सामान्य व्यक्तीच्या क्षुद्र सुखासाठीं वैभवाच्या राशी ओतल्या जात आहेत. किती दारुण विपरीत परिस्थिति! ही कशी दूर होईल? आई, माझा देश जागृत कसा होईल? सुखी कसा होईल? शहाणा कसा होईल? जगदंबे, कालीमाते यांतून मार्ग दाखीव, मार्ग दाखीव!"

* * *

प्रार्थना करतां करतां तन्मय झालेल्या चित्ताची समाधि लागली. श्रीविवेकानंदांना त्याच स्थितींत फरशीवर झोंप लागली.

---

४०६७
वा : वा :